पारिजात प्रकाशन—१३

# —तांडा—

[ कथा—संग्रह ]

पुणें मराठी ग्रंथालय
व. क्रमांक ८१६ ८७
अनुक्रमांक ३४७८

रघुवीर सामंत

दीपावलि
१९४६

—सोल एजन्ट्स्—
महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि.
मुंबई ४.

[ मूल्य २॥ रुपये ]

पारिजात प्रकाशन–१३

# –तांडा–

[ कथा–संग्रह ]

पुणें मराठी ग्रंथालय
व. क्रमांक
अनुक्रमांक

रघुवीर सामंत

दीपावलि
१९४६

—सोल एजन्ट्स्—
महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि.
मुंबई ४.

[ मूल्य २॥ रुपये ]

तांडा

१ उस्तादजींचं देऊळ !
२ पाताळ-यंत्र !
३ चांदीची वाटी !
४ दोघांना जोडणारं पार्टिशन !
५ पण, तो बसला नाहीं !
६ 'मार डाला !'
७ ब्रह्मदेवाची 'प-मो'
८ मृदुंगी जीवन !
९ त्या पेल्यांची लज्जत-

भाषांतर, पुनर्मुद्रण, उतारे इ. बाबतचे
सर्व हक्क लेखकाकडे

शं. वा. कुळकर्णी यांनीं
सागर साहित्य छापखाना
त्रिभुवन रोड, मुंबई ४.
येथें मुद्रित करून

महाराष्ट्र ग्रंथ भांडार
मुंबई ४
येथें प्रसिद्ध केलें.



३४९८

निष्ठुर नियतीनें अकालीं ओढून नेलेल्या—

—विश्वनाथ,

प्रेमा,

वासंती,

लीला—

या चौघां तरुण प्रेमळ जीवांच्या...

रम्य स्मृतींच्या तांड्यास—

त्यांच्या मामाच्या कलाकृतींचा हा चिमुकला 'तांडा' समर्पण.

[दिपावलि; १०-१९४६]

रघुवीर सामंत बी.ए., बी.टी.
यांचीं

## विविध वाचनीय पुस्तकें

**प्रसिद्ध कलाकृती**

१ हृदय-[शब्दचित्रें]
[द्वितीय आवृत्ती लौकरच]
२ पणत्या-[लघुनिबंध]
३ रजःकण-[लघुकथा-निबंध]
४ तारांगण-['चित्रबंध']
५ मासलेवाईक प्राणी-१
[स्वभाव चित्रें]
६ वाळूंतील पाउलें [लघुकथा]
७ सुरंगीची वेणी-
[रूपांतरित रशियन कथा]
८ आजची गाणीं [सांघिक गीतें]
९ आदर्श कृषीवल-[चरित्र]
१० तांडा [कथा संग्रह]

**उपकारी माणसें**

प्रदीर्घ महाराष्ट्र-समाज-पट
११ [खंड १] प्रवासांतील सोबती
[पत्रात्मक कादंबरी]
१२ [खंड २] अभ्र-पटल
[कथनात्मक]
१३ [खंड ३] आकाश-गङ्गा
[आत्मचरित्र-कथन-मिश्र]
१४ [खंड ४] घरोघरच्या देवी
[नाट्यात्मक कादंबरी]

**आगामी कलाकृती**

—: कादंबऱ्या :—
१५ काहूर [स्वतंत्र सामाजिक मनोविश्लेषणात्मक]
१६ आम्हाला जगायचं आहे !
[भावपूर्ण सामाजिक कादंबरी]
१७ त्रिमण्या जगाचे नेते !
[शालेय जीवनावरील कथा]
१८ जिवंत माणूस !
[एका भावनाशील पण बेफिकीर अशा तिरशिंगरावाचें 'चरित्र']

**इतर**

१९ रक्त नि शाई
[आजची गाणीं-२]
२० मासलेवाईक प्राणी-२
[स्वभाव-चित्रें]
२१ स्वल्प-विराम
[चित्रबंध-शब्दचित्र-संग्रह]
२२ अंधार-प्रकाश
[लघुनिबंध संग्रह]

'पारिजात प्रकाशन' १५९-६०, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४.

# उस्तादजींचं देऊळ ! ★ ★ ★ रघुवीर सामंत

आम्ही दोघे समोरासमोर तसे बराच वेळ अबोलपणें बसलों होतों; तोंच काळोख दाटला; केवळ त्यांना भानावर आणण्यासाठींच मी पटकन् उठलों नि डोक्यावरचं बटन दाबलं.

दुकानांत चक्कन् उजेड पडतांच ते चमकले, उठले; नि पूर्व संस्कार-स्फूर्तींप्रमाणें त्यांनीं दिव्यासमोर यांत्रिकपणें हात जोडले.

मघांपासून गादीसमोर पैशाच्या पेटीवर पळसाच्या पानांची एक पुडी पडली होती; आतला हार काढून त्यांनीं समोरच्या भिंतीवरील दत्ताला घातला; लहानशा तबकांत चार कापराच्या वड्या पेटवून त्या ओवाळल्या; नि पेटीवर आरती ठेऊन, हवेंत विरणाऱ्या कापराच्या धुरावर हात ओवाळून, तळवे एक दोनदां आपल्या चेहऱ्या-कपाळावरून फिरवले; तीन उदबत्त्या पेटवून तज-विरीखालच्या भिंतीच्या फटींत रोंवल्या; नि पेढ्याची पुडी सोडून तींतले दोन दत्तासमोर ठेवल्यावर ते पुन्हां गादीवर येऊन बसले.

तबकातला कापूर जळून गेला होता; उदबत्त्यांचा सुगंध मात्र अजून चौफेर दरवळत होता.

रस्त्यावर ट्राम-मोटारी नि माणसं वर्दळत-गजबजत होतीं; दुकानांत मात्र किती तरी वेळ अगदीं शांत होतं...

तेवढ्यांत, त्यांनीं पुडींतले माव्याचे पांच पेढे सुहास्यमुद्रेनें माझ्या हातांत ठेवले; ते खाऊन संपत आहेत नाहींत, तोंच, त्यांच्या पोऱ्यानें, बर्फ तरंगणाऱ्या डाळिंब सरबताचा ग्लास माझ्या हातीं दिला.

मग गादीजवळच्या एका उघड्या शिसवी पेटींत रांगेनें लावून ठेवलेल्या अत्तरांच्या रंगीबेरंगी लहानमोठ्या कुप्यांपैकीं एक हिरवी शिसी त्यांनीं काढली; हिऱ्याचा बोळा करून मोठ्या आदबीनें माझ्या मनगटाजवळ चोळला; नि शेवटीं, हिरकुटासह तो माझ्याच हातीं देऊन ते लोडाला टेकले.

मग पुडींतला एक पेढा तोंडांत टाकून सस्मित चेहऱ्यानें ते मला म्हणाले—" हां ! अभि कुछ् काहिये, महाशय ! "

★

जवळजवळ गेले तीन महिने, अगदीं दर गुरुवारीं, याच दुकानांत, याच संध्याकाळच्या वेळीं, सर्व अगदी हें असंच होत असल्याचं,...मी पहात आलों होतों...

मी कोणी त्यांच्या धंद्यांतला झोपाळू भागीदार नव्हतों—कीं विक्री–खरेदी नि जमाखर्च यांचा हिशेब पहायला, मी त्यांच्याकडे दर आठवड्याला तसं जावं. त्यांच्या बाटल्या खपवणारा एकादा एजंटहि नव्हतों त्यांचा मी !...नि स्वतः अत्तरं विकत घेऊन अंगाला चोपडण्याचा वेडा नाद तर जन्मांत कधीं ठाऊक नाहीं मला !...

प्रत्येक गुरुवारीं मी तसा त्यांच्या दुकानीं जायचा, तो त्यांच्या इच्छेनुसार !...त्यांनीच ठरवल्याप्रमाणें पैसे घेऊन जायला !

पण म्हणजे, माझ्या कर्जांची वसूली करायला नव्हे...( त्यांचा सावकार होण्यासारखा कांही मोठा पेढीवाला नव्हतों मी !— ) धर्म–राजकारणाचं कारण सांगून धर्मदाय फंडगुंडगिरीहि नव्हती चाललेली माझी ती !

तरीहि मी नेत असे ते पैसे माझेच होते. व्यवहारानेंच माझं तेवढं देणं लागत होते ते !

पैशाचा–देण्या-घेण्याचा व्यवहार जगांत विशिष्ट परिस्थितीनें तयार होतो. नि चालला तर तो विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट परिस्थितीमुळेंच चालतो.

म्हणजे असं...ते जें माझं देणं लागत होते, तें त्यांच्या अत्तराच्या ( माझ्या मासिकांतल्या ) सहा महिन्यांच्या जाहिरातीचे पैसे होते !—देणं असल्याचं त्यांना कबूल होतं; नि येणं कोणीहि कबूल करतो ! !

★

अगदीं जाहिरात वाचतां क्षणींच, त्यांच्या दुकानावर पांचदहा रुपयांच्या नोटा घेऊन ग्राहकांच्या उड्या पडाव्यात, इतके आमचे वाचक अत्तरगुलाबीचे विशेष शौकीनरंगेल होते, असं म्हणायला माझ्याकडे पुरावा नाहीं. किंबहुना, एकहि गेला नसावा, अशीच उलट मला खात्री आहे !



बरं, दाट ओळखीच्या भिडेला बळी पडूनहि मी ती जाहिरात त्यांच्याकडून उपटली नव्हती. ते कनोजी उत्तर हिंदुस्थानी क्षत्रीय; तर मी महाराष्ट्रीय ब्राह्मण !...या संबंधापूर्वी त्यांची माझी जन्मांत गांठभेट नव्हती. वय, शिक्षण, आवडीनिवडी, उद्योगधंदा...सर्वच बाबतींत आम्ही परस्परभिन्न !

तें पंचेचाळीशी पुढले; पण अजूनहि रोज शें-शंभर-जोर-बैठका ते नेमानें घुमवणारे पिळदार अंगाचे पहिलवान !...तर मी चष्मा सांभाळत, ट्राम-बस पकडत फिरणारा, पंचविशी आंतला एक काडीपहिलवान ! त्यांना कुस्त्याभजनांचा शौक; तर मी पुस्तकांत डोकं खुपसून बसणारा, क्वचित् न्हाणीघरांत सिनेमा-संगीत गुणगुणणारा नि एरवी उच्च वाङ्मयाचा घरोघर रतीब घालत असल्याचा उद्धट पुकार करणारा,...एक मराठी शौकिन संपादक !

केवळ अपघात म्हणूनच माझी त्यांची ती जगांतली भेट !—नि म्हणूनच मला ती घटना वारंवार आठवते !—

★

घट्ट मनानें नकार–लेक्चर नि बेफिकीर बोळवण जाणून बुजून पदरांत पाडीत, 'काळबादेवी'ला जाहिरातीची कौल लावून फिरण्याचा, 'मा फलेषु' वृत्तीचा कर्मयोगी खटाटोप चालवला होता मी, त्या दिवशीं ! अनेक दुकानं त्या जाहिरात-चाकोरींतून भरडून, नकार-परंपरा झाल्यावर, योगायोगानेंच मी त्या दुकानावर जाऊन आपटलों होतों.

गिऱ्हाइकाचं चिटपांखरूं नाहीं; निरुंद नि त्यांत पुन्हां अत्ताराचं दुकान ! आंत शिरायला प्रथम मन तयारच नव्हतं. पण तो साराच प्रयत्न बिनखर्चाचा, बिनभांडवलाचा !...तेव्हां मी आंत पाऊल टाकलं; पुढे गादीवर तीनचार अंक टाकले; नि जाहिरातीसाठीं शब्द टाकण्यासाठींहि 'सूतोवाच' केलं.

बैठकीवर बसलेल्या मोठ्या मिशांच्या त्या शेटजींनी चार दोन मिनिटं अंक चाळले; नि शेवटीं, कव्हरवरील जाहिरातीची ( व्यवहार धोरणानें पाहतां ) 'उद्धट' चौकशी केली. तेवढ्यात, रस्त्यानें जातां जातां कोणीसं थबकून म्हटलं—"नमस्कार ..उस्तादजी !" माझ्यासमोरच्या शेटजींनीं हंसून उलट नमस्कार केला.

नांव मोठं गमतीचं वाटलं मला—'उस्तादजी !'

मनांतली जाहिरात–रस्सीखेंच मला जरा नमवीत होती म्हणून; नाही तर वाटत होतं, जाहिरातीसाठीं कव्हरवर उड्या घेण्याच्या गोड गप्पा मारणाऱ्या या 'वस्तादा'चा लागलाच निरोप घ्यावा; नि पुढल्या एखाद्या 'यशस्वी' खटपटीला तरी लागावं !

पण तेवढ्यांत 'उस्तादजीं'च्या गड्यानें आणलेल्या दोन शरबत ग्लासांपैकीं एक आग्रहानें माझ्यापुढें करून, दुसरा स्वतःच्या तोंडाला लावीत ते संथपणें म्हणाले—"ये तो हमारा छोटासा धंदा ! जाहिरातका क्या उपयोग होंगा, बाबूजी ?"

'असल्या सरबती गोडपणापेक्षां सरळ नाहीं म्हणून मला सोडवा कीं !' रिकामा ग्लास पोऱ्याकडे देतांना माझ्या मनांत आलं.

पण उस्तादजींनी आमचे सारे अंक पुन्हा चाळले नि माझ्याकडे सस्मित पाहून पृच्छा केली, "परंतु आपका मासिक पुस्तक तो अच्छा और आकर्षक भि मालुम होता है ! मैं तो मरेठी नहि जानता !...तो क्या ये मरेठी उच्च साहित्य का आदर्श है ना ?...साहित्य कु मैं तो बहुत मानता हूं, बाबूजी !—"

"हां हां !" संपादकांतला जाहिरात एजंट जागा होऊन, तेवढं तरी हिंदी ठांसून बोलूं शकला वेळेवर !

"तो ठीक, बाबूजी ! इसका छ महिनेका दाम क्या होगा ?" एका छापील जाहिरातीवर बोट फिरवीत वस्तादजींनी पृच्छा केली.

तो उंदीर-मांजराचा खेळच असल्यासारखं मला स्पष्टपणें वाटत होतं; तरी देखील अडल्या हरीच्या भूमिकेंत मी सवलतीची आकडेमोड करून सत्तावीस रुपये आठ आणे सांगितले.

'अच्छा, आज तो नही ! परंतु दीवालीके मोसमसे जाहिरात जरूर सुरू करना !'—

प्रथम मला तें खरंच वाटेना; मनांत संशयच खूप आला. पण खूप करण्यासाठीं त्याना अंक परत देऊन मी स्वतःची अधिक खात्री करावी म्हणून त्यांना विचारलं—"मजकूर ?"



"क्या ? आपही संपादक हैं ना ?" वस्तादजी सहास्य म्हणाले "तो— आपही आपके ध्यानमे आवे वैसा लिख दो ! इस्से जादा मै क्या आपको बतावूंगा ?—दुकान का नाम और आप चाहे वैसा मजकूर ! बस्स् !"

मी पायऱ्या उतरण्यापूर्वी त्यांनी एक त्रेतायुगांत छापलेली हिंदी जाहिरात माझ्या हातीं दिली; अत्तराचा बोळा करून माझ्या कोटाला अडकवला व सहास्य नमस्कार केला.

वस्तादजींच्या त्या गूढ वागणूकीनें, त्यांच्या अत्तराच्या कायम जाहिरातीनें, कीं, हातांतल्या त्या अत्तराच्या बोळ्याच्या घमघमाटानें, कोण जाणें, माझं डोकं धुंद झालं होतं.

★

बित्तंबातमी सांगायची म्हणजे,...ॲडव्हान्सचं सोडाच...पण नव्या मासिकांच्या जाहिरातीच्या कॉन्ट्रॅक्ट फॉर्मना, (अगदीं जाहिरात छापल्या-नंतरच्या बिलांनाहि) कांहीं अर्थ नसतो. ही जाहिरात तर त्यांत आणखी तीन महिन्यांनी सुरू व्हायची ! ब्लॉक हातांत नाहीं, मजकूर आमच्या डोक्यांत नि अत्तरवाल्या वस्तादजींचं दुकान नि धंद्याची चलती मी नुकतीच डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली !—

तेव्हां अगदीं दिवाळी पूर्वीच्या जाहिरातपायपाटींतही मी वस्तादजींच्या दुकानाला दूरच्या धोरणानें टाळलं. कारण मला वाटलं—"खात्री करायला आपण जावं नि फट् म्हणतां ब्रह्महत्त्या व्हावी. त्यापेक्षां मनांत बिल येण्याची जी आशा आहे तीच जास्त सुखद !"

शेवटीं, त्यांनी दिलेलं तें जुनाट जाहिरात-चिठोरं शोधून काढून त्याच्या मदतीनें केलेली जाहिरात आमच्या दिवाळीच्या अंकांत एकदां अवतीर्ण झाली !

...एवढंच नव्हे, तर माझे पुढले पांच अंकही वस्तादजींच्या अत्तरानें मी सुगंधीत केले.

★

त्या अवधींत फक्त दिवाळीच्या नंतर एकदांच वस्तादजींचं घमघमणारं एक पाकीट मला आलं. आंत हिना व खस यांचे दोन छोटे बोळे नि बोटभर चिठी होती—एक बोट भरच !—

चिठींत मजकूर होता—"संपादक महाशय.-शुक्रिया! जाहिरात और जाहिरातका स्थान मनपसंद.-कृपाभिलाषि-उस्ताद."

मी मात्र कामाच्या सबबीवर त्या काळांत वस्तादजींना एकदांही भेटलों नाहीं. कारण सारा व्यवहार तोंडी नि जुना होता; विचारांतीं, जाहिरातबाबतच्या कोठल्याही नव्या मासिकाच्या धोरणी प्रथेप्रमाणें, त्या छापलेल्या जाहिरातींचीं बिलं पाठवण्याचा, व्यवहारी पण धोक्याचा मार्गहि मी प्रयासानें टाळला होता.

आणि योगयोग असा, कीं चालता धंदा नि बंद धंदा यांच्या 'मागील वसूलीं'च्या प्रश्नांतील जमीन–अस्मानी फरकाचा प्रत्यक्ष अनुभव येण्याची माझ्यावर शेवटीं पाळी यायला नि तेव्हांच उस्तादजींच्या जाहिरातीची सहा महिन्यांची मुदत संपायला एक गांठ झाली!...

अगदीं ओळखीचे वर्गणीदार, एजंट नि जाहिरातदारहि तोंड वळवतांना किंवा कानावर हात ठेवतांना पाहून, येण्यांच्या कागदी हिशबांत अनोळखी वस्तादजींचं नांव मी साहजिकच बुडित-यादींत घालून मोकळा झालों होतों.

★

तरी पण शेवटीं, खात्री करून घेण्यासाठी, एके दिवशीं सर्व बिलांच्या भुतांना उठवून मी माझ्याबरोबर घेतलं; नि जवळजवळ नऊ महिन्यांनी वस्तादजींचं चिंचोळं दुकान पुन्हां एकदां शोधून काढलं.

चार मंडळी दुकानांत जमून वस्तादजींबरोबर गप्पा मारीत होती.

अशावेळीं मी दबकत दबकतच बैठकीवर जाऊन बसलों.

मित्रांशीं बोलतां बोलतां थबकून, क्षणभर माझ्याकडे ओळखीच्या नजरेनें पाहून, वस्तादजी आस्थेनें म्हणाले–'आइए, महाशय!'

सर्वांबरोबर पुढें आलेला सरबताचा ग्लास घशाखालीं उतरवल्यावर, मी हळूच खिशांतून काढलेलीं बिलं पुढें केलीं.

वस्तादजींनी ती न पहातांच पेटींत टाकलीं; नि पूर्वीसारखाच एक अत्तराचा बोळा माझ्या हातीं देत ते म्हणाले—"आपको तकलीफ पडेगी, संपादक महाशय! परंतु आते गुरुवार शाम आना!—"

...लक्ष्मीदेवीचा कौलच मिळाला होता तो मला!—

★



त्या आश्चर्याच्या धक्क्यांतून जागा झाल्यावर, मी दोन दिवसांनी वस्तादजींकडे गेलों; तेव्हां ते दुकनांत एकटेच होते;...बराच वेळ मी बसलों; त्यांची दत्ताची पूजा चालली होती; मग पेढे, सरबत सर्व झालं; मला रीतसर अत्तराचा बोळा देऊन, ते शेवटीं मला म्हणाले–"देखीये! मैं एक गरीब आदमी हूं; अभी जाहिरात कृपया बंद रखना!—"

त्यांच्या त्या आदबशीर शब्दांत डोकावणारं (आमच्या मराठी 'भारदस्त' मासिकांच्या भवितव्याबद्दलचं) अज्ञान मला सहन होईना; तसं पहातां व्यवहारी दृष्टीनें थोडा धोका होता; तरी मी त्यांना (मासिक बंद पडल्याची) सारी खरी खरी वस्तुस्थिती सांगितली.

'अरर्!' एवढे दुःखसूचक शब्द उच्चारून वस्तादजी गप्प झाले; त्यांचा चेहराहि थोडा पालटला..

क्षणभरानें मी हळूच दबल्या आवाजांत विचारलं, "झालेलं बील देणार ना?"

"हां! देना तो जरूर! हरगिज देनाहि पडेगा!" माझ्या प्रश्नावर वस्तादजी पटकन् नि मोठ्यानें म्हणाले; पण मग किंचित थांबून म्हणाले... "परंतु देखीये, महाशय, एकदम एक दफेमें तो इतनी रकम देना मुझे मुष्किल पडेगा!"

तें नकारघंटेचंच अपेक्षित परिचित 'सूतोवाच' समजून मी गप्प बसलों.

तेवढ्यांत वस्तादजी दुकान बंद करायला उठत मला म्हणाले—"धका खानेकी और तकलीफकी बात होगी! परंतु दर गुरुवार शाम को आप इधर कृपा करके आना! घंटा देडघंटा ठेरना...दत्ताजीका प्रसाद और शरबत ग्रहण करना!...और जातेवख्त उस्ताद जो कुछ रुपया दो रुपया दे देगा ये भी लेके जाना! क्या? ख्यालमें आया होगा ना?"

तसली वसूली म्हणजे एक तारखेचा नाचच होता; पण त्यांतही मला एक नवीनच गंमत वाटली. मनांत म्हटलं—"कांहीं हातीं नाहींच लागलं, तर निदान हा वस्ताद किती वस्ताद माणूस आहे, तें तरी पाहूं जवळ बसून!—'

मी नमस्कार करून जाऊं लागतांच, दुकानाचं बंद कुलुप एकदोनदां

खडखडवून पहात, वस्तादजी माझ्याकडे वळून सस्मित म्हणाले—“ भूलना नहीं, महाशय !...दर गुरवार शाम !...तकलीफ माफ !... ”

★

पुढच्या गुरुवारीं संध्याकाळीं मी काळबादेवी रस्त्यानें जात असतां मनांत म्हणत होतों ..“ कसला सापडतोय् तो वस्ताद —आपण येणार हें नक्की ठाऊक असल्यावर ? ”

आणि दुकांनात शिरल्यावरही तोच अनुभव आला. ‘ वस्तादजी आज येतीलच असं नक्की नाहीं.’ मला आतां परिचित झालेला त्यांच्या दुकानांतील तो पोऱ्या म्हणाला.

तेव्हां, लबाड अघळपघळ बोलणाऱ्या, व्यवहार मांडून बसलेल्या जगांतल्या सगळ्या वस्तादांना मनांतल्या शिव्या देत, थोड्या रागांतच परत फिरण्यावाचून मला दुसरं गत्यंतर दिसेना !

पण त्या गूढामुळेंच मात्र तिसऱ्या गुरुवारीं वस्तादजींची पुन्हां आठवण झाली मला !

यावेळीं वस्तादजी भेटले. ( आदल्या गुरवारीं, बेत ठरवून, एक प्रसिद्ध कुस्ती पहायला ते गेले होते. ) मला त्रास पडल्याबद्दल त्यांनी माफी मागितली नि मग त्यांनीं आपण पूर्वी कसकशा कुस्त्या खेळलों होतों, आपले शिष्य कसे आहेत, वगैरे विविध रसभरित वर्णनहि केलं.

पण प्रसाद, सरबत नि अत्तर या प्रत्यक्ष गोष्टी नि पुढील गुरुवारचं आणखी एक अप्रत्यक्ष आश्वासन, याशिवाय त्या दिवशींही मला कांहीं मिळालं नाहीं ! —

त्या दिवशीं परततांना तर पैशाबद्दलची अधिकच निराशा नि जगांतील व्यवहाराबद्दलची भयंकर खिन्नताच माझ्या मनांत भरून आली होती.

★

तरीहि चौथ्या गुरवारीं, व्यसनी मनुष्य जसा गुत्त्याकडे जातो, तसा ( पूर्ण निराशा मनांत ठेऊनच ) मी वस्तादजींच्या व्यवहारी गूढाकडे आकर्षिला गेलों.

नेहमीप्रमाणें बऱ्याच गप्पा झाल्यावर, शुक्रवारच्या एका भजनी मेळ्याला मला आमंत्रण देऊन, ते बैठकीवरून उठले.



आणि मग जणूं सहजच खालीं वांकून, पेटींत असलेले सगळेच सहा रुपये त्यांनीं बाहेर काढले. दोनदां मोजले, आपले खिसे चाचपले नि मग ते सहाहि रुपये माझ्या हातीं पटकन् देऊन ते म्हणाले,...“ आपका तीन गुरवारका हिसाब तो हो चुका ना, बाबूजी ? ”

त्यावेळीं माझ्या अंगांतून सरकन् एक अनपेक्षित नि अननुभूत भावनांची लाट उठून गेली. जगांतला तो प्रत्यक्ष अनुभव मला स्वप्नवत् नि अगदींच अतर्क्य वाटत होता—

माझ्या मनांतील आजपर्यंतच्या त्यांच्याबद्दलच्या कुत्सित कल्पनांबद्दल क्षणभर माझी मलाच भयंकर लाजहि वाटली !...

मला वाटलं—“ वस्ताद वस्ताद माणूस नाहींत ! वस्ताद माणूस आहेत !”

★

त्या पुढल्या तीन गुरुवारीं, वस्तादजींच्या गप्पा, पेढे, सरबत नि ( तीन अधिक एक, अधिक दोन, असे ) आणखी सहा रुपये इतक्या गोष्टी त्यांच्या खात्यांत जमा झाल्या होत्या.

त्या पुढे दोन आठवडे साफ रिते गेले. त्यांतल्या शेवटच्या आठवड्याला वस्तादजींनी त्यांच्या दोन शिष्यांच्या कुस्तीच्या ( त्यांनी पुढील गुरवारीं ठरवलेल्या ) समारंभाचं तिकिट मला बक्षीस दिलं.

आपण न भेटण्याची ती त्यांची नोटीसच होती मला. पण मी मात्र गुरुवारीं कुस्ती पहायला जाण्याची चिकाटी ठेवली.

त्यावेळची वस्तादजींची आवेशपूर्ण समरसता मला मोठी अभिनव नि गमतीची वाटली. आपल्या दोन्ही शिष्यांची बरोबरी झाल्यावर, त्यांना दोन बगलेंत कौतुकानें घेऊन ते गर्दींत उभे असतानाच, तेथून मी काढता पाय घेतला.

पुढल्या गुरुवारीं त्या कुस्तीविषयीं बोलण्यांतच वस्तादजी रंगले होते. त्यांनीं किंवा मी कोणीच पैशाची गोष्ट काढली नाहीं.

शेवटीं, उठतां उठतां मात्र, त्यांनी नवी बातमी मला सांगितली—महिना-अखेर तें दुकान काढून टाकून ते कनोजला परत जाणार होते !

★

खरंच ! माणसाचं मन मोठं स्वार्थी नि गुंतागुंतीचं असतं !

नऊ महिन्यांपूर्वी वस्तादजींच्या दुकानांत मी प्रथमच पाऊल टाकलं; तेव्हां मला कसलीच आशा नव्हती. पुढें त्यांनी जाहिरात दिल्यानंतरच नव्हे, तर ती सहा महिने छापून झाल्यावरही, मला कसली मूर्ती अपेक्षा नव्हती. एवढंच काय, पण पहिले तीन गुरुवार त्यांचे पेढे सरबत खाऊन पिऊनही, मला कशाबद्दल खात्री नव्हती.

पण तरी देखील, त्यापुढील महिन्यांत त्यांनी मला अनपेक्षित बारा रुपये दिले होते. अजून साडेपंधराचा हिशेब उरला असला, तरी त्यांचं आतांपर्यंतचें प्रेमळ आदरातिथ्य मी मनमुराद आस्वादित आलों होतों.

पण मग 'दुकन काढून, मुलखांत जाणार' ही आडपडदा न ठेवतां त्यानीच सांगितलेली बातमी ऐकल्यानंतरच्या गुरुवारीं त्यांच्या दुकानाकडे वळताना, एक दुष्ट विचारी संशय माझ्या मनांत वारंवार डोकावत होता— "वस्तादजी दुकान सोडून गेलेलेच तर दिसणार नाहींत ना आपल्याला आज ?"

माझ्या त्या स्वार्थी मनांत असं मात्र आलं नाहीं, कीं, अगदीं पहिल्या अगर पुढच्या कोणत्याहि गुरुवारीं (आपलं दुकान आहे तिथेंच कायम ठेवूनहि) वस्तादजींना, एका क्षणांत, मला वाटाण्याच्या अक्षता व काळबादेवीचा रस्ता दाखवता आला असता !

★

पण माझं मानवी मन तसं कितीहि वाकड्यांत शिरलं, तरी वस्तादजी मात्र मी तिथें पोहोंचण्यापूर्वीच दुकानांत येऊन बसले होते.

आजहि दर गुरुवारप्रमाणेंच सर्व झालं; नि शेवटीं, ते माझ्याकडे सस्मित पहात म्हणाले—" हा ! अभि कुछ कहिये, महाशय ! "

पूजेपूर्वी बराच वेळ आमच्या गप्पा झाल्या होत्या; त्यांत आपला बेत नक्की झाल्याचंच त्यांनी मला पुन्हा सांगितलं होतं.

" एकाकी मनुष्य; एक लहानसं मालकीचं घर; लहानपणापासून तालमीचा नाद; आखाडा एक आवडता होता. एका कुरशीच्या कुस्तींत उजव्या पायाचं हाड मोडलं; तीन वर्षांपूर्वी औषधोपचारासाठीं मुंबईत आलों. मालीश



वगैरे उपचार चालू असतां, दिवसभर मनाला करमणूक म्हणून हें दुकान काढलं; एक कनोजी मित्र अत्तराचा धंदा करतो म्हणून दुकानांत अत्तरं ठेवलीं. तीन वर्षांत मुंबईतही मित्र झाले. भजनी मेळे केले. कुस्त्या पाहिल्या, करवल्या आतां पाय जरा बरा आहे; तेव्हां मुलखाला परत जाण्याचे दिवस आले. स्वतः कुस्ती नाही यापुढें मारतां येणार. पण कुस्ती मारणारे जवान तालमींत तयार करूं ! उरला वेळ साहित्य वाचूं !—हाच आतां आपला आवडता धंदा !—" वगैरे ते खूप बडबडले होते, माझ्याकडे !

माझा त्यांचा आतां इतका परिचय झाला होता, कीं, तें ऐकल्यावर, त्यावेळीं, एकादा नातेवाईकच दूर देशाला कायमचा जात असावा, इतकं दुःख वाटत होतं मला !—

★

पण तेवढ्यांत पेटी उघडून वस्तादजींनी एक दहा रुपयांची नोट चटकन् माझ्या पुढें केली नि ते म्हणाले—" आप कहोगे वस्तादजी बहोत बूरा आदमी था ! माफ कीजीयेगा, बाबूजी ! आपको मेरेलीये बहोत तकलीफ उठाने पडी !—अच्छा ! तो आते गुरवार भि आप आना ! आपकी बाकी सब आने पै तक चूकती होगी ! "

ती नोट नि वर आणखी वस्तादजींचे ते शब्द ऐकून मात्र माझं हृदय पार विरघळलं !—अगदीं अभावितपणें माझ्या डोळ्याच्या कडाहि ओल्या झाल्या. न बोलतांच कंठ दाटून आला.

मी जरा घसा खाकरून म्हटलं,—" असं काय बरं, वस्तादजी ? अगदीं सारंच्या सारं देऊन असं लाजवूं नका, बुवा !—आतां उरलेला साडेपांच रुपयांचा हिशेब स्नेहाखातर तोडून टाकण्याची संधि मला द्या ! माझ्यावर मोठे उपकार होतील आपले !—"

वस्तादजी हंसले व म्हणाले—" अच्छा, महाशय ! जैसी आपकी मर्जी !—मैं भी मुलुखमे आपके ये दामकी और आपकी कभी कभी याद करूं गा !—"

★

नि पुढल्या गुरुवारीं मी केवळ स्नेही या नात्यानें शेवटच्या भेटीसाठीं वस्तादजींच्या दुकानाकडे वळलों.

दत्ताचे पेढे, सरबत, उदबत्तीचा घमघमाट नि वस्ताजींच्या अत्तरांचा बोळा ! सर्व आतां माझ्या अगदीं अंगवळणीं पडलं होतं !

त्यांच्या दुकानांत मला नेहमीं नर-नारायणाची भेट झाल्यासारखं वाटे !—

पण तेथें गेलों, तों दुकानाला कुलुप होतं; दारावर पाटी होती—‘ दुकान भाड्यानें देणें आहे.’

★

कुठले वस्तादजी नि कुठला मी ?—कुठल्या कारणानें आमची ओळख झाली ? वाढली,...संपली !—नि आतां वस्तादजी मुलखाला गेले. माझी त्यांना आठवण कधीं कधीं होईल असे ते म्हणाले होते खरे ! पण व्यवहाराशिवाय त्यांच्या बाबतींत मी कांहींच केलं नव्हतं, माझी त्यांना आठवण यायला !

पण त्यांनी मात्र माझ्यापाशीं असामान्य औदार्य, प्रेम नि माणुसकी दाखवली होती ! अगदीं व्यवहारांतसुद्धां तें असामान्य माणुसकीनें वागले...

व्यवहाराच्या दारांतूनच ते माणूस म्हणून माझ्या मनाच्या घरांत शिरले होते !

★

नि म्हणूनच—चालू आयुष्यतल्या कठोर व्यवहाराची झळ मला कधीं असह्य झाली नि मन अगदीं बेचैन झालं...किं ( दर नाहीं तरी निदान एखाद्या गुरुवारीं तरी ) मी मुद्दाम एक नंबरच्या ट्रामनें त्या बाजूस जातो; नि ते परिचित चिंचोळं दुकान जवळ येऊं लागलं, कीं तिकडे भिरभिऱ्या दृष्टीनें खिडकींतून पाहूं लागतों.

त्याचं बदललेलं बाह्य स्वरुप माझ्या दृष्टीसमोरुन विरतं; नि तिथं माझ्या दृष्टीला वस्तादजींची ती भव्य प्रेमळ मूर्ती, पेहलवानी थाटांत तिथल्या गादीवर बसून, येणाऱ्याना जाणाऱ्यांना अत्तरानें चपचपलेले बोळे वाटत आहे, सरबत पेढे आग्रहानें देत आहे, उदबत्ती-कापूर दत्ताभोंवतीं ओवाळत आहे, असा सारखा भास होतो.

—आणि म्हणूनच ट्राम पुढें निघून जाऊं लागली, तरी सारखं पुन्हा पुन्हा मागें वळून, मी स्वतःशींच मनांतल्या मनांत म्हणतो -“ हं ! पाहिलंस ? हेंच हो तें उस्तादजींचं देऊळ !!”

[ १. ४४ ]

# पाताळ—यंत्र ! ★ ★ ★ रघुवीर सामंत

[ आगष्ट क्रांती मधली एक कहाणी ]

## उपोद्घात.

स्वातंत्र्य युद्ध !—त्यांत प्रत्येक जीव तनमनधनेंकरुन आपापल्या कुवतीप्रमाणें भाग घेत असतो !—परतंत्र हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-युद्धामधल्या या करुण कहाणीची सुरवात ट्राममध्यें होत असली तरी शेवट मात्र स्वखुशीनें मृत्यूच्या फांसावर लटकलेला आढळेल !

★

धांवतच जाऊन त्यानें ट्राम पकडली; सांखळीखाली वांकून कसा बसा तो आंत शिरला ! नेहरूशर्टची सैल बाही आणि बोंगडीचें जॅकेट यांच्या दरम्यान खांकेत दुडलेला फ्री प्रेस व एक जाडजूड पुस्तक होतें. ट्राम पुढें-मागें अगदीं चिक्कार भरली होती.

त्यानें वरचा मजला गांठला. पण तेथेंहि अगदीं थेट पुढल्या टोंका-पर्यंत,—जायच्या यायच्या रस्त्यांत मुद्धां—माणसांची गर्दी ! उरलें मागल्या बाजूचें अर्धवर्तुळ बांक !

हातांतील ‘ क्रॅव्हन ए ’चा डबडा व मॅच बॉक्स एखाद्या गोजिरवाण्या लाडक्या छकुल्याप्रमाणें मांडीवर आंजारुन गोंजारुन वागवीत, तोंडातल्या जळक्या थोटकांतून ऐटीत धूर सोडणाऱ्या व “ वधारे ”तले घोडे, त्यांचीं वजनें, जॅकी व मागला इतिहास अजमावीत असलेल्या एका वुलन सूटांतील लठ्ठ लखपतीनें वर्तुळबांकाचें टोंक व्यापलें होतें.

त्याच्या अलीकडे एकाग्रतेनें टाइम्स वाचत एक चाळिशी लावलेले, चाळिशी उलटलेले गृहस्थ बसले होते. बहुतेक तो प्राणी पुढल्या प्रमोशनची

थडमनानें वाट पहाणारा व 'हिंदुस्थान स्वराज्याला अजून लायख नाहीं' असें म्हणणारा एखादा मावाप सरकारचा कायम कारकून असावा; किंवा एटिमॉलजी ॲनॅलेसिसमध्यें रंगणारा एखादा जुन्या पिढीतील निरुपद्रवी 'मॅकमॉर्डी' मास्तर असावा.

त्याच्या अलीकडे एका फेज कॅपवाल्यावरोवर आपली दाढी अभिमानानें गोंजारीत कोणी मौलवी पाकीस्तानमध्यॆंच बसल्यासारखा बसून पाकीस्तानबद्दल बोलत होता.

त्यानंतर दोन शाळकरी पारशी पोरें स्वैर आरडाओरड करून जाणाऱ्या येणाऱ्या रस्त्यावरल्या माणसांची मनसोक्त टिंगल करीत होतीं.

—आणि अगदीं शेवटीं ट्रामच्या मागल्या जिन्याला कुंपण घालणाऱ्या टोंकाकडच्या कठड्याला रेलून एक कोणी खादी सूट घातलेला मनुष्य शांतपणें चौफेर पहात बसला होता. हिंदुस्थानच्या बजबजपुरी मधले सर्व प्रतिनिधी तिथें हजर होते.

अगदीं कुठेंहि जागा नव्हती बसायला! इतक्यांत तीं पारशी पोरें हंसत खेळत जागेवरून उठलीं, नि नेमकी त्या खादी सूटवाल्याजवळचीच जागा त्याच्यासाठीं रिकामी झाली!

★

बसल्यावर त्यानें गांधी टोपी काढून मांडीवर ठेवली, नि हातातलें जाडें पुस्तक उघडलें. तोंच कट्कट् करत कंडक्टर समोर येऊन उभा!

त्याच्या एका खिशांतून कांहीं घडी केलेले पिवळसर कागद निघाले; ते गडबडीनें त्यानें तसेंच पुन्हां त्या खिशांत कोंबले. दुसऱ्या खिशांतून दोन पैसेच; वरच्या खिशांतून दहाची एक, पांचाची एक व रुपयाच्या एक दोन नोटा!

शेवटीं त्यांतली एका रुपयाची नोटच कंडक्टर पुढें धरीत तो म्हणाला, "धोबीतलाव—"



"हं ठेवा ती पुन्हां खिशांत!—सुटे नाहींत साहेब." आपल्या कडेवरच्या चामड्याच्या पिशवीला नेहमीच्या सरावाचा एक सफाईदार हिसका देऊन कंडक्टरनें ती वर उचलली आणि आंत डोकावून पाहिलें.

अगतिकपणें त्यानें खिशे फिरून एकदां चाचपले व म्हटलें, "मग! माझ्याकडेहि नाहींत!"

"त्याला आम्हीं तरी काय करणार? हा बघा कागदी नोटांचा भारा नि हे पैशासारखे किणकिण वाजणारे रुपयेहि! पण सारी चिल्लर नुकतीच खलास झाली! असती तर काय भाजी करायला ठेवली असती?"

"आणि आम्हीं तरी काय चिल्लर रुजत घालणार आहोंत, असं वाटतं तुला?" तो किंचित त्राग्यानें पुस्तक पटकन बंद करीत म्हणाला.

— "तें मला नाहीं माहित—" कंडक्टर शेजारी वळून मिळतें घेण्याच्या उद्देशानें थोड्या विनोदी स्वरांत हंसत म्हणाला, "अहो, पण भांडण कशाला साहेब उगीच? सुटे पैसे नाहींत म्हणजे दिवाळं काय तुमचं आमचं निघालंय थोडंच? मुद्याची गोष्ट तेवढी लक्षांत घ्या. तो रुपाया द्या इकडं पाहिजे तर! पण मग उरलेले पैसे बोरीबंदरावर जाऊन ऑफिसांत घ्यावे लागतील कंपनीच्या! नाहीं तर आपले इथंच खालीं उतरा!"

"बरं बुवा!" तो त्राग्यानें उठत कुरकुरत म्हणाला, "कोणीहि कोणाला दम द्यावा मावापसरकारच्या या चालू औट घटकेच्या राज्यांत!—सभ्यपणा राहिलाहेच कुठं मुळीं जगांत?"

त्यावर कंडक्टरनें आपलें मौन व्रत स्वीकारलें. तो केस पिकलेला शहाणा आदमी होता.

इतक्यांत, इतका वेळ गप्प राहून सारें ऐकत, पहात असलेला तो त्याचा खादी सूटवाला शेजारी आपल्या खिशांत हात घालीत त्याला थांबवून म्हणाला, "बसा मिस्टर बसा! देरे त्यांना धोबीतलावचं तिकीट! हे घे सहा पैसे"—

थडमनानें वाट पहाणारा व 'हिंदुस्थान स्वराज्याला अजून लायख नाहीं' असें म्हणणारा एखादा मावाप सरकारचा कायम कारकून असावा; किंवा एटिमॉलजी ॲनॅलेसिसमध्यें रंगणारा एखादा जुन्या पिढीतील निरुपद्रवी 'मॅकमॉर्डी' मास्तर असावा.

त्याच्या अलीकडे एका फेज कॅपवाल्यावरोबर आपली दाढी अभिमानानें गोंजारीत कोणी मौलवी पाकीस्तानमध्येंच बसल्यासारखा बसून पाकीस्तानबद्दल बोलत होता.

त्यानंतर दोन शाळकरी पारशी पोरें स्वैर आरडाओरड करून जाणाऱ्या येणाऱ्या रस्त्यावरल्या माणसांची मनसोक्त टिंगल करीत होतीं.

—आणि अगदीं शेवटीं ट्रामच्या मागल्या जिन्याला कुंपण घालणाऱ्या टोंकाकडच्या कठड्याला रेलून एक कोणी खादी सूट घातलेला मनुष्य शांतपणें चौफेर पहात बसला होता. हिंदुस्थानच्या बजबजपुरी मधले सर्व प्रतिनिधी तिथें हजर होते.

अगदीं कुठेंहि जागा नव्हती बसायला ! इतक्यांत तीं पारशी पोरें हंसत खेळत जागेवरून उठलीं, नि नेमकी त्या खादी सूटवाल्याजवळचीच जागा त्याच्यासाठीं रिकामी झाली !

★

बसल्यावर त्यानें गांधी टोपी काढून मांडीवर ठेवली, नि हातातलें जाडें पुस्तक उघडलें. तोंच कट्कट् करत कंडक्टर समोर येऊन उभा !

त्याच्या एका खिशांतून कांहीं घडी केलेले पिवळसर कागद निघाले; ते गडबडीनें त्यानें तसेंच पुन्हां त्या खिशांत कोंबले. दुसऱ्या खिशांतून दोन पैसेच; वरच्या खिशांतून दहाची एक, पांचाची एक व रुपयाच्या एक दोन नोटा !

शेवटीं त्यांतली एका रुपयाची नोटच कंडक्टर पुढें धरीत तो म्हणाला, "श्रोबीतलाव—"



"हं ठेवा ती पुन्हां खिशांत !–सुटे नाहींत साहेब." आपल्या कडेवरच्या चामड्याच्या पिशवीला नेहमीच्या सरावाचा एक सफाईदार हिसका देऊन कंडक्टरनें ती वर उचलली आणि आंत डोकावून पाहिलें.

अगतिकपणें त्यानें खिशे फिरून एकदां चाचपले व म्हटलें, "मग ! माझ्याकडेहि नाहींत !"

"त्याला आम्हीं तरी काय करणार ? हा बघा कागदी नोटांचा भारा नि हे पैशासारखे किणकिण बाजणारे रुपयेहि ! पण सारी चिल्लर नुकतीच खलास झाली ! असती तर काय भाजी करायला ठेवली असती ?"

"आणि आम्हीं तरी काय चिल्लर रुजत घालणार आहोंत, असं वाटतं तुला ?" तो किंचित त्राग्यानें पुस्तक पटकन बंद करीत म्हणाला.

"तें मला नाहीं माहित–" कंडक्टर शेजारी बळून मिळतें घेण्याच्या उद्देशानें थोड्या विनोदी स्वरांत हंसत म्हणाला, "अहो, पण भांडण कशाला साहेब उगीच ? सुटे पैसे नाहींत म्हणजे दिवाळं काय तुमचं आमचं निघालंय थोडंच ? मुद्याची गोष्ट तेवढी लक्षांत घ्या. तो रुपाया द्या इकडं पाहिजे तर ! पण मग उरलेले पैसे बोरीबंदरावर जाऊन ऑफिसांत घ्यावे लागतील कंपनीच्या ! नाहीं तर आपले इथंच खालीं उतरा !"

"बरं बुवा !" तो त्राग्यानें उठत कुरकुरत म्हणाला, "कोणीहि कोणाला दम द्यावा मावापसरकारच्या या चालू औट घटकेच्या राज्यांत !–सभ्यपणा राहिलाहेच कुठं मुळीं जगांत ?"

त्यावर कंडक्टरनें आपलें मौन व्रत स्वीकारलें. तो केस पिकलेला शहाणा आदमी होता.

इतक्यांत, इतका वेळ गप्प राहून सारें ऐकत, पहात असलेला तो त्याचा खादी सूटवाला शेजारी आपल्या खिशांत हात घालीत त्याला थांबवून म्हणाला, "बसा मिस्टर बसा ! देरे त्यांना धोबीतलावचं तिकीट ! हे घे सहा पैसे"—

आणि कंडक्टरनें स्वतःच पटकन निर्णय घेऊन फाडलेलें हिरवें तिकीट त्याच्या हातांत दिलेंहि !

★

"आश्चर्य नको वाटायला !" भांबावलेल्या नेहरुशर्टवाल्याकडे पहात तो सूटवाला म्हणाला, "अहो यथा राजा तथा प्रजा !"

त्यावर दोघेहि सौम्य हंसले. नेहरुशर्टवाला आभारादाखल अर्धवटच म्हणाला,—थँक्स् पण तुम्हीं उगीच—"

"ओ नेव्हर माइन्ड"

त्यानें खाली बसून पुस्तक उघडलें व पुन्हां वाचायला सुरवात केली.

पण मग मिनिट दोन मिनिटांच्या चुळबुळीनंतर त्यानें तें पुन्हां मिटलें-खिशे पुन्हां चांचपले, नि त्यांतून मघां आंत टाकलेले सुटे दोन पैसे काढून त्या शेजाऱ्यापुढें करीत तो म्हणाला, "हें पहा मिस्टर, माझ्याकडे दोनच पैसे सुटे आहेत सध्या! तेवढे तरी घ्याल कां हे?-आणि उरलेला एक आणा कुठें ...?"

"तुम्हीं तर एखाद्या अकाउंटन्टप्रमाणें हिशेब करूं लागलांत कीं हो?"

"देण्याचा हिशेब माणसानं आधीं करावा जगांत !"

"बरं बुवा ! तुमच्या मनासारखं होऊं द्या !-पण-एकमेकांसाठीं आपण एवढं सुद्धां करायचं नाहीं तर मग-?"

त्या अनोळखी माणसाच्या त्या आपुलकीच्या उद्गारामुळें शर्ट जॅकेट, वाल्यानें त्याच्या खादी पोशाखाकडे एक अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकला.

दोघांनाहि एकमेकांबद्दल आपुलकी वाटण्यास सहज जागा करून देणारी एक विशेष गोष्ट होती दोघांकडे !—

—खादी !—

★



ट्राम पुढें चालली होती !

रस्ता दुतर्फा गजबजलेला होता. शांत मुंबापुरीतील स्मशान शांतता कायम ठेवणारे पिवळी पगडीवाले लाठीबहाद्दर रुळांच्या दोन्ही बाजूला ठिकठिकाणीं फर्लांगाफर्लांगावर उभे राहून, हिंदुस्थानच्या चालू शांतता गीतांतले प्रास-अनुप्रास-लाटानुप्रास, मोरोपंत वामनपंडित यांच्या कौशल्यानें साधत होते.

तोंच हिंदुस्थानच्या जंगी 'वॉर एफर्ट'चा लोखंडी आवाज समोरून ऐकूं येऊं लागला. रणगाड्यांच्या एका लांबलचक शृंखलेची ती हालचाल-पहिला, दुसरा-तिसरा-त्या साखळीचा एकेक दुवा मागल्या-(म्हणजे दादरच्या) बाजूस गडबडीनें सरकत होता !

ते दोघे आपल्याशींच व एकमेकांशीहि मधून मधून सौम्यपणें हसत होते.

दोघांनाहि एकमेकांशी कांहीं बोलावेसें वाटत होतें. पण दोघेहि कांही न बोलण्याचा शहाणपणा करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते.

"परवां परवां फ्रान्समध्यें दोस्तांनी डीइपवर एकाएकी भडिमार केला. ती तिथली एका दिवसांत बंद पडलेली दुसरी आघाडी लढविणाऱ्या "चर्चिल टँन्कां"पैकींच कां हो हीं सारीं ?" शेवटीं खोंचक प्रश्न व सूक्ष्म हास्य यांसह बोलण्याला तोंड फोडण्यावांचून त्याच्यानें राहवेना. "नव्हे, नव्हे ! याऽना ? अमेरी गाड्या !" खादी सूटवालाहि त्याचा रोख लक्षांत घेऊन हंसत म्हणाला, "पण दोन बाजूच्या त्या सरपटणाऱ्या नि जमिनीवर नाक घांसत तिला विलगणाऱ्या भेदी सांखळ्या दिसताहेत ना ? त्या मात्र इथल्याच-हिंदी पेटंटच्या ! एक कायदेआझम जिना पेटंट नि दुसरें लोकनायक अणे-कम्युनिस्ट पेटंट !"

"अरेच्या ! संपतच नाहीं अजून ही माळ ? सारखी धावतेच आहे कीं अखंड !"

"हं ! हिंदुस्थानला तरी शृंखला लौकर सुटण्याची आशा कुठें आहे आतां ?" सूटवालाहि कुत्सित हंसून पुन्हा म्हणाला.

आणि कंडक्टरनें स्वतःच पटकन निर्णय घेऊन फाडलेलें हिरवें तिकीट त्याच्या हातांत दिलेंहि !

★

"आश्चर्य नको वाटायला !" भांबावलेल्या नेहरुशर्टवाल्याकडे पहात तो सूटवाला म्हणाला, "अहो यथा राजा तथा प्रजा !"

त्यावर दोघेहि सौम्य हंसले. नेहरुशर्टवाला आभारादाखल अर्धवटच म्हणाला,—थँक्स् पण तुम्हीं उगीच—"

"ओ नेव्हर माइन्ड"

त्यानें खाली बसून पुस्तक उघडलें व पुन्हां वाचायला सुरवात केली.

पण मग मिनिट दोन मिनिटांच्या चुळबुळीनंतर त्यानें तें पुन्हां मिटलें-खिशे पुन्हां चांचपले, नि त्यांतून मघां आंत टाकलेले सुटे दोन पैसे काढून त्या शेजाऱ्यापुढें करीत तो म्हणाला, "हें पहा मिस्टर, माझ्याकडे दोनच पैसे सुटे आहेत सध्या! तेवढे तरी घ्याल कां हे?-आणि उरलेला एक आणा कुठें ...?"

"तुम्हीं तर एखाद्या अकाउंटन्टप्रमाणें हिशेब करूं लागलांत कीं हो?"

"देण्याचा हिशोब माणसानं आधीं करावा जगांत !"

"बरं बुवा ! तुमच्या मनासारखं होऊं द्या !—पण—एकमेकांसाठीं आपण एवढं सुद्धां करायचं नाहीं तर मग—?"

त्या अनोळखी माणसाच्या त्या आपुलकीच्या उद्गारामुळें शर्ट जॅकेट, वाल्यानें त्याच्या खादी पोशाखाकडे एक अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकला.

दोघांनाहि एकमेकांबद्दल आपुलकी वाटण्यास सहज जागा करून देणारी एक विशेष गोष्ट होती दोघांकडे !—

—खादी !—

★



ट्राम पुढें चालली होती !

रस्ता दुतर्फा गजबजलेला होता. शांत मुंबापुरीतील स्मशान शांतता कायम ठेवणारे पिवळी पगडीवाले लाठीबहाद्दर रुळांच्या दोन्ही बाजूला ठिक-ठिकाणीं फर्लांगाफर्लांगावर उभे राहून, हिंदुस्थानच्या चालू शांतता गीतांतले प्रास—अनुप्रास—लाटानुप्रास, मोरोपंत वामनपंडित यांच्या कौशल्यानें साधत होते.

तोंच हिंदुस्थानच्या जंगी 'वॉर एफर्ट'चा लोखंडी आवाज समोरून ऐकूं येऊं लागला. रणगाड्यांच्या एका लांबलचक शृंखलेची ती हालचाल—पहिला, दुसरा—तिसरा—त्या साखळीचा एकेक दुवा मागल्या—(म्हणजे दादरच्या) बाजूस गडबडीनें सरकत होता !

ते दोघे आपल्याशींच व एकमेकांशीहि मधून मधून सौम्यपणें हसत होते.

दोघांनाहि एकमेकांशी कांहीं बोलावेसें वाटत होतें. पण दोघेहि कांही न बोलण्याचा शहाणपणा करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते.

"परवां परवां फ्रान्समध्यें दोस्तांनी डीइपवर एकाएकी भडिमार केला. ती तिथली एका दिवसांत बंद पडलेली दुसरी आघाडी लढविणाऱ्या "चर्चिल टँन्कां"पैकींच कां हो हीं सारीं ?" शेवटीं खोंचक प्रश्न व सूक्ष्म हास्य यांसह बोलण्याला तोंड फोडण्यावांचून त्याच्यानें राहवेना. "नव्हे, नव्हे ! याऽना ? अमेरी गाड्या !" खादी सूटवालाहि त्याचा रोख लक्षांत घेऊन हंसत म्हणाला, "पण दोन बाजूंच्या त्या सरपटणाऱ्या नि जमिनीवर नाक घांसत तिला विलगणाऱ्या भेदी सांखळ्या दिसताहेत ना ? त्या मात्र इथल्याच—हिंदी पेटंटच्या ! एक कायदेआझम जिना पेटंट नि दुसरें लोकनायक अणे-कम्युनिस्ट पेटंट !"

"अरेच्या ! संपतच नाहीं अजून ही माळ ? सारखी धावतेच आहे कीं अखंड !"

"हं ! हिंदुस्थानला तरी शृंखला लौकर सुटण्याची आशा कुठें आहे आतां ?" सूटवालाहि कुत्सित हंसून पुन्हा म्हणाला.

तोंच हिंदुस्थानची नव्हे, पण त्या रणगाड्यांची ती सांखळी तरी तुटली–संपली. दिमाख दाखवणाऱ्या साम्राज्यशाहीची हमरस्त्यावरली ती भेसुर घर-घर लांब-लांब-खोल खोल जात शेवटीं तात्पुरती तरी बंद पडली.

क्षणभर झालेली पांगापांग संपली, रस्ता पुन्हां गजबजला.

★

सहा नंबरची ती ट्राम पुढें चाललीच होती.—

मधून मधून डाव्या उजव्या बाजूस, पोटांत भडभडून आल्याप्रमाणें धूर सोडणाऱ्या गिरण्याची आंवारें लागत होतीं. दगडी कोटाच्या भिंतीत चिणून बसवलेल्या फाटकांच्या लोखंडी दारांना गौरीप्रमाणें सजवून शोभा आणणाऱ्या सोल्जरांच्या करड्या गाड्या व जवळच बंदुका घेऊन उभे असलेले खाकी पोशाखांतील गाजरी चेहरेहि दिसत होते.

"हं ! 'वि' म्हणजे विजय !! डिफेन्स लोन विकत घ्या !! चाकें फिरतीं ठेवा ! यंत्रें चालूं ठेवा."—तो शेजाऱ्याकडे पहात तिरस्कार दाखवणाऱ्या चेहऱ्यानें खटक्यांत म्हणाला. त्या त्याच्या उद्गारांतील सारीं अवतरण चिन्हें लक्षांत घेऊन शेजारचा खादी सूटवाला मान हलवून म्हणाला, "हो, हो ! आणि त्यांत जिवंत माणसें मेलीं तरी कांहीं हरकत नाहीं !–अहो, लोखंडाचा भाव सध्या फार वधारला आहे, तेव्हां रक्ताला किंमत आहे कुठें सध्या ? आकाशांत नि जमिनीवर–सगळीकडे रक्ताचा महापूर पाऊस पडतोय् !"

"पण निर्जीव लोखंडी यंत्रांतच सामील झालेल्या मजुरांना तरी सध्या बोनस नि महागाई मिळते थोडीफार !–एवढंच पुष्कळ !" धूर ओकणाऱ्या गिरणीच्या दूरवरच्या एका धुरांड्याकडे पहात नेहरूशर्टवाल्यानें म्हटलें.

★

तोंच...

फुटपाथवर एक फर्लांगभर पसरलेली दुतर्फा रांग त्यांना दिसली. एका बाजूला पुरुष नि दुसऱ्या बाजूस बायकामुलें ! दोन्हीं रांगा ज्या ठिकाणीं



एकमेकांना भिडत होत्या त्या मध्यबिंदूवर—"सरकारी धान्याचें दुकान" अशी पाटी होती.

हिंदुस्थानच्या दरिद्री नारायणाचें तें एक अत्यंत कलापूर्ण, करुण नि बोधप्रद प्रदर्शनच भरलें होतें !—

त्यांतला बोध मात्र असा होता कीं—

"धान्यें वाढवा–धान्यें वाढवा ! घाम ढाळून धान्यें पिकवा !! तें धान्य आधीं सरकारी दुकानांत भरा !–नि तिथें नसलेलें धान्य पोटांत भरायला घेऊन जाण्यासाठीं–मग मरेपर्यंत या सांखळ्या करून उभे रहा !!"

त्या बाजूस बोट दाखवीत, तो आपल्या सूटवाल्या शेजाऱ्याला म्हणाला, "ती पाहिलीत कां हिंदुस्थानची पॅन्झर मूव्हमेंट ?"

"हो हो !–पण यांतलीं आघाडीवरचीं माणसें नाहीं मरत हो, म्हणे ?" खादी सूटवाला कुत्सितपणें म्हणाला, "दररोज हीं दुकानें बंद होतात ना, त्या वेळीं तर म्हणतात—या दोन्हीं रांगांत शेवटीं शेवटीं दहा पांच दहा पांच तरी स्त्रीपुरुषाचे मुडदे सांपडतात पडलेले !!"

"हं हं !–कांहीं भुकेमुळें असतील नि कांहीं उद्यां पुन्हां या रांगेंत शेवटच्या नंबराला उभं रहायचं या भयंकर कल्पनेच्या धक्क्यानें !–हो ना ?" त्यानें सूटवाल्याची ती हृदयविदारक कल्पना पुरी केली !

"हो !—म्हणजे थोडक्यांत असं पहा !–आम्हां हिंदी माणसांचं उद्याचं मरण आज घडतं येयढंच !"—त्यांच्या दृष्टिपथांतून दूर दूर जात, आतां मुंग्याप्रमाणें वेडीं वांकडीं वळणें घेऊन हलणाऱ्या त्या रांगेकडे शेवटचा दृष्टिक्षेप टाकून, सूटवाल्यानें आपलें मत व्यक्त केलें.—"कारण ही पिछाडीचीं माणसं आघाडी कधींच गांठणं शक्य नाहींत ! नेहमीं पिछाडीला... म्हणजेच उपाशी !"—

मग वाक्य तसेंच अर्धवट टाकीत, सूटवाला शेजाऱ्याच्या हातांतील पुस्तक घेऊन चाळूं लागला.

"आलं असेलच ना तुमच्या वाचनांत ?" सूटवाल्याची ती अनोळखी उत्सुकता विन तक्रार पुढें चालवूं देत नेहरूशर्टवाल्यानें प्रश्न केला.

"हो, हो !" खादीसूटवाला पुस्तक पुढें चाळत हळूंच म्हणाला, "गांधी जवाहराहून मार्ग जरा निराळा; तरी पण सुभाष म्हणजे भारताचा एक फार मोठा माणूस ! यांत हो कुणाचं दुमत होणार ?"

"हं ! बर्लिनवरचीं त्यांची अलीकडचीं भाषणं ऐकलीच असतील तुम्हीं ?" अगदीं हळूं हळूं कुजबुजत नेहरुशर्टवाला म्हणाला, "महात्माजीहून धोरण असेल जरा निराळं ! पण 'क्विट इंडिया'ची पहिली घोषणा आपल्या सुभाषचीच !"

सूक्ष्म हंसत व क्षणभर पुस्तक पुढें चाळत खादी सूटवालाहि कुजबुजून, मान पुढें करून म्हणाला, "सायगांव–टोकियो–रोम–फॉलो करतां कीं नाहीं हल्लीं नेमानें ?–हं !–कांहीं म्हणा तुम्हीं ?–पण लेकाचे मोठे युक्तिवादी नि मानस–शास्त्रज्ञ ! रेडियोवरंहि मोठं यशस्वी आकाशयुद्ध खेळताहेत शिंचे !"

"खरं आहे ! सारेच जिथं रक्तपिपासू पाताळयंत्री दरोडेखोर–तिथं निदान गुणग्राहकता तरी कां सोडावी आपली आपण ?"

"नाहीं तर लंडन !–नुसत्या फुशारक्या !–आणि दळूबाई !–आमचीं सारीच्यासारीं विमानं गेलीं कशीं नि शत्रूचा धुव्वा उडवून परत सारींच्यासारीं आलीं कशीं ?"—

"तर काय ? हें सारं पाहिलं म्हणजे एकेकदां तर असं वाटतं बघा !"– पण तेवढ्यांत सुरू केलेल्या त्या वाक्याला बोलतां बोलतां शेजाऱ्याकडे पहात नेहरूशर्टवाल्यानें एकदम मध्येंच तोडलें !—

★

"थांबलातसे ? बोलाना ?"–किंचित हंसून सूटवाला पुढें म्हणाला, "वट् आय् कॅन् अंडरस्टॅन्ड् !–सध्या म्हणजे हवेला सुद्धां कान असतात नाहीं ?–तेव्हां असले स्वैर विचार मनातल्या मनांतच दडपावे लागतात माणसाला !"



त्याच्या त्या सहानुभूतीच्या उद्गारांत अभय दिसत होतें. त्यामुळें पुन्हां नव्या अवसानानें नेहरूशर्टवाला म्हणाला, "अहो, हवेला कानं पुरवले !– पण भेटणारा दर तिसरा मनुष्य कोण तें सांगतां येणार नाहीं बघा !–कुठल्या एखाद्याला सहज ओरखडा काढावा नि आंतून तो पक्का भेदी–सूर्याजी पिसाळ निघावा ! मग आल्याच ना तंगड्या आपल्याच गळ्यांत ?"

दोघेहि शांत राहिले थोडावेळ !

मग नेहरू शर्टवालाच पुढें बोलूं लागला, "चालू चळवळ कार्याची आहे !"–नुसती तुरुंग भरावयाची नाहीं; म्हणून सांभाळावं लागतं !"

"खरं आहे ! कॉंग्रेस रेडियोचं नि ट्रान्समिटरचं ऐकलंच असेल तुम्हीं ? नि आपले पुरुषोत्तम त्रिकमदास !—"

"पण यापाठीं आमच्यातलेच भेदी नाहींत कां ?"

"तेच ना ! पोट जाळायचे प्रकार हे ! दरिद्री हिंदुस्थानचे गेस्टापो चरं हे !"

"बुभुक्षितं किन्नकरोति पापम् ?"

"पण मी म्हणतो असं करण्यापेक्षां शेण भरावं त्यांनीं पोटांत ! नाहीं तर फांस लावून घ्यावा गळ्याला !"–सूटवाल्याच्या त्या शब्दांत धिःकार अगदीं ओतप्रोत भरलेला होता.

"आमचा हा असा अधःपात ! नि सरकार म्हणजे दंडुकेशाही– पिसाळलेल्या कुत्र्याचे चावेच !! मिदनापूर–चिमूरवरचीं भाष्यें नि पत्रकें ऐकलीं–वाचलीं असतीलच ना तुम्हीं नोकरशाहीचीं ? बुद्धि–नीति गहाण टाकली बेट्यांनीं !"

"हें सारं ऐकलं, पाहिलं म्हणजे वाटतं–नि पटतंहि–क्रूरकर्मे क्रूरकर्मे म्हणून जगजाहीर झालेले नाझी नि हे लोकशाहीचे खिश्चन पोपट यांच्यांत काडीचाहि फरक नाहीं !–अशा वेळीं वाटतं, आमच्या बापूजीचं दुसरा गाल पुढं करण्याचं सात्विक राजकारण या येशूंच्या कोकरांपुढं नाहीं उपयोगाचं !–

त्यापेक्षां तुकाराम समर्थांचा ठकाशी ठक होण्याचा मराठी बाणा अधिक बरा—"

"तेंच म्हणणार होतों मी मघा सुभाषबद्दल सुद्धां!"—नेहरू शर्टवाला पटकन म्हणाला, "अशाच वेळीं बघा—कार्य करण्याचे प्रकार नि पद्धति बदलण्याची इच्छा होते माणसाला!"

तेवढ्यांत ट्रामने भायखला ब्रिज ओलांडून, उजवें वळण घेतलें व सांध्याचा 'खट्‌क' असा आवाज झाला!—

★

सभोवार एकदां न्याहाळल्यावर जवळ बसलेल्यांची तुरळक तुरळक डोकींच दिसली. तेव्हां दोघांनाहि अगदीं हायसें वाटलें.

"हं...आतां काय तें बोला!" तो नेहरूशर्टवाला शेजाऱ्याजवळ जरा अधिकच सरकून म्हणाला, "सभोंती गर्दी नसली म्हणजे बघा—बोलतांना छातीवरचं सारं दडपण कसं अगदीं निघून गेल्यासारखं वाटतं!—नाहीं?"

"हं...तर हो?"

पण मग तरी थोडा वेळ दोघेहि गप्पच!

"त्या काफी हाऊसमधल्या सोमवारच्या स्फोटाचं काय झालं हो पुढं?" ट्राम जुन्या खड्या पार्शीसमोरचें वळण घेऊं लागली तशी डाव्या बाजूच्या इंपिरियल बँकेच्या घड्याळांत वाजले किती ते पाहिल्या न पाहिल्यासारखें करीत, सूटवाल्यानें पुन्हां सुरवात केली.

त्याला त्यातली थोडी माहिती आहे असें नेहरूशर्टवाल्याच्या चेहऱ्यावर दिसत होतें. पण उत्तर न देतां तो पुढें म्हणाला, "आजची भंसाळीची बातमी समजली कीं नाहीं तुम्हांला?"

"नाहीं!" सूटवाल्यानें मान हलवली व पुढें विचारलें, "आजचा पंचावन्नावा दिवस ना त्यांचा?कांहीं बाईट..."

तोंच नेहरू शर्टवाल्यानें एकदां चौफेर नजर फिरवून, आपल्या खिशां-



पुस्तक जपून वापरा.

तून हळूंच पांच सहा पिवळ्या घड्या काढल्या; आणि सूटवाल्याच्या हातांत त्या देऊन हळूंच तो म्हणाला, "आजच्या बुलेटिनमध्यें आहे सर्व!—घ्या—घरीं गेल्यानंतर वाचा सारीं तीं! गेल्या आठवड्यांतलींच आहेत!—मिळत असतील ना तुम्हांला नेहमीं?—नसतील तर पत्ता सांगून ठेवा! पडत जातील रोज वक्तशीर!"

कांहीं न बोलतांच, सूटवाल्यानें तीं तशींच खिशांत घातलीं.

पुन्हां क्षणभर अगदीं शांतता होती!—

★

किंचित काळानें नेहरू शर्टवाल्यानें कांहींतरी नवीन आठवल्याप्रमाणें चुळबुळ सुरू केली. जाकिटाचीं बटनें काढलीं. आपल्या आंतल्या फुगीर खिशांतून कसली तरी पाहिजे असलेली वस्तु शोधण्यासाठीं त्यानें आंतली एकेक वस्तू बाहेर काढली. तीन चार रंगाच्या ट्यूब्स, दोन तीन ब्रश, एक ड्रॉइंग होल्डर, 'करेंगे या मरेंगे!' 'चले जाव'चीं दोन चुरगाळलेलीं लेबलें व शेवटीं पांच सहा मोठ्या कागदाच्या दुडलेल्या घड्या एके ठिकाणीं फितीनें बांधलेलें लहानसें पुडकें—तें त्यानें खिशाबाहेर काढलें!

बाकीच्या गोष्टी तशाच पुन्हां खिशांत घालून तें पुडकें तेवढेंच शेजारी बसलेल्या सूटवाल्यापुढें करीत म्हणाला, "घ्या—संभाळून ठेवा! मिदनापूर, चिमूर प्रकरणांचीं कार्टून्स आहेत हीं! शक्य तेथें प्रसार करा. आणि कुठं चिकटवतां आलीं तर जरूर!—सांभाळून हं मात्र!"

तीं न उघडतां तशींच आपल्या आंतल्या खिशांत लगबगीनें कोंबून सूटवाला म्हणाला,—"तुम्हीं तर चित्रकार दिसतां?—म्हणजे मग...हीं चित्रंहि तुम—?"

शेजाऱ्यानें फक्त सौम्य हंसून भोंवती कांवरेंबावरें पहात आपल्या नाकावर बोट ठेवलें!

जवळपास कोणी बसलेलें नव्हतें. ट्राम चर्नीरोडकडे दुडक्या चालीनें जात होती.

सूटवाला आपल्या शेजाऱ्याकडे कौतुकानें बघत होता.

★

शेवटीं त्यानें हळूंच त्या नेहरूशर्टवाल्याला म्हटलें, "तुमची ही सारी तळमळ पाहून मौज वाटते नि नवीन हुरूप येतो बघा! थॅन्क्स हं!- इतक्या मोकळ्या मनानें तुम्हीं मजबरोबर वागल्यावर मलाहि थोडंसं कांहीं-!"

दोघांनींहि एकमेकाकडे निशब्दपणेंच एकदां रोखून पाहिलें. दोघांना एकमेकांचा विश्वास वाटला.

मग तो सूटवाला पुटपुटण्यापेक्षां जरा मोठ्या आवाजात कुजबुजला- "हें पहा, आमचाहि एक ग्रूप आहे गिरगांवात-दोन तीन केमिस्ट्रीचे पोस्ट ग्रज्युएटस् आहेत-एक ट्रॅफिक खात्यांतला रेल्वे नोकर आहे, एक दोन वर्कशॉपमध्यें काम करतात. दर शनिवारीं रात्रीं बैठक भरते आमची! ठरवतो नि करतोंहि कांहीं कांहीं गोष्टी यशस्वी रीतीनें—!"

"अस्सं! शनिवार? म्हणजे आजच कीं!"

"हो! आजच!!-जमेल तुम्हांला रात्रीं?"-सूटवाल्यानें त्याच्याकडे आपुलकीनें पहात पण रोखठोक विचारलें, "तुमच्यासारखीं नवीनवीं कार्यकर्तीं माणसें पाहिजेच आहेत आम्हांला आमच्यांत!"—

पुन्हां थोडावेळ ते दोघे एकमेकाकडे निरखून पहात शांत बसले होते!

मग सूटवालाच पुढें किंचित् हंसून म्हणाला, "येतां आज?-अनायासे माझा मघाचा आणाहि आजच्या आज परत करतां येईल तुम्हांला, रात्रीं आलांत तर!-पुन्हा आपल्याला कांहीं बोलतां येईल दुसरं!"-

नेहरू शर्टवाल्यानेंहि त्यावर मंद स्मित केलें.

★

"बरं तर! जरूर! माझ्या नवीन कल्पनाहि तुमच्यापुढं मांडतां येतील!"-तो थोड्या वेळानें विचार करीत हळूंच म्हणाला. "मी दुसऱ्या



कांहीं प्रचाराचे लिटरेचर नि पोस्टर्स आणतो बरोबर आणखी!-अर्धवट तयार झालेल्या चित्राच्या कल्पनाहि दाखवीन तुम्हांला!-तुम्हांला आणखी कांहीं सुचल्या तर तुम्हींहि सांगा!..काय?-वर्कआऊट करून टाकूं!- पण कुठेसं यायचं?"—

सूटवाल्यानें इकडे तिकडे संशयी मुद्रेनें पाहिलें व अगदीं पुटपुटत म्हटलें, "कॅांग्रेस रेडियो परवां पकडला ना? त्या परेखवाडी समोरच! ओल्ड एम्पायर बिल्डिंग-टॉप फ्लोअर-सत्तावीस नंबर-या उत्तरेकडलाच ब्लॉक—"

"ओल्ड एम्पायर बिल्डिंग?" नेहरूशर्टवाला हळुंच हंसून म्हणाला, "कधीं सूर्य न मावळणाऱ्या एम्पायरला गुप्तपणें सुरुंग लावायला बिल्डिंगहि बऱ्या नांवाचं शोधलंय बा तुम्हीं!-हा काय कामोफ्लाज वाटतं तुमचा?"

दोघेहि हळूंच हंसले. पण हंसतां हंसतांहि दोघांनीं चमकून सभोंवार पाहिलें. एक दोन घाट्यांशिवाय बऱ्याच अंतरापर्यंत कोणीहि बसलेलें नव्हतें.

"रात्रीं दहा वाजतां बरोबर...बरं कां?"-सूटवाला पुढें कुजबुजत पटपट म्हणाला, "फार आधीं मात्र नको. दोन चार मिनिटंच आधीं या!- त्यावेळीं आम्हीं आंत असूं!—दाराला बाहेरून कुलूप दिसेल मोठं...पण किल्ली दारावरच उजव्या बाजूला खिळ्याला टांगलेली— अं ऽऽ?"—

"जरूर!" -नेहरूशर्टवाल्यानें त्याच्याकडे पहात मान हलवून म्हटलें,—"लौकरच सव्वीस जानेवारी आलीय्! 'स्वातंत्र्य दिना'संबंधीं माझ्या कांहीं कल्पना तयार झाल्या आहेत— त्याहि मी"—

"अं ऽ? अरे काय म्हणतां काय?"—सूटवाला आनंदून आश्चर्यानें मध्येंच म्हणाला, "अहो, आमची ही आजची बैठक त्या बाबतींतच व्हायचीय!—मग हें पहा. अगदीं जरूर जरूर या बरं कां तुम्हीं आज!—पण जरा सांभाळून!—काय? जाणत्या माणसांना—"

"इतक्यांत प्रार्थना समाजचे नाकें येऊं लागलें, तेथें पुन्हां गर्दी बघतांना पाहून सूटवाला पटकन उतरण्यासाठीं उठला, व चालतां चालतां

आपल्या नव्या दोस्ताला म्हणाला, "बरं, उतरतों मी इथं!–ठरलं?–रात्रीं दहा वाजतां तर मग?– अं ऽ?–नक्की!–किल्लीचं लक्षांत आहे ना सारं?"

"हो, हो!"—नेहरूशर्टवाल्यानें तो लांब अगदीं जिना उतरून जाईपर्यंत त्याच्याकडे पाहिलें व मग हातांतलें पुस्तक उघडलें.

त्याआधीं एकमेकांचा तसा निरोप घेतांना त्या दोन्हीं तडफदार तरुणांचे डोळे नव्या आशा व नव्या महत्वाकांक्षा यांनीं चमकत होते.

★

त्याच रात्रीं साडे नवाचा सुमार—प्रार्थना समाज नाका,—जवळचें एका इराण्याचें हॉटेल,—नेहरूशर्टवरून टाकू जॅकेट घातलेला तो सकाळचा तरुण–हातांत कशानें तरी खच्चून भरलेली एक खादीची खाकी पिशवी घेऊन बाहेर पडला.

फुटपाथवर क्षणभर थबकून त्यानें एकदां संशयी, चौकसपणें सभोंवार आपली दृष्टि फिरवली; आणि मग समाधानी चेहऱ्यानें तों झपाझप पावलें टाकीत ब्लॅकआऊटमधून चालूं लागला.

प्रार्थना समाज व वॅंकरोड यांच्या जोड नाक्याजवळ तो येऊन पोहोंचला आणि वॅंकरोडच्या महारबावडीकडच्या बाजूस नाक्यावर असलेल्या मधल्या हेडलाइट खालून तो आतां पुढें सटकणार, तोंच त्याला हटकणारी एक हांक काळोखांतून ऐकूं आली. "अहो, मिस्टर, चाललां कुठं इतक्या गडबडीनें?—थांबा–आस्ते कदम!"—

उंच व गोंड्याच्या फरक्याप घातलेले, मुठीच्या लवंग्या काठ्या हातांत असलेले, गुलमिशांचे गृहस्थ पायांतील वहाणांचा करकर आवाज करीत त्यांच्या दिशेनें चालत येत होते. तो थबकला!

शेवटीं त्यातल्या एकानें त्याच्या मानेजवळच खांद्यावर हात ठेवला व दुसरे दोघे त्याच्या दोन्हीं बाजूंनीं बरोबर चालूं लागले.

"आधीं मी सांगतों तें ऐका!"—तो चालतां चालतां कांहीं तरी



पुढें बोलणार, तोंच त्याच्या खांद्यावर हात ठेवलेला मनुष्य मिस्कीलपणानें हंसून म्हणाला, "थांबा, आतां रस्त्यांत नका आम्हांला कांहीं सांगूं! आमच्याबरोबर चौकीवर चला. साहेब आहेत तिथं! तेथें बोलतां ठरवतां येईल काय असेल तें!"

—आणि त्याच्या हातांतील वजन हलकें करण्यासाठीं उजव्या बाजूच्या दुसऱ्या चालणारानें त्याची खादीची पिशवी आपल्या हातीं घेतली.

★

जवळ जवळ त्याच सुमाराला एंपायरच्या बिल्डिंगच्या नाक्यावर एका कोपऱ्याला चौघजण आपसांत कांहीं तरी कुजबुजत उभे होते.

तेवढ्यात थोड्या अंतरावरून सकाळचे ते खादी सूटवाले गृहस्थ, रस्त्याचें वळण घेऊन एंपायर बिल्डींगच्या बाजूला झपझप जाऊं लागले.

त्या चौघांचें कुजबुजणें एकदम थांबलें. त्यांतला एकजण हळूंच शेजाऱ्याला म्हणाला, "जमादार, ते पहा–कोण हो?—तेच!—विश्वासरावच!–अं ऽ?—

"हो, हो! तेच ते! आतां सूट घातलेला दिसतोय बेट्यानं आज! हं, चला जाऊं या!" बरोबरीचे तिघेहि झपाझप पावलें टाकीत जमादाराबरोबर पुढें झाले. चौघांनीं त्याला लांब लांब टांगा टाकून गांठलें. जमादार पुढें होऊन म्हणाला, "अहो राव! थांबा जरा! बरें सांपडलांत म्हणायचे!–केव्हांची वाट पहातोय आपली?—म्हटलं, हुकतं कीं काय? बरं तर!—चला आतां आपल्या सरकारी मकाणीच!"

"मला वाटलंच होतं!" विश्वासराव अर्धवटच बोलून त्यांच्या गराड्यांतून निमूटपणें चालूं लागले.

★

एंपायर बिल्डिंगच्या दारांतील मधल्या मोठ्या घड्याळांत दहाचे ठोके पडत होते. पूर्वीचे नऊ वाजलेले असले तरी आतांचे दहा वाजले असल्यामुळें बरीचशी सामसूम झाली होती.

टॉप फ्लोअरवरच्या सत्तावीस नंबरच्या कोपऱ्यावरल्या ब्लॉकला सकाळीं विश्वासरावांनीं म्हटल्याप्रमाणें बाहेरून मोठें कुलूप होतें.

सकाळीं ठरल्याप्रमाणें, तो नेहरूशर्टवाला व ते खादी सूटवाले विश्वासराव यांची भेट व विचारविनिमय व्हायची तीच जागा!—तोच दिवस—तीच वेळ होती. आंत मंद निळसर दिवा प्रकाशत असल्याचें खिडक्या दारांवरील झरोक्यांना लावलेल्या काळ्या कागदांतल्या तुरळक फटींतून येणाऱ्या बारीक किरणांवरून नीट पाहिलें तर समजून येत होतें. दारावरच्या उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत म्हटल्याप्रमाणें किल्लीहि खिळ्यावर उत्सुकतेनें वाट पहात लोंबकळत होती.

पण त्या खोलीचे मालक—ते खादी सूटवाले विश्वासराव?—आणि तेथें ठरल्याप्रमाणें येणारा तो सकाळचा नेहरूशर्टवाला तरुण??

ते दोघेहि उत्साही क्रांतिकारी जीव यावेळीं चौकीवरच एकमेकांना भेटले असण्याचा जास्त संभव!— अरेरे, दुर्दैव देशाचें!!

पण तेवढ्यांत टॉप फ्लोअरच्या त्या गॅलरींत, काळोखांतच कोणाची तरी पावलें वाजलीं. कोणीसें हळूं हळूं चालत सत्तावीस नंबरच्या टोंकाकडेच येत होतें. शेवटीं क्षणभर थबकून एखाद्या माहितगाराप्रमाणें त्या व्यक्तीनें दारावरील उजव्या बाजूची किल्ली काढली. कुलूप उघडण्याचा सूक्ष्म आवाज झाला.

हळूंच दार लोटल्यावर एक मंद निळसर प्रकाशाचा झोत बाहेर आला!—आणि काय आश्चर्य?

त्या बाहेर येणाऱ्या झोतात तो नेहरूशर्टवाला तरुणच दारातून आंत शिरतांना दिसत होता!

★

म्हणजे?—पोलिसांच्या हातावर तुरी देऊन यशस्वी सुटका केलेला असावा त्यानें!—आणि आणीबाणीच्या प्रसंगीं नवीनच ओळख झालेल्या



विश्वासरावाची खोली-म्हणजे अगदीं एकुलता एक विश्वासाचा आसरा वाटला असावा त्याला!

पण त्याला विश्वासरावावरील प्रसंगाची व पर्यायानें पुन्हां त्याच्यावर येणाऱ्या नव्या प्रसंगाची कल्पनाहि नसेल!—

त्यानें आंतून दार लोटल्यावर पुन्हां गॅलरींत काळोख झाला. काळोख झाला न झाला तोंच मागून कोणी तरी-तिथे चौघेजण होते ते-त्या दारापर्यंत दबकत दबकत येऊन कानोसा घेत उभे राहिले!

तो तरुण हातचा निसटला म्हणून इमानी शिकारी कुत्र्याप्रमाणें त्याचा बिनचुक मार्ग काढीत, त्याच्या वासावर, ते प्रार्थना समाजाजवळ त्याला थांबवणारें त्रिकूटच नव्हतें ना तेथें दबा धरून? कीं विश्वासरावाच्याहि वासावर होतें तें?

★

तो तरुण आंत गेल्यावर मात्र गोंधळला! त्यानें पाहिलें—पहिल्या खोलींत काळोख होता, त्या पुढल्या मधल्या खोलीच्या उघड्या दारांतूनच तो निळसर प्रकाश येत होता; व त्या दिव्याच्या प्रकाशांतच एका बैठकीवर तीन चार जण बसले होते.

त्या अनपेक्षित प्रकारानें किंचित विचलित होऊन, तो जरा दबकत दबकतच मधल्या खोलींत शिरला. आपल्या हातांतली पिशवी त्यानें काळजीपूर्वक मागें लपवून धरली होती.

समोर बसलेलीं सारींच माणसें त्याला पूर्ण अपरिचित!—त्यांत पुन्हां ते सकाळीं ओळख झालेले गृहस्थ?—तेहि दिसत नव्हते तेथें!—त्यामुळें तर तो अधिकच गोंधळला!—

तेवढ्यांतच बैठकीवर मध्येंच बसलेले ते जाडजूड गृहस्थ त्याच्याकडे पाहून म्हणाले, "या—या—बसा!—माफ करा हं!—विश्वासराव नाहींत हजर इथं!—तरी पण आम्हीं तुमचीच वाट पहात आहोंत!—या ना!"—

पण तो पुतळ्याप्रमाणें तसाच दारांत उभा राहिला.

" आणलींत कां तीं चित्रं नि तुमचे ते स्वातंत्र्य दिनाचे प्लॅन वगैरे?" ते गृहस्थ किंचित् काळ स्तब्ध राहून त्याच्याकडे टवकारून पाहात म्हणाले!

" हो, आणलेत?"—काय बोलावें तें न समजून किंचित गांगरलेल्या आवाजांत व तसें उभ्या उभ्याच तो म्हणाला; परंतु मग चपापून पिशवी मागें धरीत त्यानें विचारलें, " पण हें काय?—तुम्हीं कोण?—ते सूटवाले गृहस्थ? कोण बरं म्हणालांत?—विश्वासराव!—हो-ते कुठं आहेत?"

दोन बाजूंनीं शिकारी कुत्र्यांच्याच कचाट्यांत तर नव्हता ना सांपडला बिचारा?—

कोण हे आंतले?—त्याला दाट संशय येऊं लागला.

★

तोंच ते मधले जाडजूड गृहस्थ पटकन जागेवरून उठले, त्याच्याकडें चालत आले, व कांहीं न बोलतां त्यांनीं त्याच्या हातातल्या पिशवीकडे आपला हात नेला. त्यांत स्नेहभाव किंवा सात्विकपणापेक्षां अरेरावीच अधिक दिसत होती.

आतां मात्र त्याचा संशय अधिकच बळावला! बचावासाठीं मागें मागें हटत तो म्हणाला, " थांबा, हात लावूं नका त्या पिशवीला!—ही माझ्यावर बळजबरी काय म्हणून? तुम्हीं हो कोण असे मोठे? सांगा आधीं!"

" मिस्टर! आतां अगदीं लटपट गडबड नको आहे कसली!—बाकीच्या गोष्टीहि बऱ्या बोलानं सांगून टाका!" ते अधिकच हुकमी आवाजांत त्याला म्हणाले.

" पण तुम्हीं माझ्यावर अशी दादागिरी करणारे कोण? ते विश्वासराव कुठं आहेत?" तो तरुण अधिकच भांबावून म्हणाला.

" विश्वासराव तेवढेच तुमच्या विश्वासांतले काय?" ते उपहासानें हंसून म्हणाले, " बरं तर मग! तेहि इथंच आहेत!—तुमच्या मनासारखं



होऊं द्या! त्यानांच बोलावतो!—विश्वासराव, अहो विश्वासराव!—जरा बाहेर या पाहूं!—"

आणि त्यामुळें त्याला आश्चर्याचा आणखी एक झटका बसतो न बसतों, तोंच विश्वासराव तिसऱ्या आंतल्या खोलीतून बाहेर आले.

—तो आणखीच गोंधळला!—त्याच्या डोळ्यांपुढें अक्षरशः काजवे चमकूं लागले!

" हें काय, आहे काय सारं प्रकरण? याचा जाब द्या आधीं विश्वासराव?" स्वतःला जरा सांवरून तो थोड्या रागानेंच सूटवाल्या विश्वासरावाकडे पहात म्हणाला.

पण ते कांहींच बोलले नाहींत!

★

" काय? म्हणजे तुम्ही लोक आहांत तरी कोण?" तो तरुण एका नव्या संशयानें केवढ्यानें तरी दचकून इतरांकडे पहात म्हणाला.

पण तेवढ्यांतच त्या मधल्या गृहस्थानें विश्वासरावला हंसून विचारलें, " हाच ना हो विश्वासराव, तुमचा तो सकाळचा चित्रकार दे. भ.?"

त्याच्या चेहऱ्यावर तो प्रश्न विचारतां विचारतां एक सैतानी समाधानी हास्य चमकून गेलें.

" हो, हेच ते चित्रकार, जमादार!" विश्वासराव म्हणाले.

" काय म्हणालांत? जमाऽदार? म्हणजे?—ही मंडळी पोलिस तर नव्हे?—" तो गोंधळून विश्वासरावांकडे बोट दाखवीत म्हणाला, " तुम्हीं यांना कैद केलं आहे वाटतं?—माफीचे..."

तेवढ्यांत विश्वासराव पुढें होऊन म्हणाले, " छेः छेः! माझ्या कैदेचा नि माफीचा प्रश्नच उद्भवत नाहीं! जरा माफ करा हं मिस्टर—मला थोडा विश्वासघात करावा लागला तुमचा!—पण नौकरी आहे ही!—अगदीं साऱ्या

मुद्देमालासकट असे माझ्या हातीं तुम्हीं स्वतः होऊन आयते येण्याचा मोका दिसला अगदीं सकाळीं मला !—तेव्हां—"

"विश्वासराव ? तुम्हीं ?—स्वतः एक सी. आय. डी ?" त्या नव्या बातमीच्या धक्क्यानें मटकन खालीं बसून तो नेहरुशर्टवाला म्हणाला. "तुम्हींच बोलतां आहांत कां हें ? ट्राममध्यें इतका जीव तोडून बोलणारे तुम्हीं सी. आय. डी. ? मला खरंहि वाटत नाहीं हें ?—अरेरे !—"

★

त्याचें हें बोलणें होत आहे तोंच दारावर बाहेरून जोर जोरानें धक्के बसूं लागले. जमादार हुकमी आवाजांत आंतून ओरडला, "कोण ?—कोण आहे बाहेर ?—"

"हं, हं, सांभाळून ! यांचेच साथीदार असायचे बाहेर एखादे वेळीं !" विश्वासराव उघडपणें सावधगिरी दाखवून म्हणाले. आतां त्यांना लपं छपं करण्याचें कांहीं कारणच नव्हतें.

दोघे पोलिस घाईघाईनें दाराजवळ गेले. तोंच पुन्हां बाहेरून धक्के व दबले हुकमी आवाज ऐकूं आले; "हं, दार उघडा आधीं !—उघडतां कीं फोडूं ? वाटाणे ?—अहो वाटाणे ? - जिवंत आहांत ना ? —मग बोलत कां नाहीं ?"

"वाटाणे ?—कोण वाटाणे ?" जमादारानें खोलीतल्या साऱ्या जणांकडे एकदां दृष्टि फिरवून म्हटलें, "वाटाणे कोण आहे हो इथं ?"

"कोणी नाहीं !" सारे छुपे पोलिस ओरडले. पण मग बसल्या जागेवरून न उठतां, तो तरुण निश्वास टाकून म्हणाला, "मी !—मीच वाटाणे !"

"तर मग बाहेर त्याचेच साथीदार दिसताहेत ! बरे आयते साऱ्या-सारे हातीं आले म्हणायचे !" जमादार समाधानानें म्हणाला ! पण मग पुन्हां गोंधळलेली हालचाल करीत तो ओरडला, "अरे पण सांभाळून रे बाबानो ! पिस्तुलं नि बांब बिंब असायचे एखादेवेळीं त्यांच्याकडे !—आपल्या काठ्या,



धा. नं 3४१८

आहेत ना हाताशीं जाग्यावर ?—तें ड्रावरमधलं पिस्तुल काढून घ्या आधीं हातीं विश्वासराव !—नि जरूर पडली तर सारे शिट्या फुंका रे !–बिल्डिंग–भोंवती आपली हत्यारबंद पार्टी आहेच !"—

★

तो बसकण घेतलेला तरुण अधिकच भांबावून ओरडून म्हणाला, "अहो जरा थांबा, थांबा ! त्या कशाचीहि जरूरी नाहीं, जमादार ! बाहेरचे लोक तुम्हांला अगदीं जरा देखील दगा फटका करणार नाहींत ! हात जोडतों हवे तर; पण आरडाओरड करूं नका !–नि कोणावर हातहि टाकूं नका !–लाठ्या काठ्या नि बंदुका यांची जरूरीच नाहीं !"

पण त्याचवेळीं बाहेरून दारावर जोरजोरानें धक्के बसले; आणि शेवटीं घाईघाईंत अर्धवटच लागलेली ती कडी जरा वाकून जागेवरून निखळली. ते बाहेरून ओरडणारे लोक आंतल्या पोलिसावर येऊन एकदम आपटले, नि क्षणभर तेथें एकच गोंधळ उडाला ! त्यांतच आंतल्या लठ्ठ जमादारानें स्वसंरक्षणासाठीं शिट्या फुंकल्या.

पण तो गोंधळ थोडा कमी होतो न होतो, तोंच त्या बाहेरच्या त्रिकुटांतल्या उंच गृहस्थाचें लक्ष जमादाराकडे गेलें, नि तो भयंकर आश्चर्यानें उद्गारला, "अरे, अरे, जमादार ! तुम्हीं कुठल्या कामगिरीवर इथं, यावेळीं ? कां तुम्हांलाहि दिली कुणी ही वर्दी ?"

पण त्यावर जमादार कांहीं बोलण्यापूर्वींच बसकण घेतलेल्या त्या तरुणाकडे पहात तो नुकताच आंत शिरलेला उंच गृहस्थ म्हणाला, "काय हो वाटाणे ? कुठं आहेत तुम्ही म्हणत होतां ते तुमचे आरोपी ?"

डोक्यावर हात मारून खालीं बसलेला वाटाणे कांहींहि बोलला नाहीं. जमादार तर हतबुद्धच झाला होता. विश्वासराव गोठून गेले होते !—आतां आंत शिरलेले ते तिघे पोलिसहि तेथें जमलेल्या सर्वांकडे टकमकां बघत होते.

आणि खोलीबाहेर–!...

रात्रीच्या त्या भयानक आरडाओरडीनें झोपेंतून खडबडून जागे झालेले सारे 'ओल्ड एंपायर' गोळा होऊं लागले दाराजवळ !–भोंवतालची हत्यारबंद पार्टी पण धांवून आली होती !—

★

त्या बाहेरच्या गलक्यानें मात्र भानावर येऊन वाटाणे ताडकन उठून दाराकडे धांवत गेला; नि त्यानें प्रथम दार खाडकन बंद केलें. क्षणभर शांत झालें त्या खोलींत !—

शेवटीं वाटाणे खासगी पोशाखांतल्या त्या उंच पोलिसाकडे वळून अपराधी स्वरांत म्हणाला, " माफ करा, फौजदारसाहेब !–माझा भयंकर गैरसमज झाला !–या विश्वासरावांच्या मागावरच–त्यांच्या साऱ्या नाटकानं फसून–मी आपल्याला घेऊन आलों होतों !–वाटलं होतं, सारा ग्रूपच्या ग्रूप सांपडेल ! "

" म्हणजे ? " विश्वासराव आणि जमादार गोंधळून एकाच वेळीं ओरडून म्हणाले.

" म्हणजे थोडक्यांत असं, कीं आतां या खोलींत गुन्हेगारांची शोधाशोध करणारे पोलिसच आहोंत आपण सारे ! अपराधी असा कोणीच नाहीं ! "–वाटाणे खालीं पहात लाजेनें मेल्याहून मेला होऊन म्हणाला.

★

" काय विश्वासराव ? " जमादार विश्वासरावावर रागानें खेंकसले !—

" वाटाणे !–काय, म्हणतां तुम्हीं ? " भोंवळ येऊन पडतां पडतां विश्वासराव स्वतःला सांवरत ओरडलेच. " शेवटीं तुम्हींहि एक सी. आय. डीच आहांत ? "

कांहींहि उत्तर न देतां वाटाणे शरमून खालीं पाहूं लागला.

विश्वासरावचा सांवळा चेहेरा काळा ठिक्कर पडला.



मग त्या दोघांनाहि कसलेल्या यशस्वी नटांनीं, ( आपापलें ट्रॅममधलें एकमेकांना फसवणारें नाटकी कसब आठवून ) एकमेकांकडे हळूंच पण वरमून पाहिलें !

तेवढ्यांत जमादारानें आपला आवाज चढवून दोघांनाहि हटकलें, " शिकून सवरून फुकट तुम्हीं ?–गाढवानों, सी. आय. डी. खातं म्हणजे पोरखेळ समजलांत तुम्हीं ? त्यापेक्षां आम्हीं जुने लाथा खात चढत आलेले अशिक्षित लोक बरे ! "

" जमत नाहीं तर शिरलाच कशाला आमच्या या पाताळयंत्रांत ? "—फौजदारानें विचारलें !—

" पोटासाठीं ! " ते दोघेहि तिरीमिरीनें त्यांच्याहून मोठ्यानें ओरडले.

★

" पोटासाठीं ! " असे ते ओरडले नि त्या दोघांच्या मनाला ट्राममधला आपला सारा संवाद पुन्हा शब्दशः आठवून पश्चात्तापाच्या इंगळ्या डसल्याप्रमाणें झालें. दोघांनींहि एकमेकांची दृष्टि चुकवून एकमेकांकडे पाहिलें आणि गुपचूप खालीं माना घातल्या.

कौशल्याची आपण आपापल्यापरी कमाल केली; पण शेवटीं माणूस चुकल्यामुळें हेंच नशिबीं आलें, याच्या जाणीवेनें वाटाणे आणि विश्वासराव या दोघांनाहि आपण खोल खोल अगदीं पाताळांत जात असल्याप्रमाणें वाटत होतें !—

—आणि मग, विश्वासरावाच्या नावांची भाडेचिठी असलेल्या त्या सरकारी खोलींत, त्या नवख्या सुशिक्षीत सी. आय. डी. ना बाकींच्या उरलेल्या पोलिसांनीं इतकें फाडफाडून खाल्लें कीं त्यांचे ते हाल, लुत लागलेलें मरतुकडें कुत्रेंहि खातें ना !

आपापल्या पोटासाठीं केलेल्या ट्रामममधल्या नाटकांत, खरीं वाटावीं

म्हणून म्हटलेलीं सारीं वाक्येंच्यावाक्येंं, आतां त्यांच्या पश्चात्तापदग्ध मनाला खरोखरच खरीं म्हणून त्यावेळीं पटूं लागलीं होतीं !

[ उपसंहार—

आणि त्यानंतर तिसऱ्याच दिवशीं सकाळीं मुंबईच्या सगळ्या वर्तमान-पत्रांत एक मोठा मथळा होता—" मुंबईतल्या दोघां सी. आय. डी. ची आत्महत्या !–ओल्ड एंपायर बिल्डींगमध्यें गळफांस लावून घेतला !!" ]

[ २६–१–४३. ]

---

## चांदीची वाटी ! * * * रघुवीर सामंत

कॉन्ट्रॅक्ट घेतलेल्या मिलिटरी बिल्डिंगच्या बांधकामावर दिवसभर देखरेख करूनकरून अगदीं दमलोंभागलों नि कंटाळलों होतों मी !—आज जरा उशीरच झाला होता घराकडे निघायला;—तरी मी वाटेंतल्या एका हॉटेलांत चहा घेऊन तिथेंच थोडा रेंगाळत बसलों—

कारण माझ्या घरीं–म्हणजे एका सिंगलरूममध्येंच ना शिरणार होतों मी ?—आणि तें तर माझ्या अगदीं जिवावर येत असे अलीकडे ! हो, माझी मीना...तिच्या साऱ्या गोड गोड आठवणी माझ्या मनांत येत, त्या खोलींत वावरतांना !—

—म्हणूनच, ती गेल्यानंतरचे गेले जवळजवळ दोन महिने, माझ्या कामांत इतका व्यग्र करून घ्यायचें स्वतःला मी, कीं, शक्य तों झोंपण्यापुरतंच खोलीचं कुलुप उघडायची पाळी यावी माझ्यावर—

लौकिकदृष्ट्या मीनाचा–माझा तसा काय संबंध ?—माझा संसार थाटूं शकली असती अशी ती माझी वाग्दत्त वधू !—पण तें दुःखहि माझ्या मनांतून कांही केल्या जात नव्हतं—

आणि मामांची तर ती प्रत्यक्ष पोटची मुलगी !—मग त्यांचं दुःख ?—मला कल्पनाहि करवत नव्हती त्याची !—

या आकाशांतल्या कुऱ्हाडीचा आघात खरंच मोठा भयंकर !—त्यामुळं जिव्हरीं होणारी जखम ताजी असेपर्यंत माणसाचं मन त्या एकाच विचारानं अगदीं व्यापलेलं असतं !...त्या दुःखाच्या गडद काळ्या चष्म्यानेंच तो सभोंवतीं पहात असल्यामुळं, त्याला जगांत सगळीकडे काळोख...काळोख पसरलेला दिसतो ! —पावलापावलाला आपण एखाद्या खोल दरींत पडल्याचा भयंकर भास त्याला सारखा होतो !—

कधीं कधीं माझ्या तरुण मनाच्या उत्कट पण उपऱ्या भावनांचं मला साफ विस्मरण होतं !—कारण मामांची तारुण्यांत नव्यानेंच प्रवेश करणारी, स्वतःच्या हातानें वाढवलेली सुकुमार मीनाहि एकाएकी नि तडकाफडकी त्यांना अंतरून निघून गेली होती.—तिच्या देहलतेला, स्वतःच्या हातांनीच, वोहल्या-ऐवजीं चितेच्या अग्नींत होरपळण्यासाठीं त्यांनीं नाइलाजानं ठेवलं होतं !—

त्यावेळीं—मामांना त्या दुःखामुळं काय वाटलं असेल !—असंच ना, कीं—" आपल्याला आतां यापुढं अगदीं जगणंच शक्य नाहीं !"

★

पण स्वतःच्या पुढल्या अनुभवांवरूनच मला वाटतं—कीं मामांनाहि आतां हळूं हळूं पटलं असेल—माणसाचं दुःख कितीहि भयंकर...उत्कट...असलं तरी तें तसंच कायम टिकून रहात नाहीं !—

विस्मरण हें मानवी जीवनांतील एक अमृततुल्य औषध होय...त्याचा नीट परिणाम व्हायला, वैद्याच्या औषधाप्रमाणेंच, जरा जास्त काळ लागतो, हें खरं;—तरी पण जसजसे दिवसांमागून दिवस व्यतीत होतात, तसतसा या दुःखाच्या रोगावर विस्मरणाच्या या औषधाचा अगदीं हमखास चांगलाच जालीम गुण झाल्याचं आढळतं !—त्यामुळेंच मानवी जीवन हळूहळू नवा जिवंतपणा पुन्हा अंगीं आणतं—नि म्हणूनच जग पुढें चालतं, मला वाटतं !—

हो, त्यामुळेंच, हळूहळूं, 'परदुःख शीतल' वृत्तीनं मनुष्यहि, आपल्या अगदीं स्वतःच्या दुःखाकडे देखील त्रयस्थ दृष्टीनें पहायला शिकतो—पाहूं लागतो !—त्या आपल्या दुःखांतच केवळ बुडण्यापेक्षां...त्याबद्दलच्या सखोल विचारांत तो थोडाथोडा डुंबूं लागतो !—आणि...आपल्या कुवतीप्रमाणें जीव-नाची कोडीं सोडवून पहाण्याइतका,...( त्यांत विचारीवृत्तीनें रमून मनाची करमणूकहि करून घेण्याइतका ) त्याला हळूंहळूं धीर येतो !

आमच्या मामांचं मला वाटतं, तसंच झालं होतं;...अलीकडे गेल्या



पंधरवड्यांत त्यांच्यांत पडत गेलेला असला समाधानकारक फरक तर माझ्या चांगलाच अनुभवास आला होता !—

★

विशेषतः, वऱ्हाडातून, त्यांचे मित्र भय्याकाका, दोनतीन दिवसांपूर्वी, त्यांच्याकडे आठवडाभर रहायला म्हणून आले, तेव्हांपासून तर हा बदल अधिकच झाला होता--

भय्याकाका म्हणजे चार गांवचं पाणी प्यालेली मोठी न्यारी व्यक्ती !

...तरुणांमधें तरुण नि म्हाताऱ्यांत म्हातारा-असा तो प्राणी !—वसवसा फारसं बोलणार नाहींत ते, पण बोलण्यासाठीं योग्य वेळीं नक्की तोंड उघडतील;... उघडल्यावर मेजक्या शब्दांत बोलतील;-नि बोललेल्यात ऐकणाराला कांहीतरी नवीन...अननुभूत अनुभव मिळणारच !—

गेल्या दोन दिवसांत मला चांगलाच अनुभव आला होता त्यांचा !

मी हॉटेलांतून बाहेर पडलों, तों रस्त्यांतून मामा, चिंतूतात्या नि भय्याकाका असं त्रिकूट नुकतंच फिरायला म्हणून बाहेर पडलं होतं...

"काय ब्रह्मचारी ?—अहो इंजिनिअरसाहेब ?" मला पहातांच भय्या-साहेबांनी लांबूनच मोठ्यानें ललकारी मारली नि हसत हसत पुढें विचारलं "येणार कां पाय मोकळे करायला ?—"

दिवसभरांतल्या कामांतच माझे पाय चांगले मोकळे झाले होते !—पण भय्याकाकांच्या, मामांच्या नि चिंतुतात्यांच्या सुखद सहवासांत घटकादोन घटका घालवण्याचा मोह अगदीं अनावर झाला मला !-कपडे बदलण्याचाहि विचार पटकन् बदलून, मी त्यांच्यांत तसाच सामील होत म्हटलं-"चला कीं-"

★

बोलत बोलत आम्ही अँटप हिलच्या मध्यावर पोहोंचेपर्यंत छानदार चांदणंहि पडलं होतं चोहीकडे !—खालीं...दादर-माटुंग्याच्या विभागांतील

' जनता–जनार्दन ' चंद्राच्या प्रकाशांत न्हात होता !—मधून मधून लांबवरचे –रस्त्यांतले नि इमारतींचे–दिवे काजव्याप्रमाणें चमकत होते;... जवळपासचीं झाडेंझुडपें, खांचखळगे नि उंचवटे यांच्यातले छायाप्रकाश चंद्रानं आपल्या जादूनं अगदीं अद्भुतपणें एकांतएक मिसळविले होते !—

ज्या बजबजबाजारांत, मी दिवसानुदिवस अगदीं दिवसभर पोटापाठीं नि पैशासाठीं राबण्यांत घालवीत होतों, त्याच्याच इतक्या निकट, इतकं नितांत निसर्गसौंदर्याचं हें भांडार आहे, याची एकदम सुखद जाणीव झाली; नि त्याबरोबरच मला आमच्या एकमार्गी आयुष्यांतल्या अज्ञानाचं आश्चर्यहि वाटलं, मनांतल्या मनांत !—

" मानवी प्राण्याच्या या सृष्टीचं हें दुहेरी जीवन जाणून घ्यायला ही टेंकडीची उंची बरी आहे, नाहीं मधोबा ?" भय्याकाका माझ्या मुग्ध हालचालींकडे पहात, चालतां चालतां मला म्हणाले–"तिथली खालची अव्याहत चाललेली ती सुखदुःखांनी भरलेली कृत्रिम गडबडघाई !...नि येथली ही कायम नांदत असलेली आनंदमय नैसर्गिक शांतता !...एकाच आईच्या उदरीं जन्म घेतलेलीं दोन भावंडें–पण किती परस्पर-भिन्न तोंडवळ्यांचीं !–इथं उभं राहून एकाच वेळीं त्या दोघांकडे पाहून...सारं जाणून घेण्याची भेदक दृष्टी मात्र पाहिजे पहाणाऱ्यांत...."

" काय उपयोग या इथल्या निसर्गनिर्मित आनंदाचा, भय्याकाका ?" मी म्हणालों—' त्याच्यापासून आम्ही माणसं कुठं काय शिकतो ?—आजचं हें पिठासारखं चांदणं पाहून...बॉम्ब गोळ्यांनी खच्चून भरलेलीं शेकडों विमानं एकमेकांच्या घरादारांवर–पोरा–बाळांवर हल्ला करायला वेगानें उडवण्याची स्फूर्तीहि मिळाली असेल, याच जगांतल्या मानवाला !"—

★

" अरे, त्या चोरांच्या नि मुत्सद्यांच्या दरोडखोरी युद्धाचं आपल्याला काय करायचंय्...सामान्य माणसांना ?"—चिंतुतात्या आपली विडी पेटवून म्हणाले—" आमच्या साध्या दररोजच्या मानवी आयुष्यांत काय कमी



आंधळीकोशिंबीर चाललीय् ?—कोण तुमच्या या निसर्गाकडे पहातोय् नि त्याच्यापासून शिकतोय् ?—आपणच दुःखं तयार करायचीं आणि त्यांतच, आयुष्यभर,...स्वतःला नि दुसऱ्यांना खिचपत ठेवायचं !...हेंच ना आपलं आयुष्य आजचं ?—"

" तात्या, फक्त माणसालाच कां देतां हा दोष ?"—बराच वेळ गप्प राहून ऐकत असलेले मामा म्हणाले—" सारीं दुःखं कांहीं मनुष्यनिर्मित नसतात !—कांहीं अज्ञात शक्तीनं त्याच्या वाटेंत अचानक येऊन कोसळतात !—त्याचा अगदीं नाइलाज असतो त्यावेळीं !—"

" या अज्ञात शक्तीच्या नि ईश्वराच्या नांवाखालीं...पुष्कळदां तीं माणसाच्या दारुण अज्ञानानेंच येऊन कोसळतात, मामा !—" मला मीनाच्या दोन दिवसांच्या आजारांत, मोठमोठ्या डॉक्टरांनीहि केलेल्या माकड–वैद्यकीची आठवण होऊन, मी जरा रागानं–त्राग्यानंच म्हटलं.—" वाजे पाऊल आपुलें ' म्हणतात, तसं, आमचं जें अजून अगणित खंडीभर अज्ञान आहे, त्यालाच आम्ही ईश्वर नि अज्ञात शक्ती म्हणतो !—आपल्याच अज्ञानाला बळी पडणारा दीनदुबळा हतबळ प्राणी आहे...मनुष्य म्हणजे !—"

" तें कांही असो, मधोबा !—" भय्याकाका हसले नि एक चांगलासा खडक पाहून त्यावर बसत मला म्हणाले—" पण मग थोड्या सुखांनी नि पुष्कळ पुष्कळ...अगदीं डोंगराएवढ्या...दुःखांनी भरलेला हा मानवी आयुष्याचा चक्रनेमिक्रम...अगदीं अनंत काळापासून तों आजच्या घटकेपर्यंत अव्याहत चालत आलाच आहे ना, तरीहि !—"

आम्हीहि तिघें भयाकाकां भोंवतीं बसलों. आकाशांत चंद्राच्या स्वच्छ ज्योत्स्नेनें गूढ धूसरता आली होती !—

" तेंच तर मला कोडं आहे !–" मी भय्याकाकांकडे पाहून म्हणालों–" तो चक्रनेमिक्रम तसा आतांपर्यंत चालत कां आला...नि माणसं जाणूनबुजून तो तसाच पुढेहि कां चालवीत जाताहेत, हेंच मला कांहीं केल्या समजत नाहीं !—"

★

"मी सांगूं तुला, मधू ?—" चिंतुतात्या एक विडी टाकून, दुसरी पेटवीत म्हणाले—"हें रहाटगाडगं असंच चालतं...हेंच तर माणसाचं एक वैशिष्ट्य आहे !—त्याच्या सद्गुण-सुगंधाचे कण, त्याचं लहानमोठं कर्तृत्व, त्याच्याबद्दलच्या आठवणी, मागल्या माणसांच्या आयुष्यांत...जगांत, मागें उरतात...म्हणूनच चालतं तें !—माणूस दुबळा असूनहि, इथलं जीवन जगतांना कांही थोडंफार तरी आगाऊ ठरवतो; नि त्यांतलं बरचसं साधून जाण्यांत, स्वतःच्या अगदीं नैसर्गिक आत्मविश्वासाच्याच जोरावर, अंशतः कां होईना, तो नक्कीच विजयी होऊं शकतो ! त्यानें मरतांना मागें ठेवलेल्या जगांत व जगावर आपल्या अस्तित्वाच्या लहानमोठ्या परिणामकारक खाणाखुणाहि ठेवल्याशिवाय तो जात नसतो,.. म्हणूनच ! !"—

त्यावेळीं मीनेच्या अनेक ताज्या स्मृती भरभर आठवल्या असाव्यात मामांना !—त्यांनीं एकामागून एक दोनतीन निश्वास टाकले; नि शेवटीं, ते गंभीर आवाजांत म्हणाले—"हं !-खरं आहे, तात्या !—या मृत्यूनेंच कोणत्याहि लहानमोठ्या माणसाच्या आयुष्याला अतिशय अगम्य...दिव्यत्व येतं, एवढं मात्र खरंच !—मागें राहिलेलीं जिवंत मनं, त्या मृतांच्या आयुष्यांतल्या अगदीं क्षुल्लक प्रसंगांच्या आठवणींचीहि पारायणं नि उजळणी करतात !—हो, या आम्हाला अनोळखी अशा मृत्युदेवाच्या मगरमिठींत...नि त्याच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या निष्ठुर ज्वाळांच्या जिवंत माणसांना लागणाऱ्या या दाहक आंचींतच—मनुष्याचं मन आपल्याबद्दल नि दुसऱ्या जीवांबद्दल जास्तींतजास्त सहानुभूति व रसिकता दाखवतं !—"

"हं...पण वेड्या, असल्या प्रसंगांचंच कशाला पाहिजे या ?"—तात्या मामांकडे पाहून पटकन् म्हणाले—"अशा वेळीं तर—अगदीं मोडक्या-तोडक्या जड वस्तूंनाहि एकदम लाखांचं मोल चढतं !—ते शहाजहांचे ताज-महाली संगमवरी दुःखाश्रू नि रस्त्यारस्त्यावर उभे असलेले मोठ्यामोठ्यांचे मोठे दगडी पुतळेच कशाला पाहिजेत ?—अरे—प्रत्येकाच्या घरोघरीं, त्याच्या खिशांत, फार काय त्याच्या अंगावरील खाणाखुणांतहि,...ही मागाहून अति-



शय सुखद ठरणारीं...मनाला विरंगुळा देणारीं...गोड प्रतीकं आढळतील !—...आणि त्या दिव्य रसिक दृष्टीनेंच त्यांच्याकडे पहात...त्यांच्या आधारावरच तर मनुष्य जगांत पुढेंहि जगत रहातो !—"

★

तात्यांच्या त्या शब्दामुळेंच कीं काय, कोण जाणे, मला अगदीं नकळत, माझा हात आपोआप माझ्या कोटाच्या खिशांकडे गेला !—

हस्तिदंती पांढरा मोनोग्राम मध्यभागीं असलेली एक काळी सुबक सिगारेटकेस होती त्यांत !—ती माझ्या हाताला लागतांच मी किंचित् दचकलों !

विमानविद्येंत कौशल्य मिळविलेल्या माझ्या एका सुविद्य, उमद्या, माझ्याच बरोबरीच्या, तरुण, रुबाबदार जानीदोस्ताच्या मालकीची होती ती !—

चार महिन्यापूर्वी, चालू लढाईच्या कामगिरीवर त्यांचं 'इंडिआ स्कॉड्रन' गेलं. त्यावेळीं, विलायतला जाण्यासाठीं, जुहूहून आमचा निरोप घेऊन तो निघाला !—आपल्या विमानासह उडण्यापूर्वी, त्यानें, मोठ्या प्रेमानें, 'पुन्हां परतेपर्यंतची आपली छोटीशी भेट' म्हणून, ती अगदीं हसत हसत माझ्या हातांत दिली होती !—

आणि मग पटकन् मला आठवलं...त्याचा तसा जातांना निरोप घेण्यासाठीं, माझ्याबरोबर माझी मीनाहि सुंदर पोषाख करून आली होती !—त्याचं विमान वर उडाल्यावर त्यानें आमच्याकडे हसत खालीं पाहिलं. तेव्हां मीनानें हसत हसत हीच सिगारेटकेस वर हात करून त्याला दाखविली होती.—

—पण हाय ! त्याच्या अगदीं तिसऱ्याच दिवशीं, त्याच्यासकट तें विमान खालीं कोसळून जळल्याची वर्तमानपत्रांतून छापून आलेली भयंकर बातमी...भरल्या डोळ्यांनीं नि दुःखी हृदयानें, मीना व मी...आम्हा दोघांना दुर्दैवानें वाचावी लागली होती !—

आणि आतां तर मीना देखील एकाएकी सोडून गेली होती आम्हाला !

★

त्या साऱ्या प्रसंगांची नि त्या दोघांची आठवण करून देणारी ती पेटी खिशांतून बाहेर काढतांना माझा हात थरथरत होता. ती डाव्या हातांत उभी धरून, मी आंगठ्यानें वरची पांढरी हस्तीदंती पट्टी माझ्या अंगाकडे थोडी ओढली—'टण् टण् टण् टण्' उड्या मारून, चार सिगारेटी आंतल्या स्प्रिंगवर थरथरत उभ्या राहिल्या; त्या मी त्या तिघांपुढें केल्या—

तात्यांच्या बोलण्यावर विचार करतांकरतां, मामांनी माझ्या केसमधली सिगारेट घेण्यासाठीं आपला उजवा हात पुढं केला; पण—त्यांतली एक आपल्या आंगठ्याच्या नि पहिल्या बोटीच्या चिमटींत त्यांनी धरली मात्र... त्यांच्या अंगांतून त्याच वेळीं एक लाट जाऊन त्यांना शहारल्यासारखं झालेलं मला दिसलं !—

माझ्या चटकन् लक्ष्यांत आलं कां तें !—त्या त्यांच्या पहिल्या बोटावरच मीनेच्या हालचालीचा...तिच्या जीवनकलहांतील अगदीं शेवटच्या धडपडीचा, एक प्रत्यक्ष पुरावा होता !—

तिच्या त्या दुखण्याची मला आठवण झाली. सकाळपासून तापानं ती फणफणत होती; म्हणून मामा व मी तिच्याजवळ सारखे बसून होतों दुपारीं तिला एकाएकी मोठी फिट आली; त्यावेळीं, एकदम दांतखिळी बसतांना, तिची जीभ त्यांत सांपडून तुटूं नये, या पितृहृदयाच्या तीव्र धडपडीनें, मामांनी तिच्या तोंडांत ती ढकलण्याचा नेटाचा प्रयत्न केला; तेव्हां त्या गडबडींत त्यांच्या पहिल्या बोटाचं पुढलं पेर मीनेच्या मिटल्या तोंडांत करकरून सांपडलं होतं !—शेवटीं, त्यांनीं तें प्रयासानं कसंबसं सोडवून घेतलं होतं...पुढले सारे प्रयत्न निष्फळ ठरून, त्यांच्या अंगाखांद्यावर वाढत आलेली त्यांची मीना त्यांना सोडूनहि गेली होती !—पण मग त्यांच्या बोटावरचे ते तिच्या दांतांचे खोल व्रण मात्र अजूनहि त्यांच्या अंगावर कायम ताजे राहिले होते !—

★

चिंतुतात्यांनी सिग्रेट घेतली नि नेहमीच्या सवयीप्रमाणं, हातांची मूठ दाबून तिचा एक मोठासा झुरका घेतला;...त्या जळत्या टोंकाचा प्रज्वलित



उजेड त्यांच्या हातांतल्या आंगठीच्या खड्यावर पडून तो चमकला. तात्यांनी ती काळवंडलेली आंगठी बोटांतून पटकन् काढून माझ्यापुढें केली नि म्हटलं—"ही एक स्मृति बघ, मधू !...माझ्या वडिलांमागें ऐन तारुण्यांत वैधव्य येऊनहि, हजारों संकटांशीं झगडत...नि काबाडकष्ट करीत, माझ्या आईनें माझं शिक्षण पुरं केलं;...तिला हें जग सोडून गेल्याला आतां जवळजवळ पंचवीस वर्षं झालीं !—पण तिच्या स्त्रीधनांतली ही उरलीसुरली मूल्यवान् वस्तू;... आतां अगदीं ओबडधोबड नि विद्रूप दिसत असूनहि मला ती कोटी किंमतीची वाटते !—हें मोठं स्मारकच आहे एक चालतं बोलतं, तिचं !—"

इतका वेळ अगदीं गप्प राहिलेल्या भय्याकाकांनीं तेवढ्यातच थोडी चळवळ केली. माझ्याकडून घेतलेली सिगारेट अजून न पेटवतां तशीच तोंडांत धरून, अर्धवट बोबड्या येणाऱ्या शद्बांबरोबर बेफिकीरीनें ती वर-खालीं हालती ठेवत, ते म्हणाले—'थांबाहं !'...आणि दोन्ही हातांनी ते आपले सारे खिसे चाचपूं लागले.

शेवटीं, त्यांनी एका खिशांतून एक मळकी काळी डायरीवजा चोपडी बाहेर काढली; आणि ती आमच्यापुढें करीत ते म्हणाले—"पहा बरं... हिच्यांत तुम्हाला कांहीं वाचण्यासारखं सांपडतं कां ?—"

चंद्राच्या स्वच्छ चांदण्यांत त्या वहीचीं सारीं पानं चाळूनहि, मला तरी कसला मजकूर सांपडेना !—नाही म्हणायला मधून मधून पेन्सिलीनें काढलेल्या फुल्या, वर्तुळं नि आडव्याउभ्या रेघोट्या तेवढ्या दिसत होत्या !—बाकी ती अगदीं साफ कोरी होती !—

तात्यांनी पेटवून पुढें केलेल्या काडीवर आपली सिगारेट पेटवून घेत, भय्याकाका आर्द्र डोळ्यांनीं आमच्याकडे पहात म्हणाले—"पुरीं सोळा वर्षं होऊन गेलीं...ही गोड स्मृति, मोठ्या आस्थेनें, मी पहिल्या प्रथम माझ्या खिशांत टाकल्याला !...तुम्हाला तिथें नुसतीं ओबडधोबड वर्तुळं, फुल्या नि रेघोट्या तेवढ्याच दिसल्या असतील ना फक्त ?—पण मला !—आजहि तीन वर्षांचीच दुडदुड धावणारी खेळकर पोरगी तिच्यांत दिसते !...हो—या रघू-

मामाच्या मीनाबरोबरचीच माझी वीणा !—तिचे गोडगोड बुद्धि-मान प्रश्न नि निष्पाप स्वैर हास्य एकदम ऐकूं येत ! ज्या ज्या वेळीं मी ही वही उघडून पहातों, त्या त्या वेळीं, तो सारा आतां नामशेष झालेला माझ्या आयुष्याचा जिवंत इतिहास...दिसतो—एकंदर ! खेळतांखेळतां त्या पोरीनें, स्वतःच, या त्याच्या अभिनव लिपींत, जणू माझ्यासाठींच, येथें तो मांडून ठेवल्यासारखं वाटतं मला !—पुढल्या अनंत काळासाठीं तरतूद करून ठेवली आहे यांत तिनें !—"

मामांनी भय्याकाकाकडे पहात, सहानुभवानें एक मोठा विश्वास टाकला.

"हीं असलीं स्मृतिचिन्हं तरी त्या माणसाच्या मागें रहातात, हें केवढं सद्भाग्य आपलं !—" सगळ्यांच्याकडे पहात तात्यांनीं निवाडा दिला.

प्रत्येकाला मनोमन पटत होतं तें सर्व...

★

तेवढ्यांत भय्याकाका हळूच म्हणाले—"पण कल्पना करा, तात्या,.. एखादं सुखद स्मृतिचिन्ह त्या माणसासारखंच पुढें एकाएकी नाहींसं झालं त्यांच्यामागून, तर काय होईल आपल्या मनाची स्थिति ?—"

"छेः...तें कसं शक्य आहे, भय्याकाका ?—" मी मध्येंच एकदम म्हणालों—"जड वस्तू असतात ना त्या ?—निदान एका माणसाच्या हयातींत तरी टिकतील कीं नाहीं ?—"

"कां बरं ? शक्य आहे...अगदीं शक्य आहे तसंहि, मधोबा !—" तसलं आव्हान देतांना भय्याकाकांचे घारे डोळे चांदण्यांत एकदम चमकले; माझ्याकडे पाहून ते पुढें एकदम म्हणाले–"समजा, माझ्या एका वऱ्हाडांतल्या जानी-दोस्ताच्याच आयुष्यांत घडलं असलं तसं अगदीं प्रत्यक्ष...तर ?—"

"काय ...म्हणतां काय ?—" मी आश्चर्यानें म्हणालों—

"अगदीं हृदयविदारक हकीकत आहे ती !"—भय्याकाका सिगा-रेट अर्धवटच विझवून दूर फेंकत देत म्हणाले—"त्यांतले बहुतेक प्रसंग आतां याक्षणींहि प्रत्यक्ष घडल्यासारखे माझ्यासमोर दिसले नसते, तर मलाहि



आश्चर्यच वाटलं असतं !...मनुष्याच्या अज्ञानाची, ज्ञानाची, आत्मविश्वासाची, भावड्या श्रद्धाळू जीवनाची,...असल्या साऱ्या गोष्टींची अगदीं एकाच वेळीं मला जाणीव होते, त्या धक्क्याबरोबर !—"

★

आम्ही सारे उत्सुकतेनें भय्याकाकांच्या तोंडाकडे पहात होतों;...त्यांच्या चेहऱ्यावर तर अद्भुततेचे सारे भाव उमटून जात होते भरभर;.. त्या गोष्टीच्या विचारांतच ते गढले होते क्षणभर, सांगण्यापूर्वी—

चंद्र जवळ जवळ डोक्यावर आला असल्यामुळें, भोंवतालचं तें वाता-वरणहि अगदीं अद्भुतरम्यच दिसत होतं !...आतां भय्याकाका आम्हाला सांगूं लागतील, म्हणून दोन तीन मिनिटं आम्ही अगदीं गप्पगप्पच त्यांच्या-कडे पहात होतों;—पण अजून सांगायला सुरवात झाली नव्हती त्यांची—

तोंच भय्याकाकांनीं आपल्या तोंडातील दातांची कवळी एकाएकी कट्कन् आपल्या हातांत काढून घेतली !—त्यांच्या त्या अनपेक्षित हाल-चालींनीं आम्ही सारेच एकदम दचकलों—

तेवढ्यांत, भय्याकाका माझ्याकडे पहात हसत म्हणाले—"हं दचकूं नका असे, मधोबा ! एका म्हाताऱ्याची खोटी बत्तिशी आहे ही ! पण मग माझ्या मुलाला किंवा एखाद्या मित्राला, म्हातारपणींहि खेळकरपणें वागणाऱ्या आपल्या बापाचं-मित्राचं स्मृतिचिन्ह म्हणून ही ठेवण्याची इच्छा झाली, तर आश्चर्य वाटणार नाहीं मला !—मनुष्याचा जीव असल्या जड गोष्टींतच अधिक गुंततो !—माझ्या त्या मित्राचंहि तसंच झालं—"

भय्याकाकांचं तें दंतविहीन बोळकं आतां अगदीं स्वैरपणें हलत होतं-नि त्यांचा चेहरा अधिकच रहस्यमय दिसूं लागला होता !—माझी उत्सुकता पार पराकोटीला गेली होती !

त्यांच्या त्या उंदरामांजराच्या खेळाचा मला खूप राग येत होता—

इतक्यांत, भय्याकाका एकदां खांकरून गंभीर चेहऱ्यानें गंभीर आवाजांत सांगूं लागले—

★

“ फार नाही वरं, तेराचौदा वर्षंच झालीं या गोष्टीला !—माझ्या शेजारच्या गांवीं रहाणाऱ्या माझ्या एका श्रीमंत सावकार मित्राच्या घरचीच हकीकत आहे ही —

त्याचा एकुलता एक मुलगा ! सत्राअठरा वर्षांचा, अगदीं धडधाकट, निरोगी पिंडाचा नि रुबाबदार !—एके दिवशीं संध्याकाळीं घरीं आला नि एकाएकीं मोठमोठ्यानें रडत जमिनीवर गडबडा लोळूं लागला !—बाप नि घरांतली सारी मंडळी अगदीं मनस्वी घाबरून गेली !—

त्या छोट्या खेड्यापासून चांगलं पांचदहा मैलावर तालुक्याचं गांव !—पण तिथं रातोरात घरची मोटर पाठवून, तिथले दोन्ही डॉक्टर नि सर्जन बोलवून आणले त्यानें !—साऱ्यांनी आपापल्या परीनें त्याची स्वतंत्र परीक्षा केली ! मग एकमेकांशीं खलबतेंहि केलीं !—पण काय ? कॅन्सर नाहीं,...अपेंडिसायटीस नाही...पेरिटोनायटीस नाहीं...तिसरंहि कांहीं नाहीं !...माहितींतल्या मोठमोठ्या नावांच्या कोणत्याच रोगाचीं लक्षणं तिथं जुळेनात !—मग होतं काय इतकं भयंकर पोटांत दुखायला ?...कांहीं एक समजेना कोणाला...

पण तरीहि, मोटारीच्या नि त्या डॉक्टरांच्या फेऱ्या होतच होत्या, त्याच्या घरीं !—औषधं-इन्जक्शनं आलटून पालटून बदललीं जात होतीं !—कसल्याच प्रकारच्या उपायांची तिथं कसली कमतरता नव्हती !—

तरी पूर्ण दोन दिवसांनंतरहि त्याची ती पोटदुखीची भयंकर तळमळ शांत होईना, कांहीं केल्या—

बाप शेवटीं हताश होऊन ओटीवर लोडाशीं बसला होता. त्याचा फक्त डॉक्टरवरच विश्वास !—आणि त्याच्या तारेप्रमाणं एक नागपूरचा प्रसिद्ध डॉक्टर केस हातांत घ्यायला संध्याकाळीं येणारहि होता !—तरी पण—



खेड्यांतील कल्पनांप्रमाणें, अंगारेधुपारे, गंडेदोरे, करणी-दृष्ट, भगत-मांत्रिक सारे वरचे उपायहि आपल्या मुलावर करून पाहिले होते त्यानें दरम्यान !—पोटांतलीं औषधं नि इन्जक्शनं मात्र डॉक्टरांचींच !—आठ अक्षरी मोठ्या नांवाचा तो एक मोठा रोग ठरून, उद्यां सकाळीं मुंबईच्या त्या सर्जनकडून मुलांचं ऑपरेशन व्हायचं होतं ?—

★

इतक्यांत, दाराशीं धर्मा धनगर येऊन उभा राहिला, संध्याकाळच्या वेळीं, त्या दिवशीं !—

जरेनें त्यांची कंबर अर्धवर्तुळाकार झाली होती. तोंडाचं माझ्यासारखं ‘मंमं’ बोळकं नि चेहऱ्याचं, वाढलेल्या पांढऱ्या दाढीमिशांचं मोठंथोरलं जंगल झालं होतं !—

आपल्या अडीअडचणीला मदत करणाऱ्या, आपल्या त्या सावकाराकडे, आपले खोल गेलेले डोळे लावून, धर्मा जोडल्या हातानं, अर्जीजीच्या स्वरांत त्याला म्हणाला—“ धनी, धाकल्या धन्यांच्या आजाराची बातमी आगीसारकी गांवांत पसरली; तवां धावत आलों पायाशीं ! उद्यां पोट चिरनार त्यांचं म्हनत्यात्—ममयचे डागदर—तवां म्हनलं, पाहूं आंपल्याच्यान् काय व्हईल-बळल का !...बगूं का जरा धन्यांना—?”

“ जा बघ, पाहिजे तर, धर्मा ! ” एक निराशेचा निश्वास टाकून माझा मित्र म्हणाला, “ पण आतां आपल्या कोणाच्या हातचं नाही उरलंय्, धर्मा, तें !...फुकट आहे माझं वैभव सारं, या प्रसंगीं !—”

कांही एक न बोलतां धर्मा घरांत गेला—

बिछान्यावर तळमळत पडलेल्या त्या तरुण जीवाला त्यानें एकदां आपादमस्तक पाहिलं;...बोटानं जरा बाजूला ओढून त्याच्या दोन्ही डोळ्याच्या खालवरच्या पापण्या त्यानें आंतून पाहिल्या. मनगट हातांत धरून नाडी अजमावली !—पोटावरून हात फिरवून एक दोन ठिकाणीं दाबून पाहिलं... ओठांवरची नि चेहऱ्यावरची फिकट कांतीही बघितली...

नि पुन्हा कांही न बोलतांच धर्मा ओटीवर आला !—

★

सावकार तर आपल्याच दुःखांत अगदीं चूर होता;…त्यानें धर्माकडे नुसती वर मान करूनहि पाहिलं नाहीं !—

धर्मा क्षणभर थबकून, चालूं लागला !—पण पायऱ्या उतरतां उतरतां पुन्हां थांबला नि मागें वळत तो थोड्या ओशाळ्या आवाजांत माझ्या मित्राला म्हणाला—"धनी, येक औषाद हाय् मायापाशी !—करतां तें…धाकल्या धन्यांना ?…बोला ??—हटकुन गुन येईल या रोगावर !—पोट चिराया नको नि कदस्याचा खर्च बि न्हाई !—च्यार पैशांत काम व्हईल समदं !—"

एकदम दचकून वर पहात सावकार त्याला म्हणाला, "औषध ?—कसलं औषध म्हणतोयस, वेड्या तूं, धर्माऽ ?…कुठं लेप लावायचा ?"

"ल्येपबीप न्हवं !" धर्मा आत्मविश्वासानें चमकणाऱ्या डोळ्यांनीं,.. पण मनांतला संकोच नि आपल्या सावकाराच्या वैभवाची भीति यांनी थोड्या घाबरल्या चेहऱ्यानें म्हणाला—"मी काय वायू पाला चुरडुनशान् वाडगाभर रस येतो काढून—तो चांगला घटघटा पाजायचा पोटांत, धाकल्या धन्यांच्या !—"

"काय ? पोटांतलं औषध ?…बापरेऽ !—" माझ्या मित्रानं अगदीं घाबरल्या आवाजांत मोठ्यानं म्हटलं; नि मग आपली मान पुन्हा खालीं घातली ती घातलीच !—

किंचित् काळ वाट पाहून, धर्मानें लागलीच प्रसंग ओळखला;… आपल्यासारख्या अशिक्षित गरिबाची त्यावेळची तिथली पत त्यानें जाणली !—नि मग पुन्हा पुन्हा मागें वळून पहात, निमूटपणें पायऱ्या उतरून शेवटीं तो आपल्या घराकडे निघून गेला. "

★

बोलतां बोलतां भय्याकाका एकदम थांबले !—शृंखला तुटल्यामुळं आम्ही एकदम भानावर आलों. चिंतुतात्यांनीं विडी पेटवली. मामा एकदा-



दोनदां खांकरले. मी जवळचे एकदोन दगड उचलून, उगीचच, चांदण्यांत डोलणाऱ्या एका झुडपावर मारले…

तेवढ्यांत,…लांबून,…कुर्ल्यांकडे जाणाऱ्या विजेच्या इंजनाचा स्पष्ट खडखडाट नि कर्कश शिटी कानावर येऊन आदळली !—फिरून अगदीं शांत झाल्यामुळें, जवळच्या एक दोन झाडांवरचीं पानं सळसळल्याचाहि आवाज मोठ्यानें आला. शेजारच्या खुरट्या झुडपांचे शेंडे हळूंच हलविणाऱ्या झुळझुळ वाऱ्याची सूक्ष्म कुजबुज नि चाहूलहि मला ऐकूं येत होती !—

शेवटीं, ती निःशब्द भयाण शांतता, मला अगदीं असह्य होऊन, मी भय्याकाकांना विचारलं—"मग पुढं ?…त्यानंतर काय झालं ?—गेलं का तें धर्माचं औषध त्याच्या पोटांत ??—"

"छेऽऽऽऽ !—तेंच तर सांगतोय् ना मी आतां !"—अधिकच गूढ चेहरा करून, आम्हा सर्वांकडे पहात भय्याकाका पुढें सांगूं लागले—

★

" तें धर्माचं औषध म्हणजे कांहीं इंग्लंड रिटर्न्ड एम. डी. एफ्. आर. सी. एस्. डॉक्टरचं औषध नव्हतं !—नि पुन्हां तें पोटांतलं ना ?—म्हणजे आला कीं नाहीं मोठा धोका ??—

शेवटीं, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं, कशाकरतांसं दोन तासांचं पोटाचं मोठं थोरलं ऑपरेशन झालं; तसं, पूर्वीइतकंच तळमळत तळमळत, तो तरणा जीव, आपल्या रोग जर्जर शरिराला, अगदीं त्याच दिवशीं कायमचं सोडून निघून गेला !—

माझ्या मित्राच, त्यावेळचं दुःख किती अफाट असेल तें मी तुम्हाला सांगायला नको !—पण मग आल्या परिस्थितीला तोंड देण्यावाचून दुसरं काय हातीं होतं त्याच्या?—दुःख निमूट पचवून, करायचं तें सारं उरकलं गेलं !—अस्थी आणायला आम्ही बरोबरच गेलों दोघं !—

पण तिथं मात्र एक भयंकर आश्चर्य वाढून ठेवलं होतं, आमच्या

वांध्याला ! तुम्हाला खरं वाटो न वाटो —चांगला लिंबाएवढा मोठा काळसर नि जडजड, चांदीसारख्या धातूचा, वितळून एके ठिकाणीं झालेला ओबड-धोबड गोळा सांपडला आम्हाला, त्या चितेच्या राखेंत…

त्या स्मशानशांततेंत आम्ही दोघंहि प्रथम एकदम केवढ्यानें तरी दचकलों !—पण तें भयंकर कोडं आम्हाला कांहीं उलगडेना !— ”

★

भय्याकाका पुन्हा क्षणभर विचार करत थांबले…

मी खात्री करून घेण्यासाठीं म्हणालों–“ काय ?–चांदीचा गोळा ? ? ”

“ हो !–काळसर चांदीचा जडजड गोळा !–” भय्याकाका आमच्याकडे न पहातांच पुढें म्हणाले…“ मोठं चमत्कारिकच होतं नाहीं सारं ?— ”

आम्ही सारे त्यांच्याकडे पहात होतों–तेवढ्यांत भय्याकाका पुढें म्हणाले–“ तरी शेवटीं—आपल्या मुलाची शेवटची आठवण म्हणून माझ्या मित्रानें कांही न बोलतांच माझ्याकडे एकदा पाहून, तो आपल्या आंतल्या खिशांत घातला !—

त्या वेळच्या त्यांच्या त्या भयंकर दुःखांत…लहानसं–मोहरीएवढं कां होईना- सुखच होतं त्याला मिळालेलं ! तो गोळा म्हणजे !

कांहीं दिवसांनी माझ्या मित्राच्या डोक्यांत एक चमत्कारिक कल्पना आली !—आपल्या सोनाराकडून त्यानें त्या गोळ्यातूनच एक सुबक चांदीची वाटी करवून घेतली आपल्यासमक्ष !—

आणि त्या दिवसापासून ती चांदीची वाटी ( मागल्या साऱ्या मिश्र आठवणींसह ) त्याच्या घरांत वावरूं लागली !—तें त्या मागलं रहस्य मात्र त्याच्या–माझ्याशिवाय घरांतहि कोणाला ठाऊक नव्हतं !—तसं पाहिलं तर घरांतील इतर चांदीच्या भांड्यात ती जरा काळसरच दिसत असे !—पण आपल्या प्रिय पुत्राची ती गूढ स्मृति म्हणून…नेहमीं जेवतांना, त्या वाटीला



एकदां प्रेमानें हातांत घेऊन तो ती आपल्या ताटाशीं नुसती ठेवीत असे, न विसरतां ! ”

★

“ अजबच आहे म्हणायचं अगदीं !—” मामा भय्याकाकांना एकदम म्हणाले.

“ तीच तुमच्या मित्राला आपल्या मुलाची गोड आठवण म्हणून कांही काळ ठेवतां आली आपल्याजवळ !—” मीहि उतावळ्या मनानें भय्याकाकांना विचारलं पुढें—“ पण तेंच स्मृतिचिन्ह नाहींसं झालं त्याच्याकडून असं सुचवायचंय् कां तुम्हाला, भय्याकाका ? कोणी चोरून नेली ती…कीं, हरवली—कीं—”

“ थांबा हो मधोबा…कसलाच तर्क करूं नका !—” भय्याकाका तरीहि शांतपणें मला म्हणाले--“ चोरीबिरी कांही नाही !--नि हरवणंहि नाहीं ! मनुष्याच्या अज्ञानामुळं ती त्याला प्राप्त झाली होती !--त्याच्या अज्ञानानेंच ती त्याच्याजवळ कांही काळ राहिली—नि त्याला नकळत झालेल्या ज्ञानाच्या अज्ञानानेंच ती नाहीशी झाली फिरून !--”

“ कांही एक उलगडा होत नाहीं बुवा यांतून !—” मी त्राग्यांत म्हणालों--

“ म्हणूनच म्हणतों, मधोबा, जरा थांबा !—मीच सांगतोय् आतां अगदीं शेवटपर्यंत ? ” भय्याकाका माझ्या उतावळेपणाला हंसत पुढें सांगूं लागले--

★

“ असेच कांही दिवस…आठवडे…महिने निघून गेले !…जगरहाटीप्रमाणं माझा मित्रहि पुढें चालला होता;…त्याच्या घरीं आतां नव्या गोजिरवाण्या मुलाचा जन्म झाला होता—

मागलीं दुःखं माणूस विसरतो…नि नवीन सुखं तयार करून…त्यांच्या

आशेंतच आपला भाबडा जीव गुंतवून, तो जगतच रहातो जगांत—अजून डोळे देखील नीट न उघडलेल्या त्या नव्या छकुल्याच्या निरर्थक हाल-चालींत माझा मित्रहि तास तास रंगून बसे–नव्या नव्या भावी कल्पना–चित्रांत मनांतल्या मनांत फिरे !—

त्या नव्या मुलाच्या बारशाच्या दिवशीं, मुद्दाम स्वतः येऊन, मला त्यानें जेवायला बोलवून नेलं होतं !

चांदीच्या भांड्याचे दोन छानदार संच त्यानें पाटावर जवळ जवळ मांडले होते !–निरनिराळ्या पातळ नि सुक्या भाज्या त्या चांदीच्या ताटांभोंवतीं चांदीच्या वाट्यांतून वाढलेल्या दिसत होत्या !—

आणि त्यांतच माझ्या मित्राच्या ताटाजवळ–ती जरा काळसर दिसणारी मला अगदीं सुपरिचित असलेली चांदीची वाटी होती !—

त्या वाटीकडे टक लावून पाहून, त्यानें एकदां साऱ्या पूर्वस्मृतींनी भरलेला अर्थपूर्ण धावता दृष्टिक्षेप टाकला, माझ्याकडे !—

मला वाटतं, त्याच दिवशीं त्यानें ती चांदीची वाटी जेवतांना प्रत्यक्ष वापरायला घेतली होती—

★

आम्ही तसेच सुखदुःखमिश्रित भावनांनीं जरा अबोलपणेंच जेमतेम पहिला भात जेवलों असूं नसूं–इतक्यांत माझा मित्र आश्चर्यानं ओरडून म्हणाला "अरेऽ ? हें काय ?"

चटकन् वळून पाहिलं तिकडे, मीही—

त्या चांदीच्या काळ्या वाटीजवळच आंतल्या पातळ भाजीचा एक ओघळ पाटावर पसरला होता !—

ती हळुवार हातानें उचलून घेत नि तिच्याकडे निरखून पहात, माझा मित्र, स्वयंपाक खोलीकडे पहात आचाऱ्याला म्हणाला—"घासतां विसतानां भोंक तर नाहीं ना पडलं आज, या वाटीला ? संभाळून करावींत कामं—"



पण त्याच क्षणीं, तिकडे पहातां पहातां, केवढं भयंकर आश्चर्य बघितलं मी माझ्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष ?—

हातांतल्या त्या वाटीच्या तळांतून भसकन् सारी पातळ भाजी माझ्या मित्राच्या ताटांत सांडली !—नि तो व मी त्या वाटीकडे तसेच मंत्रमुग्ध-झाल्याप्रमाणें बघतां बघतां, तिचा खालचा सारा तळच्या तळ जशी पाण्यांत साखर विरघळत जावी ना,...तसा भर-भर-भर-नाहींसा होत गेला माझ्या दृष्टीसमोर !—

★

माझ्याबरोबरच माझा मित्रहि मोठ्यानें दचकला !—त्याच्या चेहऱ्यावर भीती, दुख, गोंधळ...साऱ्या मिश्र उत्कट भावना एकदमच उमटत होत्या !—

कसल्याशा विचारानें—तो तसाच ताडकन् पानावरून उठला; नि मलाहि जवळ जवळ हातानें उठवीतच घाबरल्या आवाजांत म्हणाला—"चल रे चल माझ्याबरोबर ! –मग मागाहून पाहिजे तर निवांतपणें जेऊं !!—"

त्याच्या बायकोसकट घरांतली सारीच मंडळी त्या एकंदर गोंधळांत बावरून आमच्याकडे पहात होती ! —

आम्ही कसेबसे कपडे अंगावर चढवले एवढेच !—आपल्या मोटारींत त्यानें मला जवळजवळ कोंबलंच; नि ती अगदीं भरधांव सोडून मोठ्या तांतडीनं, आम्हीं सरळ त्या धर्मा धनगराच्या खेड्यांतल्या झोंपडीपाशीं येऊन पोहोंचलों !—

तो बिचारा नुकताच दुपारचं जेवण करून, विश्रांती घेत आपल्या खाटेवर पडला होता !—अगदीं ध्यासभ्यास नसतां, तशी आपल्या सावकाराची मोटर–त्यांतून स्वतः सावकारच प्रत्यक्ष उतरून–आपल्या झोंपडीच्या दाराशीं पहातांच, तो अतिशय भांबावल्या नजरेनं दचकून उठला !—

माझा मित्र तर खालीं उतरल्याबरोबर जवळ जवळ धांवतच धर्माजवळ पोहोंचला होता !—त्यानें त्या म्हाताऱ्याचा हात एकदम मोठ्या अधिर मनानं

आपल्या हातांत घट्ट धरला; नि गांगरल्या आवाजांत भरभर शब्दांत तो मोठ्यानें ओरडला–" धर्मा ऽ...धर्मा ऽऽ!—बाबा, माझ्या पोराला तूं त्या दिवशीं कसलं औषध देणार होतास, सांग आधीं मला !—"

★

धर्माचा चेहरा त्या प्रश्नानं भरभर पालटत गेला !—अपमान... राग,...दुख,...अनुकंपा...सारे सारे भाव एकामागून एक त्याच्या मनांत त्यावेळीं येऊन गेले असावेत, असा त्याचा तो जख्खड चेहराहि सांगत होता !–

पण तरी, क्षणभरांत, आपल्या मनावर पुन्हां ताबा मिळवून, धर्मा अगदीं आदबीनेंच आपल्या सावकाराला म्हणाला—" आतां कशाला पाहिजे धनी, तें सारं ?...झालं–गेलं...संपलं !!–"

मग एक सुस्कारा टाकून, तो थोड्या कठोर शब्दांतच म्हणाला–"आन् ह्ये बगा धनी,...मी औषाद देतो लोकांना कदी कदी;...पन् त्येंची नांवं न्हाइ सांगत कोनाला कदी !!—"

त्याच्या त्या शब्दांनीं तर, माझा मित्र अधिकच अगतिक झाला; नि गयावया करीत, त्याला अधिर शब्दांत पुन्हा म्हणाला—" धर्मा ऽ! नको रे असं करुंस, धर्मा ऽ!...मला सांग...मला सांग ?—मला सांग ?—तुला काय हवं तें देईन मी, धर्मा !—"

पण त्यामुळें तर धर्माचा चेहरा अधिकच रागीट झाला फिरून !—तरी क्षणभरांत तो आपल्या सावकाराकडे सौम्यपणें पाहूं लागला–नि मग म्हणाला– " कां हिनवतां मला अस–धनी ?...औषादाचं नि त्याच्या नांवाचं पैस घ्यायला मी काय ममयीचा मोटरवाला डाग्दर हाय व्हय ?—मला तुमचं राज्य दिलत् तरी बी नको !—त्यापरतं–तुम्हास्नी पायजे तर सांगतोंच कसं...सारं काय..."

" सांग धर्मा, सांग !—तुझा जन्मभर ऋणी राहीन मी !—" माझा मित्र, अत्यंत उतावळ्या भांबावल्या नजरेनें धर्माकडे आपली उत्सुक नजर लावून म्हणाला— "

★



आम्हीहि भय्याकाकांकडे उत्सुक नजर लावून पहात राहिलों— भय्याकाका–तात्या नि मामांकडे पहात-थोडावेळ थांबले—

"काय सांगितलन् धर्मानं औषधाचं नांव ?" मी भय्याकाकांना त्यांच्या मित्राइतक्याच उतावळ्या मनानं विचारलं—

भय्याकाका गंभीरपणं माझ्याकडे पहात म्हणाले—

" धनीऽ !–माजं अगदीं रामबान औषाद नवतं !—" धर्माच्या तोंडून तें नांव यायला तरी क्षणभर वेळच लागला "मी थोडं मीठ नि हळद घालूनशान्-ताज्या-माठ-चाकवताच्या पाल्याचा रसच घसघसून पाजणार व्हतों बाडगाभर, धाकल्या धन्यांना ?"—

मनाविरुद्धच आपलं गुपित कसंबसं सांगून झाल्यावर धर्मानें मान खालीं घातली !—

"म्हणतोस काय, धर्माऽ ?...बाऽपरेऽ ! अरे दुर्दैवा !" एवढे तुटक शब्दच माझ्या मित्राच्या तोंडून जेमतेम बाहेर पडले !—

आणि म्हाताऱ्या धर्माच्या झोपडीच्या मोडक्या दारशींच, तो स्वतः एकदम मूर्छित होऊन, धाडकन् खालीं कोसळला !—

अगदीं त्याच वेळीं मलाहि ताडकन् आठवलं— आम्ही घरीं अर्धवटच टाकून आलेल्या त्या दिवशींच्या त्या जेवणांत, माझ्या मित्राच्या मळ्यांतल्या ताज्या माठ–चाकवताचीच पातळभाजी...त्या वाटींतून आम्हाला वाढून ठेवली होती !— "

★

भय्याकाकांचं सांगून संपण्यापूर्वीच...मामा, चिंतुतात्या नि मी तिघेहि केवढ्यानं तरी दोनदां दचकलों !—शेवटीं तिघांनींहि एकाच वेळीं तीन निश्वास टाकले !—

पिठासारखं स्वच्छ चांदणं आमच्याभोवतीं नि वरल्या निरभ्र आका-

शांत पसरलं होतं...तरी रात्र मात्र बरीच झाली होती; अजून घरापर्यंतचा लांब पल्लाहि गांठायचा होता आम्हाला !—

'चला—' मी भारावल्या व भारल्या मनानें म्हणत उठलों !

'चमत्कारच म्हणायचा मोठा !'—उठतां उठतां आमच्याकडे पाहून मामा म्हणाले—

"पण खरं म्हणजे डॉक्टरांचंच गाढ अज्ञान हें !—" मीनाची आठवण होऊन नि त्यावेळचा धांवता अनुभव जमेस धरून मी हळूंच म्हणालों.

"छे ! तसं नाही, मधू !...अरे, आपलीच धरसोड वृत्ति–आपलंच अज्ञान म्हणायचं हें !—" चिंतूतात्या विडी शिलगावीत गंभीरपणें म्हणाले.

"आपली अखिल मानव जातच मुळीं, अजून या विसाव्या शतकांतहि, अंधारांत चाचपडल्यासारखी चालतेय् !—मग कोणी कोणाला दोष तरी कशाला द्यावा उगीच ? ?—" मामा एक विश्वास टाकून म्हणाले...

★

गोष्ट सांगून झाल्यापासून भय्याकाका मात्र अजून कांहीच बोलले नव्हते !—ते अजून जागचे उठलेहि नव्हते !—

'त्यांचा कांही अभिप्राय नसेल का या बाबतींत ?'—या विचारानें मी त्यांच्याकडे पहात म्हणालों—"काय हो भय्याकाका, तुमचं काय मत या बाबतींत ?—आणि तुमच्या त्या मित्राला काय वाटलं त्यानंतर, त्यावेळीं ??—"

भय्याकाका जागचे उठले...आणि उठतां उठतां, मघां जशी एकदम काढली, तशीच, आतांपर्यंत हातांत धरलेली आपली दातांची कवळी, कट्ककट् करून त्यांनी पुन्हा आपल्या तोंडांत बसवली !—

ते उभे राहून माझ्याकडे बघत हसत असतांना, त्यांचे ते खोटे दांत, त्यांची ती बनावट बत्तिशी, चांदण्याच्या धूसर प्रकाशांत अगदीं अद्भुततेनें चमकतांना दिसत होती !—

"त्याचं असं आहे बघ, मधोबा !...माझा नि माझ्या त्या मित्राचा



सारा कांही अभिप्राय त्या गोष्टींतच भरलेला आहे !—" अजून कांही तरी सांगायचं मागें राहिल्याचा भाव भय्याकाकांच्या मिस्कील डोळ्यांत चमकल्याचा भास झाला त्यावेळीं मला !—

तोंच ते पुढे म्हणाले—"माणसं ... मृत्यू ... औषधं ... डॉक्टरी अज्ञान...मानवी अज्ञान ...नि त्यांचीं स्मृतिचिन्हं ...या सार्‍या बाबतींत आपण अगदीं मोठ्या तळमळीनं पण तावातावानं खल करत होतों ना मघां ?—त्यावरूनच बोलतां बोलतां एकदम ही गोष्ट मनांत आली !...त्यांतलं बहुतेक सगळं तत्वतः तरी खरं आहे मानवी अनुभवाला !...पण एक मात्र...माझा तसा कोणीच मित्र नाही जगांत !—हें सत्याला धरून सांगितलं पाहिजे तुम्हाला, शेवटीं !—"

"म्हणजे?"—चितुतात्या संशयित नजरेनें भय्याकाकांकडे पहात म्हणाले.

"हो ! कारण–ती गोष्टच सगळी काल्पनिक आहे !—इथल्या या टेकडीच्या थंड हवेंत नि चांदण्याच्या या गूढ धुक्यांत तुमच्याबरोबर बोलतां बोलतांच तयार केली मी ती मघां !—"

आम्ही तिघे पुन्हा एकदां दचकलों !—आमच्या तोंडून शब्द आले—'भलेऽ !' 'कमाल तुमची !'...'भय्याकाका ऽ !'...

भय्याकाकांच्या अजूनहि हंसत असलेल्या बनावट बत्तीशीनें आम्हाला चांगलंच बनवलं होतं खरं !—पण करमणूकीबरोबरच आमच्या विचारांनाहि मोठीच चालना मिळाली होती !!—

मघा तेच म्हणाले होते त्याप्रमाणें...भय्याकाकांची ती बत्तीशीची कवळी...त्यांच्या पश्चात्...त्यांचं गोड स्मृतिचिन्ह म्हणून मी तरी ठेवली असती अगदीं जपून !!—

[ २१–१२–४३ ]

# दोघांना जोडणारं पार्टिशन ! ★ रघुवीर सामंत

[दीर्घ कथा] ... ... ... ... ... ['सुवर्ण-पारखी']

— 'युवराज प्रथमच मुंबईंत दाखल होणार !' ही तार आली.

होता नवा जमाना; राणी–राजा–युवराज एक छोटा दिमतदार ! बस्स; घरांत सारीं चारच माणसं !—पण स्वतःचा राजवाडा अजून मुंबईंत नव्हता ना; म्हणून तर एवढी गडबड घाई—

तरी पण, जपान–मुंबईतलं अंतर भिऱ्या शहरी लोकांनी शून्य ठरवल्यामुळें मात्र, शोधाशोधीला भरपूर वांव होता. भाडीं कमी केल्याच्या पाट्या वाचत पायपीट करून, शेवटीं, बी. बी.–जी. आय. पी.–ट्राम–बस सार्‍यांना कावूंत पकडणारा एक नवासा 'राज–महाल' आढळला; तिथली व्यवस्था तर छान होती–आकाशी रंगाच्या दोन ऐसपैस खोल्या, एक खोलीवजा बाल्कनी, एक लंब–चिंचोळा पॅसेज, टोकाला स्वतंत्र बाथरूम—

मी तत्काळ झडप टाकून साडेसदतीसची रिसीट घेतली; नि दादरचं बस्तान मुक्रर केलं.

★

नव्या जागीं सामान कोंबलं; ठरल्या दिवशीं आपल्या मातोश्रींसह युवराज आले. राणीसाहेबांनी चौफेर चौकस नजर फिरवली; त्यांच्या चेहऱ्यावर साक्षात् पसंती प्रतिबिंबित होत होती; तरी शेवटीं त्या म्हणाल्याच—"सारं छान आहे ! पऽण "—

"पण काय ?" माझ्या छातींत धस्स् झालं.

"हा बाजूचा सिनेमा ?" गंभीर चेहरा करून सौ. म्हणाली—"तो रोज फुकट ऐकण्याचा फायदा आपल्या पदरांत पडणारच म्हणा !—पण तें



पार्टिशन पाहिलंत का पॅसेजचं ?...बिनतारी टेलिफोन नाही का व्हायचा तयार, या दोघांना जोडणाऱ्या पॉर्टिशनमुळें ? ?"

जागेबद्दलच्या मनपसंतीचा माझा कैफ, तिच्या त्या नव्या दृष्टीनें खर्कन् उतरला. होतं खरं त्यांत तथ्य ! 'राज-महाल'चा विधाता मोठा उदार नि कल्पक !! एवढी ऐसपैस जागा, इतकीं रंगीबेरंगी भारत–टाइल्स, इतका उजेड, डोक्यावरची मोठी थोरली सार्वजनिक आगाशी नि बांकं टाकलेली खालची टुमदार बाग...साऱ्या गोष्टी सहस्रकरांनीं देऊनहि त्याचं समाधान झालं नव्हतं; प्रत्येकाच्या घरांत चौफेर हवा खेळावी, म्हणून त्यानें दोन स्वतंत्र ब्लॉकमध्यें (जमिनीबरोबर प्लायवुड, मध्यें दुध्या कांचा, नि वर आडव्या-उभ्या लोखंडी सळ्या, अशा कल्पक बनावटीचं) एक लांबलचक सामाईक पार्टिशन उभं केलं होतं; एवढंच नव्हे, तर दूर दृष्टि राखून मध्यभागीं बंद लांकडी दाराचीहि व्यवस्था केली होती.

या योजनेनें एकमेकांकडे हवा अनिर्बंधपणें खेळण्याचा किती संभव होता, न कळे !—पण हवेतल्या शब्दांना मात्र अलीकडेपलीकडे जायला नक्कीच मोकळीक होती.

तें सौ. च्या लक्षांत यावं हें साहजिकच ! स्त्रियांची दृष्टी पुरुषांच्या दृष्टीहून भिन्न असते—"पलीकडच्या पॅसेजमधील दांड्यांवर कोणत्या मिलची–फॅशनचीं ब्लाउझ–लुगडीं–पातळं वाळतात ?...नि निदान त्याहून उंची किंमतीचीं...नव्या डिझाइनची वस्त्रं आपल्या अलीकडच्या दांड्यांवर वाळत घालण्याची आपली जबाबदारी आपण संभाळतोय् ना ?"—असली स्त्री–सुलभ तुलना–प्रश्न–दृष्टि टाकण्याची तर चांगलीच सोय होती, त्या व्यवस्थेंत...

★

"कसला हा धांदरटपणा ?" या दृष्टीनें सौ. माझ्याकडे पहात होती; आणि किंचित् अपराधी मनानें मी त्या पार्टिशनकडे पहात होतों.

तोंच सौ. नें पृच्छिलं–"कोण रहातात बाईऽ, शेजारीं ?"

'ही एक दुसरी आफत!—तिथल्या बाई-बुवांची मला काय बुवा माहिती?'—असे सर्व दृष्टीनें धिंधवडे निघूं लागल्यावर मात्र माझा एकदम पारा चढला; नकळतच सुशिक्षित राणीसाहेबांवर पायाच्या दासीप्रमाणें माझ्याकडून भडिमार होत गेला—"पुरे कर शहाणपणा!—गाडीभर शिकलं म्हणून उगीच खोल पाण्यांत शिरायची नि चांभारचौकशा करत बसायची जन्मजात संवय जाणार थोडीच तुम्हां बायकांची?"

"काय चुकलं? यांत कसल्या..."

"गप्प!..." तिला मध्येंच थांबवून मी पुढें म्हणालों—"नाही तर काय?—जागा घेण्यापूर्वी काय खानेसुमारी करायची असते, आसपासच्या लोकवस्तीची? कि सर्व्हेअरकडून नकाशा काढून घ्यायचा असतो, भोंवतालच्या प्रदेशाचा?...झालं काय इतकं,...सिनेमा असला जवळ तर?—हो हो!—नाही माहीत मला शेजारी!...नि हें सामायिक पार्टिशन म्हणते आहेस..."

"अहो, पण..." सौ. हसत मध्येंच मला खंड पाडूं लागली.

"लोक जीव घेऊन पळाले, म्हणून सुदैवानें कुठं अशी जागा तरी मिळतेय्!"—मी माझा पट्टा थांबवला नाही—"पण तुझं आपलं तिसरंच!—ट्राम-व्हिक्टोरिआच्या खडखडाटांत नि सामायिक नळावर पाणी पिऊन जिवंत रहाण्यांतहि जन्म गेला!—मोठी आलीय् सिनेमा, शेजारी, नि सामायिक पार्टिशनचं आतां अवडंबर माजवायला!—"

"समजलं!—पण..."

"कांहीं सांगूं नकोस!" तिला उसंत-अवसर न देतां मी मेलगाडी पुढें नेली..."ते आपले बहिरे मामा!...तेंच तेंच रेकॉर्ड...कमीजास्त स्पीड करून नि कधीं कधीं किल्ली न देतांहि फिरफिरून वाजवत असत की नाही?...काय? मग त्यांना नव्हतं पचवलं आपण?...मधल्या त्या 'भुकड बिल्डिंग' मध्यें तर—शेजाऱ्यांनी फ्लश ओढला कि आपल्याकडे धोधो पाणी सुटायचं—नि आपली बांधलेली दोरी ओढली किं पाणी वरच्या मजल्यावर जायचं!...आठवतंय्? झालं तर!...त्यापेक्षां ही..."



पण माझ्या त्या त्राग्यानेंहि न चिडतां, सौ. हसत होती; त्यामुळें मात्र माझा पारा उतरला.

पुन्हा तोल सावरून मी मिळतं घेण्याच्या आवाजांत हसून म्हणालों—"बाकी या गोष्टी तुमच्यासारख्या आमच्या पटकन् लक्षांत येत नाहीत, हेंच खरं!...तरी पण असं पहा, बाईसाहेब!—करायचंय् काय आपल्याला त्या पार्टिशनशीं नि शेजाऱ्यांशीं?—आपली जागा चांगली असली,...नि मुख्य म्हणजे त्यांत रहाणारीं आपण माणसं चांगलीं असलों, कीं बस्स!—देणन् नास्ति घेणन् नास्ति!"

सौ. ला माझ्या मुळमुळीत युक्तिवादावरहि हसतांना पाहून, मी तिला डिवचलं—"तूं संभाळ हो मात्र!—बाळाच्या निमित्तानें वर्षभर शाळा बंद आहे तुझी!—उठा-बसायचा बायकी सनातन हक्क गाजवूं लागायचीस एकादे वेळ नव्यानें!—मेंढ्या हांकायच्या कामांतून फुरसद मिळाली असली,...तरी घरीं इतकीं पुस्तकं आहेत, रेडिओ आहे...प्रथमच नव्या बाळानें घरांत पाऊल टाकलंय्...हरकत नाहीं तुझा वेळ छान जायला...!—शेजारीं कोण का बुवा राहीनात 'बाईऽऽ'!!-"

"पुरे पुरे!-माझी नको काळजी बरं!" सौ. किंचित् फणकाऱ्यानें म्हणाली "स्वतःलाच संभाळा मात्र शेजारीबुवांपासून—"

"मी?—माझा काय संबंध त्यांच्याशीं?...मी तर जाणार पुढल्या पंधरवड्यांत आमच्या कंपनीच्या एज्युकेशनल टूरवर...हैद्राबाद-बेळगांव-गोंवे करीत,...चांगला दीड महिना, शाळाशाळांमधून..."

आणि तसं बोलतां बोलतां, आम्ही न कळत सामान लावायलाहि सुरवात केली होती.

★

पण त्यानंतर चारच दिवसांनी घडत गेले, ते सारे प्रसंग!—

सामान लावल्यामुळें जागेला आतां शोभा आली होती; बाळ रात्रीं

१२।१२॥ पर्यंत थोडा रडे; पण म्हणूनच तर सिनेमाच्या त्याच त्याच गाण्यांनीहि आम्हा दोघांची करमणूक होई. पुन्हा नवी जागा...व पहिलं वहिलं नवं बाळ पहाण्यासाठीं आमच्याकडे आमच्या दोस्त मंडळींची ये-जा सारखी होत असे; त्यामुळें आम्हाला आमच्या शेजाऱ्यांच्या अस्तित्वाची दादहि लागली नव्हती अजून...

आमच्या लंडन हेड ऑफिसला आमच्या कंपनीच्या नव्या शालेय पुस्तकांच्या खपाबद्दल व पुढील अपेक्षांबद्दल सविस्तर रिपोर्ट दुसऱ्या दिवशींच्या एअरमेलला लागूं करायचा होता मला; म्हणून त्या दिवशीं मी तें सारं संपवून बऱ्याच उशीरा ऑफिसमधून घरीं परतलों होतों...

सौ. कडे त्या दिवशीं संध्याकाळीं तिच्या हायस्कुलांतल्या कांहीं शिक्षक मैत्रिणी बसायला आल्या होत्या. जेवतां जेवतां त्याच गप्पा गोष्टी ती मला सांगत होती. मैत्रिणींच्या तोंडीं आपलेच उद्गार घालून, ती आपल्या बाळाचं स्वतःच कौतुक करून घेत असल्याचा मात्र मला वारंवार संशय येत होता.

इतक्यांत, एकदम कांहीतरी आठवल्यासारखं करून, ती मोठमोठ्यानें हसत मला सांगूं लागली..."हो बाईऽ!-गंमत काय झाली ?-करकरेबाईंनी रेडिओची स्विच् फिरवली. व्हाल्यूम होता मोठा...रेडिओ एकदम सुरूं झाला, मोठ्या पिचक्या आवाजांत!—त्यांना कांहीं तो बारीक करतां येईना—किं बंद करण्याचं भान होईना—बाहेर जाणार म्हणून मी लावला होता साबू तोंडाला; बाथरूममधून तोंड धुवून मी पुढच्या खोलींत जाईपर्यंत, मधलीं दोन मिनिटं हाऽ एकच एक गोंधळ!...आम्ही सगळ्या खूपच हसलों मग..."

तिच्या त्या बायकी गोंधळाच्या वर्णनावर मी कांहीं बोलणार, तोंच ती आणखी म्हणाली..."आणि हो बाईऽ...त्याच वेळीं कोणी तरुणसेच एक किडकिडित गृहस्थ तुमची चौकशी करत दारांत आले;...मी येईपर्यंत पाठमोरेहि झाले होते. नांव देखील विचारायला विसरलें मी..."

तिच्या त्या एकंदर धांदरट वर्णनावरून, माझ्या ओळखीच्या कोणाचाच चेहरा माझ्यासमोर उभा राहीना.

★



पुस्तक जपून वापरा.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, हॅट चढवून पुन्हा लौकरच मी घाईघाईनें ऑफिसला जायला जिना उतरूं लागलों; अर्धा उतरलों;...तोंच, साधारण पस्तीशीकडचा एक निमगोरा तरुण गृहस्थ वर चढत होता. अंगांत नुसताच सद्रा नि पायांत पायजमा; मला पहातांच तो थबकला; नि म्हणाला–"तुम्हीच का मि. पारखी ?—"

त्या अनपेक्षित प्रश्नानें स्तिमित होऊन मी "हं" म्हणतांच तो पुढें म्हणाला..."ठीक! मी शेजारी तुमचा! सुवर्ण माझं नांव!...काल तुमच्याकडे आलों; तेव्हां फक्त बायकामंडळीच होती; म्हणून परतलों..."

उत्सुकता वाढली; स्वतःच प्रथम ओळख करून घ्यायला आलेला माझा प्रेमळ शेजारी...

"त्याचं असं आहे..." तेवढ्यांत सुवर्ण बोलले..."शेजारी म्हटलं कीं आडपडदा नसावा! एकमेकांना सांगितलं-सवरलं पाहिजे सारं; नाहीं ?"

गंभीर वृत्तीचे नि तत्वज्ञानी वाटले मला, त्यांचे ते उद्गार! मी आपलं अबोलपणें स्मित केलं व त्यांच्याकडे कुतूहलानें पहात राहिलों—

तेवढ्यांत सुवर्ण म्हणाले..."काल मी सांगायला आलों होतों तुम्हाला; हें पहा...आपला रेडिओ जरा हळूं लावा!—अगदीं डोकं उठलं काल आमचं;—पडोशी आहोंत ना आपण!..."

मारा बाप!—मी सर्दच झालों त्यांच्या त्या अनपेक्षित उद्गारांनी...

"कसला हक्क-अधिकार म्हणून नव्हे..." सुवर्णांनी त्याच गंभीर चेहऱ्यानें आपलं मनोगत पूर्ण केलं. "एक आपली विनन्ति बरं कां ही ?—रागावूं नका—गैरसमज नाहींना होणार ?"

"छे छे! राग कसला नि गैरसमज कसला ?" अत्यंत विरस होऊन—पण वर वर हसून–मी म्हणालें...

तथापि, सुवर्णांची ती 'विनन्ति' नि एकंदरींत त्यांची–माझी झालेली ती

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नं. ३४१८

न्यारी 'पहिली सलामी'!...त्यांच्याबद्दलच्या गैरसमजाशिवाय माझ्या मनांत यांमुळें दुसऱ्या कशाला जागाच होत नव्हती !

★

आणि कर्मधर्म-संयोग, योगायोग, काय वाटेल तें म्हणा...गंमत अशी झाली, कीं सुवर्णांबद्दलच हळूं हळूं गप्पा करीत, त्या दिवशीं संध्याकाळीं, आम्ही नुकतेच जेवून उठत आहों...तोंच आमचा 'ओला पोऱ्या' म्हणाला, "शेट, दाराशीं शेजारी बोलावताहेत !—"

माझ्या छातींत पुन्हा धस्स् झालं. सकाळच्या अनुभवानें कपाळाला किंचित् आंठ्या पडत होत्या; तरी दांभिकपणें स्मित करीतच मी पुढें झालों.

दारांत उभे असलेले सुवर्ण मला पहातांच घाईघाईनें म्हणाले.—"या ! जरा इकडे या, माझ्याबरोबर !...दाखवतों तुम्हाला !!—"

आमचे शेजारशेजारचे दोन ब्लॉक व जिना यांच्यामध्यें लंबचौकोनी मोकळी फरसबंद जागा आहे; ती ओलांडून मी त्यांच्यामागून जरा गोंधळल्या मनानेंच गेलों.

ते काय दाखवणार असतील त्याची मात्र कल्पनाच होईना...

आपल्या पलीकडल्या उघड्या दारांतून आपल्यामागून मला आंत नेऊन ते तेथें थांबले; नि रस्ता, आपला ब्लॉक व माझा ब्लॉक यांच्याकडे आलटून पालटून बोट दाखवीत, मला म्हणाले—"हें समक्षच पाहून ठेवा !...तो बघा तुमच्या पॅसेजमधला दिवा...तें आपलं मधलं पार्टिशन...तो माझा पॅसेज...ही मधली खोली...नि तोऽऽतिकडे रस्ता !...पण उजेडाला हो काय ?...त्याला तुमचं माझं असा भेद नाहीं !...तो सरळ रेषेतच चालणार !—या सान्यांतून तुमच्या दिव्याचा उजेड थेट रस्त्यावर जाऊन पडतोय् ! त्या वेड्या ए. आर. पी. च्या लोकाचं जर इकडं लक्ष गेलं, तर तुम्हाला नाही तर मला उगाच दंड ठोठावायचे !—काय ?—आलंऽ नाऽऽ ?—आपलं दाखवून ठेवलं तुम्हाला,—लक्षांत आल्याबरोबर !—रागावूं नका !"



मी गुळमुळीत 'हो हो' म्हणत आहें, तोंपर्यंत ते आपल्या ब्लॉकबाहेर आले.—त्यांच्यामागून मीहि बाहेर पडलों; राग न दाखवतां 'बरं' म्हणून तडख तसाच माझ्या घरांत शिरलों. दार लावलं नि तो पॅसेजमधला बल्ब आधीं काढून घेतला.

शेजाऱ्यांच्या कसल्या भयंकर चुकीचा हो प्रश्न होता, असं नव्हं; पण त्या नव्या प्रसंगाचाहि तसा और निर्णय लागल्यावर, मी आंतलं दारहि बंद करीत सौ.ला म्हणालोंः—"चल, तुझा रेडीओहि उचलून स्वयंपाकखोलींत ठेव प्रथम ! नि आधीं दार लावून घेऊन मगच तो हळूं लावत जा, बरं कां ? भानगड नको पुन्हा; आणि हें बघ...तूंच अधिक शहाणी ठरलीस, बाई ! ... तुझाच संशय खरा होता; आजपासून या पार्टिशनला लागलेला हा आपला पॅसेज... म्हणजे महायुद्धाचा डेंजर झोन, अगदीं नो-मन्स्-लँड !! हें दोघांना जोडणारं सुप्रसिद्ध पार्टिशन, म्हणजे आपली पश्चिम आघाडी !...इथं नेहमी काळोख काळोख पाहिजे !! शत्रूचीं विमानं कधीं घिरट्या घालतील, कांहीं सांगतां येणार नाहीं ! नि हें बघ...या सरहद्द प्रांतांत—स्वतःच्याच सुरक्षितेसाठीं—तूं मला, मी तुला,...किंवा आपण दोघांनीं तिसऱ्या कोणालाहि उद्देशून, एखादा शब्दहि, बोलतां...अगदीं कुजबुजतां देखील—उपयोगी नाहीं !"

सौ. अनेक अर्थांनीं मजकडे पाहून हसूं लागली; आणि तें पाहून माझंहि गांभीर्य फार वेळ टिकलं नाहीं.

—पण त्या आमच्या दोघांच्याहि हसण्यांत, एक प्रकारची खिन्नताच अधिक भरली होती !

★

एकाच दिवशींच्या त्या लागोपाठच्या दोन प्रसंगांनंतर मात्र, आमची दृष्टी, आमची सृष्टीच साफ बदलून गेली !—

पुढल्या दोन तीन दिवसांत, आम्ही निरनिराळ्या तऱ्हेनें, एकमेकांना अर्धवट विनोदानें—पण एकूण पूर्ण असमाधानी वृत्तीनें—कुजबुजतच ताकिदी देत होतों—

"हं महाराज...हळूं बोला ! शेजारी एकादी 'विनन्ति' करतील पटकन् एखाद वेळ !"

"शेजारधर्म–विर्म कळतो कीं नाहीं तुला ?...केवढ्यानें खोकलीस आतां तूं ??"

"ए बाळ्या...कां उगाच भोकांड पसरतोयस्, लेका ?...आमच्या या जगांत शेजारी नांवाची एक भयंकर चीज आहे,...असते, याची तुला दादहि कशी नाहीं अजून ?? जीवन-कलह आहे हा !"

आमचा 'ओला गडी' बाथरूमचं दार लावूनच सावधगिरीनें भांडीं घासे; कपडे फक्त चुबकून धुई !—इतकंच काय...पण रात्रीं फ्रश ओढण्याची पाळी आली, तर शेजाऱ्यांच्या दहशतीनें, तें काम उजाडेपर्यंत ढकलण्याचा ठरावहि–बाळ वगळल्यास–आम्ही तिघांनीं एकमतानें पसार करून टाकला होता.

पण इतकं करूनहि, पुढला सारा आठवडा, आमचं बाहेरचं दार वाजलं रे वाजलं, कीं—'शेजारी नवी विनन्ति करायला आले' या एकाच कल्पनेच्या धक्क्यानें (वरवर सस्मित चेहरा करून) आम्ही दारावर जाऊन धडकत असूं.

मग शेवटीं आमच्या बाळ्यानेंहि, आम्ही वेळीं अवेळीं त्याला केलेल्या सूचना ऐकल्या; शेजाऱ्यांची त्यानेंहि एकंदरींत दहशत घेतली म्हणून म्हणा किंवा त्याची प्रकृति आतां सुधारली म्हणून म्हणा,...त्यानें हळूं हळूं रात्रीं रडायचं साफ सोडून दिलं. शेजारच्या सिनेमाचीं तींच तींच गाणीं आमच्या ब्लॉक-मध्यें घुमत तेवढींच;...दारं बहुतेक बंद करण्याचा, हळूं बोलण्याचा, स्वयंपाक-खोलीतला रेडिओहि हळूंच लावून ऐकण्याचा, असे आम्ही एक एक शिरस्ते विनबोभाट पार पाडल्या–पाळल्यामुळें...आमच्या सुवर्ण–शेजाऱ्यांच्याहि शेजारीं...विशेष कांहीं नवीन न घडतां, आम्ही निश्चितपणें राहूं लागलों होतों.

★

पण मनाचे खेळ मोठे गमतीचे असतात—

अशा प्रकारें शेजाऱ्यांचं प्रत्यक्ष अस्तित्व भासण्याची आम्हाला अलीकडे



पाळी आली नाही, म्हणून (मला वाटतं, मानसशास्त्राला धरूनच) आमचं लक्ष, त्यांच्याकडे अप्रत्यक्षपणें मोठ्या तीव्रतेनें वळत गेलं. निरनिराळ्या निरीक्षणाच्या साहाय्यानें, आम्ही त्यांची माहिती गोळा करूं लागलों.

नवरा, बायको, एक सहासात वर्षांची गोंडस मुलगी, अशी एकूण तीनच माणसं होतीं त्यांच्या घरांत.

स्वतः श्री. सुवर्ण—म्हणजे किरकोळ शरीरयष्टीचे, निमगोरे, टापटीपीचे, तरतरीत चेहऱ्याचे, पत्नीशी आंतबाहेरचे दिसणारे, दाभणकाठी मिशीवाले, असे तरुण गृहस्थ होते. दोघांच्या ब्लॉकच्या पॅसेजचे मुख्य दरवाजे शेजारीं शेजारीं; तेव्हां कधीं शेजारची कडी उघडतां–बंद करतांना वाजली, तरी पार्टिशनमुळें फसून आम्ही पुढें होत असूं. त्या दार वाजण्याच्या नियमित-पणामुळेंच तर आम्हाला समजलं, कीं श्री. सुवर्ण सकाळीं साडेनऊ दहाच्या-सुमारास ऑफिसमध्यें जाऊन संध्याकाळीं साडेपांच सहाला घरीं परततात.

दुपारीं त्या घरांत अगदीं शांत असायचं !—

पण—"कधीं सौ. सुवर्ण आपल्या छोट्या कन्येसह दुपारीं बाहेर जाऊन दोन अडीच तासांनी परततात;...कधीं शेजारपाजारच्या बायका त्यांच्याकडे बसायला येतात; मग रव्याचा खरपूस तुपट वास...चहाच्या कपबशांची कडकड; ...पण त्यावेळीं त्यांचा स्वतःचा आवाज सर्वांत हळूं नि अस्पष्ट असायचा !—त्या दिसायला अठ्ठावीशीच्या, टापटीपीच्या,...एकंदरीत जुन्या चाली-चळणाच्या—" अशी माझ्या सौ. नें थोड्याच दिवसांत थोडक्यांत माहिती गोळा केली.

राहिली ती छोटी कु. नीला सुवर्ण...

इतर मुलांमुलींत ती उगीच भटकत फिरत नाहीं; घरींच बुडकुल्या-भांड्यांचा आवाज येतो;...कधी गोड आवाजांत शेजारच्या सिनेमांतून उचलून घोकलेलीं गाणीं गुणगुणते; ...कधीं..."आईऽ, खाली रस्त्याजवळ मी ट्राम-बस बघत उभी रहाते गऽ !" असे म्हणून धावत सुटते." इ. माहिती, सौ. नेंच पण बाळाच्या वतीनें गोळा केली. (खरं म्हणजे, आपल्या इतक्या जवळ

राहूनहि, आपल्या 'गोड बाळा'चं कौतुक करायला...त्याला घ्यायला, ती पोर एकदांहि आपल्याकडे फिरकली नाही, यावद्दलच माझ्या घरांतील 'मुलींच्या मास्तरणी'ला वैषम्य वाटत होतं असावं.)

★

श्रीयुत मला रस्त्यांत भेटत; पण त्यांच्या गालावर कधीं खळी पडत नसे. त्यांचे डोळे समोरच्या माणसाकडे एकदां वळून खालीं पाहूं लागत. त्यांच्याकडे फारसं कोणी येत-जातांनाहि दिसत नसे.

आमच्या मानानें शेजारशेजारच्या दोघा 'सौ.' ना मात्र एकमकींचा सहवास अधिक लाभे.

गृहकृत्यें, रेडिओ, बाळाचे बोबडे बोल, शिवणटिपण,...सारे कार्यक्रम करूनहि, माझी सौ. बराच वेळ मोकळी राही. शेजार-पाजारची जात्या नावड; त्यांत इथं तर तिनें दहशतच घेतलेली. आणि आमचा ब्लॉक पडला पूर्वेला-म्हणजे रस्त्यापासून लांब! आमच्या दोघांच्या ब्लॉकला काटकोन करणाऱ्या रस्त्याकडील गॅलरींत उभं राहून, कधीं कधीं माझी सौ. खालीं बागेकडे किंवा लांब रस्त्याकडे पाही.

अशा वेळीं, क्वचित् सौ. सुवर्ण आपल्या गॅलरींत उभी असलेली किंवा खालच्या बागेंत कोणा शेजारणीशीं बोलत बसलेली तिला दिसे. तेव्हां त्या दोघींची दृष्टिभेट झाली कीं-(ही एकटीच उभी असल्यामुळें) त्या बा । आपल्याविषयींच चांभारचौकशा करीत असल्यासारखा हिला भास होई.

तथापि असले उडते चुटपुटे अनुभव जमेस धरुनहि आम्ही उभयतांनीं पुढील पंधरवड्यांत आमच्या शेजाऱ्यांबद्दल एक बिनधोक धोरणी कयास केला—"एकंदरींत शेजारी आहेत जरा अहंमन्य नि तऱ्हेवाइक! पण दुसऱ्याच्या आध्यामध्यांत तरी नाहीत; तेव्हां अगदीं प्रत्यक्ष उपद्रवी शेजार असण्यापेक्षां ही तिऱ्हाईतपणाच्या वातावरणाची नि अनोळखीपणामुळें नांदणारी निरुपद्रवी शांतताच आपल्याला पत्करली!"

★



आणि माणसं पारखण्याचा आमचा हा दृष्टिकोन असा ठरल्यामुळें एकंदरींत पहातां-पुढले कांही दिवस आमच्या पश्चीम आघाडीवर अगदीं सामसूम होतं.

पण मग एके दिवशीं सकाळीं चारपासून सरहद्दीपलीकडे एकाएकी भयंकर हालचाल, आवाज, बोलणीं ऐकूं आलीं. अर्धवट झोंपेंत असल्यामुळें प्रथम आम्हाला वाटलं-"पुन्हा लढाई पुकारली वाटतं शेजाऱ्यांनीं?"

पण नीट कानोसा घेतल्यावर लक्षांत आलं-स्नान,...बांधाबांध, झांकझांक करून, सुवर्णमंडळी बोटीच्या प्रवासानें बाहेरगांवीं निघालीं होतीं.

मग पुढले दोन दिवस शेजारच्या दाराला मोठंथोरलं कुलूप होतं.—पण तिसऱ्या दिवशीं मात्र पार्टिशनच्या दुध्याकांचेच्या आमच्या मॅजिनोलाईनपली-कडे सर्चलाइटसारखे प्रकाशझोत झळकले.—थोड्या कानोशानें समजलं, श्री. सुवर्ण एकटेच परतले आहेत.

मग आमच्या ओळखीच्या एका प्रेमी जोडीच्या रजिस्टर्ड लग्नाचा पुढाकार आमच्याकडे आला; त्यामुळें पुढले चार सहा दिवस आम्ही नाशकास व आमच्या दाराला टाळं...

पण आमच्या त्या गैरहजेरींतहि एक प्रसंग—'इन्सीडेन्ट'—घडला. आमच्या एका गिरगांवकर मित्रानेंच आमच्याकडे त्याबाबत तक्रार केली.

त्यानें आमच्या टाळ्यावर चारदोनदां धक्के खाल्ले होते; माहितीसाठीं शेजाऱ्यांचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला होता. प्रत्येक वेळीं सुवर्णांच्या कपाळावर आंठ्या व कानावर हात असायचे—

शेवटच्या वेळीं दार ठोठावून शेजाऱ्यांकडे माझ्यासाठीं एक चिठी देण्याचा त्यानें प्रयत्न केला होता. त्याला दमांत घेऊन सुवर्णांनी दार उघड-ल्यावर, त्याच्या चिठीबाबतच्या विनंतीला उत्तर दिलं होतं—"तोंड उघडलेली एवढी मोठी टपालाची पेटी त्यांच्या दारांत लटकतेय्!—ती दिसत नसून देखील तिचं निर्जीव बिनटोक काम माझ्याकडे कां सोंपवतांहा तुम्ही?"

आमच्या मित्रानें सुवर्णाविरुद्ध तक्रार केली ती या त्यांच्या कुरॆवाज वागणूकीचीच !—

★

आणि त्यामुळेंच पुन्हा आमचं लक्ष सुवर्णाकडे वेधलं. पुढल्या चार दिवसांत दिसलं, शेजारचें वातावरण बरंच बदललं आहे.— घरांत सुवर्ण एकटे... नि आमच्या गैरहजेरींत त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाला बरेच फांटेहि फुटलेले !—

श्री. सुवर्ण संध्याकाळीं नेहमीच्या वेळेवर पांच मिनिटंच चमकून गुप्त होत; क्वचीत् येतहि नसत. मग रात्रीं नऊ साडेनऊला कुलपा-दाराचा बराच खडखडाट होई. ते आंत शिरत... नि प्रथम दारला आंतून कुलूप लावीत.

त्यानंतर त्यांच्या दोन्ही खोल्या, पॅसेज, सगळीकडे पट्पट् दिवे लागत; स्टोव्हचं जोरजोराचं 'पंपींग' नि 'फर्रर्र्' सुरु होई. त्या पार्श्व संगीतांत त्यांची हालचाल, नि दहापांच दहापांच मिनिटांनी पॅसेजचा साठ-कॅंडलचा दिवा पेटे-विझे. बाथरूम मधला दिवा-नळ हलचाल करीत सुवर्णाच्या खाकरण्या-खोकरण्याचा ध्वनि उमटे. आमच्या सरहद्दीपलीकडे त्यांच्या येरझाराहि चालू रहात.

मग साडेदहा अकराच्या सुमारास, अगदीं ठरल्याप्रमाणें, त्यांच्या बसायच्या खोलींतून एका बाटलीला ग्लास आपटण्याचे परिचित आवाज मधून मधून ऐकूं येत. मध्येंच स्वारी एखाद्यावेळीं बेफिकीर शीळेमध्यें कसलंतरी गाणं गुणगुणे. स्टोव्ह 'सूऽऽऽ' आवाज करीत बंद होई. मग पॅसेजमध्यं 'कटकन्' दिवा,...न्हाणी घरांत उजेड,...नळाखालीं बालदी भरत असण्याचा आवाज,...गरम पाणी अंगावर घेतल्याचा 'हाऽहाऽ' व तांब्या पाण्यांत बुडण्याचा 'बुड्बुक्' असे अनेक आवाज !...असं सारखं अर्धा तास चाले.

पुन्हा स्टोव्ह पेटे—कपबशीचा आवाज होई. मग मात्र दुसरे कसले आवाज न होतां, एक आंतला दिवा-तेवढाच पेटत राही. तो जवळ जवळ दीड दोन पर्यंत.. किंवा कधीं कधी रात्रभर देखील !—



या त्यांच्या कार्यक्रमांबाबत जसजशा जास्त कल्पना लढवाव्यात तसतसे आम्ही अधिकच बुचकळयांत पडत असूं...

★

पंधरावीस दिवस माझी दूर करून मी मध्यें चार दिवसांसाठीं घरीं परतलों;...सुवर्णाचं तें 'गुढगुंजन' तसंच अव्याहत चालूं होतं. त्यांत आणखी भरच पडली असल्याचं कळलं-दिसलं.

बहुतेक एखाद दिवस आड, रात्रीं दहा साडेदहाच्या सुमारास, नेहमी-प्रमाणें आंतून कुलूप घातलेल्या त्यांच्या दाराची बाहेरची कडी वाजूं लागे; आणि मग पुढीलप्रमाणें मोठमोठ्यानें प्रश्नोत्तरं सुरूं होत—

"कोण रे हा सोकाजीराव ?—कोण आहे ?"

"मीऽतो !—उघड दार !...उघड दाऽऽर !..."

"मी ?—मी कोण ?—नुसतं 'मी' नाही चालणार !!...नांव घ्या..."

"अरे गाढवा–मी तो—तेरदाळकर? - "

"हं...मग असं बोल की, लेका !—स्वतःचंहि नांव घ्यायला बायको-सारखा लाजतोस ?"

त्यानंतर चांगल्या मिनिटभराच्या शांततेनंतर कुलूप आंतून उघडलं जाई; तेरदाळकर आंत शिरत नि पुन्हां आंतून कुलूप पूर्ववत् लागे.

मग आमच्या बाजूस पॅसेजकडे उघडणारीं दारं बंद होत. झरोक्यातून तेवढा उजेड दिसे. अशा दिवशीं 'सुवर्ण-स्नान' क्वचित् टळे देखील !—

शेवटीं, एकाच्या सुमारास पुन्हा गडबड होई; तेरदाळकर नि सुवर्ण बोलत बोलत आंतलं कुलुप काढून बाहेरून लावीत व स्वतः बाहेर पडत... —ते अगदीं तीन तीन वाजेपर्यंत परतत नसत !—

त्यांमध्येंहि ती दुक्कल क्वचित् चवपालट करी; नाटक्या तेरदाळकर त्यानंतरहि मोठमोठ्यानें गाऊं लागे;...पार्टिशनवर हळूहळूं ताल धरी;...त्याला

दवकावीत आमचे पडोशी कुजबुजत—"हं लेका...संभाळ; शेजार पदवीधर जोडप्याचा आहे!...वेळीं अवेळीं नि उलटा सुलटा राग गाऊं नको..."

पण तरी तेरदाळकराची आसावरी मध्यरात्रींच रंगांत येऊं लागे! आणि त्याला दवकावतां दवकावतां शेवटीं, स्वतःलाच स्फूर्तीचा झटका येऊन त्याचा सुवर्ण–मित्रहि आसावरीची री ओढूं लागे!—

या कालखंडांतील या कार्यक्रमांच्या कचाट्यांतूनहि, आम्ही आमच्या कायम केलेल्या तडजोडीच्या अबोल धोरणामुळेंच केवळ, जीवंत राहूं शकलों.

★

सारा दौरा संपवून मी शेवटीं परतलों पण; त्याचवेळीं आपली आई आजारी आहे म्हणून माझी सौ. पंधरवड्याच्या बायद्यानें एकाएकी माहेरी निघाली. कां कोणास ठाऊक, निघतांना अगदीं 'एकच प्याल्यां'तल्या सिंधूप्रमाणें तिनें डोळ्यांत आसू आणले. "जीवाला संभाळा हं नीट!" ती कातर आवाजांत मला सांगूं लागली.

चेष्टा करण्यासाठीं मीहि सुधाकराच्याच थाटांत म्हटलं–"फुकट तुमच्या पदव्या!.. बायका रे बायका! 'असे पति देवचि ललनांना!'... असं करं नाही तर!...एखाद्या शाळेच्या बोर्डिंगांतच ठेव मला नेऊन, जाण्यापूर्वी!"

तरी पण गंभीरपणेंच ती म्हणाली..."चेष्टा पुरे बरं का?—मला सांगायचंय् इतकंच...कीं, शेजार तेवढा संभाळा!...नाही तर निघायची एखाद वेळ नव्यानें जुनी कसली तरी ओळख!..."

ताडकन् माझ्या डोक्यांत प्रकाश पडला!—साहजीक होतं तें!—तो दर रात्रीचा बाटल्यांचा आवाज, तें तेरदाळकराचं आडवं निवडं गाणं, तें त्या दुकलीचं रात्री बेरात्रीचं भटकणं...सारे अनुभव साठवून आठवून, जातांना तिच्यापुढें ब्रह्मांड उभं राहिलं असावं.

तेव्हां हसत हसत मी तिची समजूत केली—"वेडी आहेस! अडीच महिने होऊनहि ओळख नाहीं; आतां काय या पंधरा दिवसांत होणार ती?"

★



बायको माहेरी गेलेली; ऑफिसमध्यें आतां बिनकामाचे दिवस आलेले; उगीच कोणाकडे गप्पा छाटत बसण्याची नावड;...माझा सुरवातीस तर मोठा कोंडमाराच झाला. पण शेवटीं...घरच्या रेडिओच्या साहाय्यानें मी दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्यांत उडी टाकली;...घरीं लौकर परतायचं...दोन्ही दारं बंद करायचीं नि मग लंडन, बर्लिन, रोम, मॉस्को...करीत तासातासानें फिरत शेवटीं रात्रीं पाऊणला अंकाऱ्याला जाऊन, त्या तटस्थ देशाच्या बातम्या ऐकल्या की मगच झोंपायचं!...असा जवळ जवळ माझा रोजचा कार्यक्रमच ठरून गेला होता.

पण बिछान्यावर पडल्यापडल्याहि कधीं कधीं तेरदाळकरांच्या गाण्याचे स्वर माझ्या कानीं पडत; कड्या कुलपं वाजत; स्टोव्ह फर्फरे...नि सर्व कांहीं...

माझा त्याबाबतचा दृष्टीकोण मात्र ठरला होता; मी स्वतः तरी अजूनहि तटस्थच होतों!—

★

त्यानंतर एके दिवशीं आणखीहि एक घटना झाली. रविवार होता; संध्याकाळीं फिरायला बाहेर पडत होतों;...कर्मधर्मसंयोग असा कीं...त्याच वेळीं सुवर्ण आपल्या खोलीचं कुलूप काढत होते. आणि दुसरं आश्चर्य म्हणजे ते एकटे नव्हते;—पण बरोबर तेरदाळकरहि नव्हते...मागें उभी होती—एक अठराएकोणीस वर्षांची फटाकडी तरुणी!—गोल पातळ; लांब दोन वेण्या–एक छातीवर, एक पाठीवर; पावडर–स्नो सारं कांहीं जिथल्या तिथें; नि किंचित् नखरेल मोहकपणाहि होता तिच्या चालण्याच्या ढबींत, चेहऱ्या-मोहऱ्यांत...

दोघेहि माझ्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखं करून आपसांतहि कांहीं न बोलतांच–दार उघडून आंत शिरलीं. मग आंतली कडी लागली; तोंपर्यंत मी अर्धा जिना उतरूनहि गेलों होतों.

कां कोण जाणे, त्या प्रसंगामुळें माझ्या मनाला कसंसच–चुकल्यासारखं

वाटलं-एकदम !...सुवर्णाविषयींच्या माझ्या आधींच गोंधळलेल्या मनांत आणखी अनेक नवे-जुने, बरे-वाईट विचारहि डोकावून गेले.

पण त्या साऱ्यांना गायबंद घालून मी रस्त्यावरच्या जमावांत निमूटपणें सामील होतां होतां स्वतःला बजावलं—"बस्स...तुला रे का नाही त्या उठाठेवी ?...ज्याचं त्याच्याकडे !--"

★

संध्याकाळीं फिरून आल्यावर सवयींमुळें पहिली आठवण झाली बर्लिनची ! त्या रात्रीं साडेआठला हिटलरचं भाषण होतं;...स्विच् फिरवून मी आरामखुर्चीवर पसरलों; हिटलरच्या जर्मन आरडाओरडीला आधींच सुरवात झाली होती. प्रत्येक वाक्याचा शेवट कडकडाटाच्या यमकानें...

कांहीं कळत नसलं, तरी प्रत्यक्ष हिटलरला आपण ऐकतों आहों याच एका समाधानांत, 'डिक्टेटर चार्ली चापलीन'लाहि डोळ्यापुढें उभा करून, जिवाची अशी करमणूक करीत कांहीं मिनिटं घालवलीं असतील, नसतील तोंच रेडिओतून खाडकन् मोठा आवाज आला ! खोलींत एकदम सामसूम झाली; —क्षणभर वाटलं, 'तिकडे जर्मनींत हिटलरच्या पायाशींच बॉम्ब स्फोट झाला नाहीं ना ?'

पण मुई सगळीकडे नाचवूनहि साऱ्या जगांतच स्मशान शांतता पसरली होती ! जणूं हिटलरच्याच जर्मन आरडाओरडीनें माझ्या रेडिओचेच फक्त बारा वाजले होते. बघतांबघतां रेडिओतून धूरहि येऊं लागला; तेव्हां शेवटीं दचकून भानावर येऊन मी स्विच बंद केला.

क्षणापूर्वीच साऱ्या जगाशीं असलेला माझा संबंध असा एकदम साफ तुटल्यामुळें, मला माझ्या निर्जन भकास घराची एकदम तीव्र जाणीव झाली नि माझा अतिशय विरसहि झाला.

व्हाल्व्ह-स्क्रू चाचपून, काढून-घालून नि आंतल्या काऱ्याकोपऱ्यांत उगीचच फुंकरी मारून, रेडिओ 'नीट करण्याच्या'-(कोणत्याहि सुशिक्षिताला



शोभून दिसणाऱ्या) अनेक अनभिज्ञ माकडचेष्टा करून देखील, पुन्हा स्विच फिरवल्यावर जेव्हां धूर आला, तेव्हां मात्र मी हताश झालों—नि केवळ नाइलाज म्हणून दहा साडेदहालाच बिछान्यावर अंग टाकलं.

★

गादीवर पडल्या पडल्या माझं निरुद्योगी मन नाइलाज म्हणून जवळ-पास भटकूं लागलं—

केवळ सहानुभूतीमुळेंच प्रथम मला जाणीव झाली.—'आपला पडोशीहि बिचारा आपल्यासारखाच एकटा आहे सध्यां;...हाल होत असतील त्याचे;... कंटाळवाणा वेळ जात असेल त्याचा...'

पण मग मनानें लागलीच उलटहि खाल्ली—बाटली-ग्लासाचे आवाज, तेरदाळकरचं गायन,...सारे आवाज कानावर एकदम येत असल्याचा भास झाला मला !

आणि त्यांतच मी विजेचा धक्का बसावा तसा दचकलों; माझ्या डोळ्या-पुढल्या काजळ्यांत ती शेजाऱ्यामागची त्या संध्याकाळीं पाहिलेली फटाकडी तरुणीच एकदम चमकली...

काय आश्चर्य ?...तेवढ्यांतच सर्व शांत झालेल्या त्या वातावरणांत मला पार्टिशनपलीकडल्या काळोखातून गाण्याचे गोड जनानी स्वरहि ऐकूं येऊं लागले. प्रथम वाटलं रेडिओ; पण नाही, कोणी प्रत्यक्षच गाणं म्हणत होतं सुवर्णाकडे...

गाणं होतं कसलं तरी राधाकृष्णाचंच, हिंदी; पण चाल मात्र फार धांवती, मोहक नि नखरेल होती. त्या तरुण गोड आवाजांत खूप मादकताहि भरली होती. तेवढ्यांत गाणं थांबलं; मी कुतूहलानें कान टवकारले—क्षणभर सारं शांत होतं. तोंच सुवर्णाचा आवाज आला; नि पुढला संवादहि माझ्या कानावर आदळला. "म्हण कीं ग आणखी एक, माधुरी !..."

"नको बाबुराव !...पुरे...साथ नाही कांही नाही !—नि पुन्हा सकाळीं

जायचंय् न् ?" "हॅत् तिच्या ! अग मग परवां जा हवं तर !...घाई का इतकी जाण्याची ?...काय ?—हें बघ, उद्या जाऊं आपण दोघं सिनेमाला;...मी दांडी मारीन ऑफिसला हवी तर...मग तर झालं ?...हं चल्, म्हण बघूं !!"

दोघांच्या सूक्ष्म हास्याचे नि त्या मागोमाग नव्या गाण्याचे स्वर ऐकूं आले—मी नकळत चमकलों...सुवर्णाबद्दल आधींच अभ्राच्छादित झालेल्या माझ्या मनाला तो नवा संशय आणखी दृढ करून घेण्याची छाती होईना.

भीरू हृदयानें शेवटीं कौल दिला—"भल्या माणसा ! नाही त्या भानगडींत तुझं नाक खुपसूं नकोस !...दारं लावून तुझी सुटी आधीं निराळी कर बघूं..."

★

पांच सात दिवसांनंतरची गोष्ट—ऑफिसमधून घरीं येऊन मी माझं दार उघडलं; तोंच शेजाऱ्यांच्या बाजूनें हिंग-मोहरीच्या फोडणीचा खमंग वास आला ! बाहेरचं कदान्न खाऊनखाऊन कंटाळलेला माझा जीव !... तोंडाला चटकन् पाणी सुटलं. हॅट-कोट उतरवून ठेवतां ठेवतां खोबरं खवणल्याचा नि वांगड्यांचा खळखळ आवाज कानावर आला—पिकल्या आंबे-फणसांचा घमघमाटहि नाकांत शिरला...

आणि तेवढ्यांत शेजाऱ्यांच्या छोट्या कुमारीचा परिचित मंजुळ बालिश स्वरहि आला—"आईयू...मी रस्त्याजवळ जातें ग..."

मी समजलों;...शेजारच्या ब्लॉकला पुन्हां मंगल घराचं स्वरूप आलं आहे !

आणि त्या जाणीवेनेंहि किती आनंद झाला माझ्या एकाकी जीवाला ?...

मला चटकन् वाटलं...'आतां तरी सुवर्णाकडे बाटल्या वाजणार नाहींत; तेरदाळकर नाटकी गाणीं आडवीतिडवीं गाणार नाहीं, सुवर्णाची रात्रीं बेरात्रीची भवंति होणार नाहीं...आणि...आणि...'

वास्तविक, माझा त्यांत व्यक्तिगत असा फायदा-तोटा कसलाच नव्हता; तरी पण जीवाला मात्र हायसं वाटलं; मनाला मनस्वी आनंद झाला !



आणि माझा कयास बरोबर होता !...त्या रात्रीं सुवर्णाचे दिवे अगदीं लौकर गेले;...पार्टिशनच्या पलीकडे काळोख होता ! तरी...तिथं संसारी गृहाचं सोज्वळ तेज झळकत असल्याचीच माझ्या मनाला संवेदना होत होती !

माझ्या एकलकोंड्या घरांतच आरामखुर्चीवर पडल्या पडल्या, मी अस्वस्थ मनानें शेजारच्या त्या मानवी घरकुलाकडे, काळोखांतच अनिमिष नेत्रांनी पहात होतों;...त्या काळोखांतून निःशब्द स्वर्गीय सुरेल स्वरच पोहोत येऊन माझ्या कानाशीं कुजबुजत आहेत, असं मला वाटत होतं.

दुसऱ्याच्या निर्लेप सुखानेंहि माणसाला अनेकदां अतिशय सुख होत असंतच कीं ?...तसंच माझंहि झालं त्या दिवशीं !

★

सकाळीं मी असाच माझ्या बाथरूमजवळ घुटमळत होतों; तोंच पार्टिशनपलीकडून माझ्या कानावर चिमुरड्या सुवर्णचे गुणगुणते स्वर आले; ती घोळून आळवून म्हणत होती...'मेरे जनावीने जुलम किया !... हा ऽ हा ऽऽ जुल्म...'

तिची आई तिला आंघोळ घालीत होती, मला वाटतं; तेवढ्यांत, त्या पोरीनें आईला गोड बालिश आग्रह सुरू केला—"आईयू-म्हण...तूं म्हण ना ग हें गाणं !—"

"चल् वेडी कुठली !—हं थांब...साबू जाईल डोळ्यांत !...नीले-आम्ही नाही हो असली गाणीं म्हणायचीं !...तुम्ही पोरी म्हणा पाहिजे तर..." आई हसत उत्तरली...

किती गंमत वाटली मला तो छोटासा संवाद ऐकून !...कुलीन स्त्री,... संसार,...मातृहृदय,... !...जगांतलं दिव्य, गोड, सात्विक, . सारं चांगलं चांगलं तेवढं...त्या पार्टिशनपलीकडल्या वातावरणांत तरंगत असल्याचा भास झाला माझ्या मनाला !...

केवळ विरोध म्हणून चारच दिवसांपूर्वीच्या सुवर्णाच्या जागेची नि

तिथल्या साऱ्या प्रकारांची मला एकदम आठवण झाली; नि मग मला वाटलं—"कांहीं कां असेना...सुवर्ण कसा का असेना—तिथं आज तरी बावनकशी सोन्याचं तेजच झळकत आहे!—"

★

त्याच दिवशीं संध्याकाळचा प्रसंग—कु० सुवर्णाची कोणी छोटी मैत्रीण तिच्याकडे रहायला आली होती वाटतं; कॅरमचा खेळ चालला होता; त्या पोरांत आमचे पडोशीहि सामील झाले होते. चकत्यांचा व स्ट्रायकरचा 'खटर्खट्' असा मिश्र आवाज सारखा येत होता. त्या खेळांतील हार-जितेवरून त्यांची एकमेकांना चिडवाचिडवीहि चालली होती.

मधून मधून सुवर्णबालिका आपल्या आईला उद्देशून ओरडत होती—"आईगऽ!... झालं तुझं काम? खेळायला येणार ना आमच्याबरोबर?"

शेवटीं खेळतां खेळतां सुवर्णांचीहि मध्येंच घोषणा ऐकूं आली..."झाली ना ग झांकपाक?—मग उभी का राहिली आहेस तिथें नुसती?—बस ना अशी...ती म्हणतेय् तर लाग खेळायला; ...तूं नि मी भिडूं होऊं या: होऊं दे कीं तिच्या मनासारखं?—"

"इश्श ऽऽ! आम्हाला नको बाई तो खेळ?---" सौ. सुवर्णांची सहास्य कुजबुज ऐकूं आली....

"झालं?—बोललीस? 'इश्श' काय आहे त्यांत?...अग, 'टिचकी मारून जावं,...नांव सांगून जावं'...असा कायसा खेळ असे ना आपल्या लहानपणीं...!...तोच हा!...पद्धत जरा नवी; एवढंच..."

श्री. सुवर्णांच्या या भाष्यानंतर, मला वाटतं, हसत हसतच सौ. सुवर्णाहि खेळायला बसल्या; कारण चकत्यांवरोबर बांगड्यांची खळखळ नि "ओऽऽ... गेला आईचा डाव!" अशी पोरींची ओरड सारखी ऐकूं येऊं लागली.

★

किती गोड घरगुती प्रसंग होता तो—इकडच्या बाजूला एकटेंच



काळोखांत बसल्या बसल्या माझ्या मनःचक्षूंसमोर त्या ध्वनींबरोबरच, साऱ्या तपशीलांसह, तें पार्टिशनपलीकडचं हलतं चित्रहि उभं रहात होतं.

त्यांत श्री. सुवर्णांचा खेळाडू गमत्या स्वभाव डोकावत असला तरी मला पुन्हा एकदां चमकल्यासारखंच झालं. मागले सारे प्रसंग नि सारे अनुभव इंगळ्यांप्रमाणें मला एकदम डसले. सुवर्णांना असल्या गोड संसारचित्रांचा मध्यबिंदू कल्पिण्यास माझं मन कांहीं केल्या सहजासहजीं तयार होईना. उलट वाटलं—"किती दांभिक आहे पहा बेटा?...बिचारी साध्वी...तिच्या गैर-हजेरींत मधले दीडदोन महिने...अगदीं चार दिवसांपूर्वीपर्यंत...हा प्राणी इकडे कसकसे गुण उधळीत होता, हें कोण सांगणार आतां तिला?—"

माझा सुवर्णांबद्दलचा प्रतिकूल ग्रह, राग, तिटकारा कमी झाला नसला, तरी त्यांच्या घरांत प्रत्यक्ष दिसणारं संसारी सुख मात्र माझ्या मनाला आनंदवीत होतं. आणि म्हणूनच कीं काय कोणास ठाऊक, त्या दिवसानंतर माझं मन पूर्वी कधीं नव्हतं इतक्या उत्सुकतेनें नि गुणग्राहकतेनें सुवर्णमंडळींकडे वळूं लागलं होतं...

★

एकटेपणा, घरीं रेडिओ नसणं, दुसरीहि कसली करमणूक नसणं नि हा नव्या अनुकूल ग्रहाचा अंकुर, यांचा नवा परिणाम शेवटीं असा झाला, कीं मी अधिकाधिक कुतूहलपूर्ण चिकित्सेनें सुवर्णांघरच्या हालचालींकडे पाहूं लागलों.

आणि मग हळूं हळूं मला आढळलं...त्यांच्याकडेहि रेडिओ आहे; कधीं कधीं भैरवी आसावरीचे मंजुळ स्वर कानावर येतात. गंगूबाई, आझमबाई, हिराबाई, बडेगुवा, घांग्रेकर, वगैरे निवडक मंडळींनाच सुवर्णांच्या रेडिओवर मुक्तकंठानें गायला मोकळीक होती. तंतुवाद्यांच्या कार्यक्रमांवेळीं तर क्वचित् त्यांचा रेडिओ मोठाहि होई. उलट कधीं बेसुर वाद्य किंवा गाणं वाजलं किं तत्काळ चालूं असेल तिथंच रेडिओ खाडकन् बंद होई. बातम्यांची जाळी-कोळिष्टकं त्यांच्या रेडिओवर लागल्याचं माझ्या कधींच ऐकिवांत येईना!

एकदोनदां दिवसाच्या निरनिराळ्या वेळीं सतार, सनई, दिलरुबा, फिडल, विचित्रवीन यांचे लागोपाठ कार्यक्रम ऐकून मात्र मी बुचकळ्यांत पडलों; कोणत्या स्टेशनावर असं घडतं तें माझ्या ध्यानीं येईना; साश्चर्य कुतूहल वाढलं म्हणून मी तें जाणण्याच्या मागेंच लागलों; शेवटीं—कित्येक आठवडे स्वतःचा रेडीओ नीट होत असूनहि—मी तसाच बाहेर पडलों; साडेचार आणे टाकून वेड्यासारखा 'लिसनर' विकत घेतला. —आणि स्मरणाप्रमाणें मागचीं पानं चाळून अखेर तलास लावला, कीं—आपण पूर्वी जसे (वातम्यांचा जाळ्यांत हातपाय झाडीत...रोम, बर्लिन–अंकारा करीत) रोज जगप्रवास करत असूं, तसंच सुवर्णराजश्री (कलकत्ता–लखनौ–दिल्ली–लाहोर-पेशावर करीत) सारा हिंदुस्थान पादाक्रांत करतात व विविध संगीताच्या मेजवान्या झोडतात.—

त्यांच्याकडे ग्रामोफोनहि होता; त्यावर अनेक गोड रेकॉर्डि लागत; पण त्यावेळीं अगदीं कमी आवाज देणाऱ्या बारीक सुया ते वापरत.

असल्या दृष्टीक्षेपांत येणाऱ्या प्रत्येक लहानसान बाबींत मला सुवर्णांची निवड, योजकता नि निरुपद्रवी रसिकवृत्तीच दिसूं लागली. वाटूं लागलं–कसा विधायक क्रम ठेऊन हौस करणारा एक रंगेल नि सदभिरुचीचा मनुष्य आहे हा !

हळूहळूं माझं असं अनुकूल मत होत जात होतं खरं; पण ते पूर्वग्रह मात्र अजूनही पूर्वस्थान सोडायला तयार नव्हते !

★

तसं पाहिलं तर माझ्या या हृदयपालटला विशेष वाव मिळाला होता तो माझ्या एकाकी वास्तव्यामुळें; कारण, नाही तर एवढ्या भानगडी झाल्या असत्या कशाला माझ्याकडून ?...पण मग, तसं दुसऱ्याचं संसार–सुख आणखी पुढंहि अनंतकाळपर्यंत त्रयस्थ दृष्टीनें पहातच, मला माझ्या उर्वरित आयुष्याची गुजराण करायची नव्हती.

पंधरवड्यासाटीं माहेरीं गेलेली माझी सौ. सव्वा महिना झाला तरी तिथेंच, स्वतःचा संसार असा सुना टाकून आईचा संसार पहात तिनें इतका वेळ



रहाणं मला कसं पटणार ? जातांना आमच्या शेजाराची दहशत घेऊन सिंधू-सारखी मुळूमुळू रडणारी माझी सौ. ! अजूनहि मला तसं एकटं टाकून अशी दूर राहूं तरी कशी शकली ? मला समजेच ना !—

शेवटीं, मी एके दिवशीं रागानेंच रिप्लायपेड तार केली,... "तूं कधीं तरी परत येणार आहेस कीं नाही तें तरी कळव !"...तिनेंहि उत्तर पाठवलं— "परवां संध्याकाळीं तिकडे पोहोंचलें तर फार उशीर नाही ना होणार ?"

काय तो माझा आनंद ! माझ्या घराला घरपणा यायला मध्यें फक्त एकच दिवस होता.

★

रविवारीं संध्याकाळीं ती मुंबईस पोहोंचणार !...पण दुपारपासूनच मी घरांतल्याघरांत येरझारा घालूं लागलों;...शेवटीं कंटाळलों;—नि पूर्वी सौ. उभी राही त्या आमच्या मधल्या गॅलरींत उभा राहून रस्त्याकडे पाहूं लागलों—

सहज जरा तिरकी मान व अधिक तिरकी नजर करतांच, शेजाऱ्यांच्या बाल्कनींत मला सुवर्ण-संसाराचा छोटा त्रिकोण संपूर्णपणें दिसला. ते तिघे जीव एकत्र उभे राहून कांहीं तरी हसतबोलत होते. मुद्दामच पाहिल्या न पाहिल्या-सारखं करून मी पुन्हा रस्त्यावर बेफिकीर नजर फिरवली.

इतक्यांत;...मी उभा असलेल्या गॅलरींतला सुवर्णांचा दरवाजा खाडकन् उघडला;—मी दचकलों—

पण स्वतः सुवर्णच दारांत उभे राहून उद्गारले—"या ना ?...या !"

त्यांच्या त्या सौम्य चेहऱ्यानें व अनपेक्षित उद्गारांनी मी जास्तच भांबावलों—सभोंवार पाहून मनाची प्रथम खात्री केली...ते आपल्यालाच बोलावताहेत, कीं आणखी कोणी उभं आहे मागें ?...पण जवळपास दुसरं कोणीच दिसेना !

तेव्हां गोंधळून मी विचारलं..."कोणाला ?...मला म्हणतां ?"

"हो हो ! या ना मि. पारखी !—बाहेर का उभे ?... आज जरा चहा

घ्या कीं आमच्याकडे! हरकत नाही ना कांही?"—दरवाजा सताड उघडा ठेऊन शेजारी माझ्या स्वागतार्थंच तिथं उभे राहिले होते—

त्यांच्या चेहऱ्यावरील स्नेहाळ भावावरून दिसलं-आजची त्यांची ती 'विनंती' कसल्या तक्रारीची नव्हती!—केवळ स्नेहाखातर मी सुवर्णांच्या घरांत आयुष्यांत प्रथमच शिरत होतों.—

आंतला सुवर्ण-संसार कसा अगदीं जिथल्यातिथं नि टापटीचीचा होता. बाल्कनीजवळच त्यांचा मोठा सातआठ व्हॉल्व्हचा 'जी. इ. सी' रेडिओ सुंदर आवरणांत ठेवलेला, भोंवतालचं फर्निचर मोजकंच पण नव्या डिझाइन स्टाइलचं, खालीं साध्या रंगसंगतीचा कार्पेट, भिंतीवर मध्यमागीं छोटंसं बिजेरी वाटोळं घड्याळ, नि पांच सहा पेंटिंग-पॉर्ट्रेट्स आकाशी रंगाच्या भिंतीवर लटकत होतीं.

पुढें केलेल्या खुर्चीवर मी बसल्यावर ते म्हणाले—"आज दिवसभर अगदीं बेचैन दिसलां तुम्ही!-तेव्हां म्हटलं चहा द्यावा यांना आज—"

["म्हणजे माझ्याप्रमाणें या प्राण्याचीहि माझ्यावर पाळत आहे वाटतं?...सहानुभूती बरी दिसतेयू स्वारीकडे!—" असले विचार करीत त्यांच्याकडे मी निरखून पहात होतों.]

"मला आहे कल्पना—घरांत माणसं नसलीं, म्हणजे मनुष्य कसा वेडा होतो त्याची!..." सुवर्ण क्षणभरानें म्हणाले.

["तुम्ही स्वत किती वेडे झालां होतां एकटे असतांना, याची मला मात्र चांगलीच कल्पना आहे!—" मी मनांत म्हणालों. पण पुन्हा वाटलं..."हें इंगित आपल्याला ठाऊक असणार या कल्पनेनेंच तर नाहीं ना हा धोरणी मनुष्य ही चहाची लांच देत आहे आपल्याला?—"]

तेवढ्यांत सुवर्ण पुन्हां म्हणाले—"मी आपणहून कोणाशीं उगीच बोलणारा नव्हे...पण आज राहवेचना..."

तितक्यांतच त्यांच्या बायकोनें एका छोट्या सुबक ट्रे मधून दोन आकाशी-



रंगाच्या कपांत पिकल्या गव्हाच्या रंगाचा चहा नि तबकडींत ग्लुकोचीं बिस्किटं आणलीं व झालरीचा रुमाल टाकलेल्या पुढल्या टिपायवर सारं ठेवलं.

मला त्यावेळीं, त्याचं तें साधंसंच आदरातिथ्य नि तो घरगुती तयार चहा म्हणजे स्वर्गांतील अमृतच वाटलं.

सुवर्णांच्या त्या दिवशींच्या त्या अकारण सोज्वळ सहानुभूतीनें माझ्या मनांतले कांहीं कांहीं विकल्प धुवून निघाले होते. आणि म्हणूनच त्यांच्या शेजारच्या चांगल्या चार महिन्यांच्या वास्तव्यांत अगदीं प्रथमच एक गोंधळलेला विचार-माझ्या मनांत आला..."या प्राण्याबद्दलचे आपले आज-पर्यंतचे सारे कयास नि विचार-परंपरा सारं चुकली तर नाहीं?—इतक्या कांहीं कांहीं अत्यंत चांगल्या गोष्टी अंगांत नैसर्गिकपणें भिनलेला हा मनुष्य! तसल्या अगदीं थेट परस्परविरोधी वाईट गोष्टी याच्याच हातून घडतील का पण?—"

पण अनुभव होता तो सारा प्रत्यक्ष!—त्यामुळेंच अगदीं चलबिचल होत होती मनाची!!—

वास्तविक त्या खटल्यांत माझी सौ. हीच एकुलती एक, महत्वाची नि मुख्य साक्षीदार!...तरी देखील ती आल्यावर तिलाच न्यायाधीश नेमायचं मी मनांत मुक्रर केलं!...तेव्हां कुठं माझ्या मनाला थोडाबहुत विरंगुळा मिळाला!!—

★

माझ्या धर्मशाळेचं घर झालं; कदान्न जाऊन घरचं जेवण सुरू झालं; मधल्या सांचलेल्या गप्पा गोष्टी झाल्या; बाळाशीं खूप बोबडंबोबडं बोललों; नवा रेडिओहि घरीं आणला होता पुन्हां;...सर्व दृष्टीनें सौ. आल्यानंतर नकळतच नवी टवटवी आली होती माझ्या तनमनाला नि संसाराला!—

शेजाऱ्यांच्या त्या कोड्याबद्दलहि आम्ही बोललों होतों;...पण तें अजून उलगडलं नव्हतं...

एके दिवशीं बोलतांबोलतां सौ. नें एकदम न्याय दिला—"हें पहा!—

कदाचित् आपलंच कशावरून चुकलं नसेल सारं ?...निदान, मी म्हणत्यें, कधीं तरी त्यांचा चहा परतवायला तरी कां बोलवूं नये त्यांना आपल्याकडे !'

त्यावर मी कांहीं बोलण्यापूर्वीच क्षणभरानें ती पुढें म्हणाली—"उद्यां रविवार आहे !...उद्यांच कां नको ?"

माझी कालवाकालव झाली; तिचा तो उदारमतवादी नि व्यवहारी विचार मला मुळींच पटेना !

"छे ! तसलं 'मनांत एक बाहेर एक' मला नाही पसंत मुळींच !" मी हडसून खडसून सांगितलं. "त्या मुळमुळीत शेजार–सौभाग्यापेक्षां हें चालू ढळढळित शेजार–वैधव्य पत्करेल मला !—ती पूर्वीची भयाण शांतता...एक वेळ उघड उघड भांडणहि चालेल मला सुवर्णाशीं !—"

सौ. क्षणभर गप्प राहिली; नि मग हसतच नवा विचार सुचल्या–सारखं करून म्हणाली—"बरं तर !—मग एकच मार्ग मोकळा आहे तुम्हाला !...पारखी ना तुम्ही ?—सुवर्णाची शेवटची पारख करण्यासाठीं... कसाचा दगड घ्या हातांत ! करून घ्या एक घनघोर लढाई त्यांच्याशीं !—"

"हं ! आतां मात्र लाख बोललीस !—बस्स्, ठरलंच !–" मी एकदम समाधानानें ओरडलों—"चेष्टा असो तुझी ही–पण माझं तरी ठरलंच !...माझा विश्वास आहे वायकांच्या आंतल्या आवाजावर, अंतःस्फूर्तीवर ! अशी चमकूं नकोस;...उद्यां रविवार...सुट्टी !...सकाळींच तोंड फोडतों आमच्या शेजार-धर्मांच्या महायुद्धाला;...पार्टिशनपलीकडल्या सांपडेल त्या नवळ्या पोलंडवर एकदम हिटलरी ब्लिझक्रिग–स्वारीच करतों—"

त्या निश्चयानें मला शांत झोंप लागली; पण आपण फट् म्हणतां मी केलेल्या त्या ब्रह्महत्येच्या घोषणेनें स्वतः सौ. मात्र अत्यंत अस्वस्थ झाली होती.

★

सकाळीं उठल्याबरोबर मी प्रथम 'अर्थ–एरिल'सह आमचा रेडिओ पुढल्या खोलीत, पुढल्या दाराजवळच्या कोंपऱ्यांत आणून ठेवला;...बेदरकार-



पणें खिच फिरवला—डोक्यांत आलेल्या कल्पनेप्रमाणें व्हाल्यूमच्या कळी कमी जास्त फिरवल्या; नि गोडवा कायम ठेऊन रेडिओ जितका मोठ्यानें वाजेल तेवढ्या मोठ्यानें चालू ठेवला. आजपर्यंत घाबरून घाबरून बंद ठेवलेलीं सारीं दारं सताड उघडीं टाकलीं;...नि आरामखुर्चीवर ( जसं कांहीं घडलंच नाहीं असा ) ऐसपैस पडलों.

योगायोगानें लोंढ्यांची (?) रेकॉर्ड लागली होती—"हृदयीं धरा..."

"आपल्या घरांत हा नवीन काय चमत्कार ?" म्हणून सौ. काम करतां करतां लगबगीनें बाहेर आली...

दारांचा, रेडिओचा नि माझा तो एकूण न्यारा अवतार पाहून ती माझ्याकडे टवकारून पाहूं लागली;...पण मी निश्चिंत संथपणें हसून म्हणालों—"अग, आधण तयार आहे ना चहाचं ?...उकळी फुटायचीच वाट पहातोय् मी, बरं का ?"

ती बिचारी नाइलाज म्हणून हताश चेहरा करून घरांत परतली.

★

मी अपेक्षित अंतःकरणानें शेजारचा क्षणभर कानोसा घेतला; पण विशेष कांहीं घडलं नाही. रेडिओवर लोंढ्यांचे खडे स्वर उठत होते; सौ. च्या, माझ्या नि माझ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या कानांवर देवलांचे सुप्रसिद्ध गंभीर बोधप्रद शब्द आदळत होते—"हृदयिं धराऽऽबोध खरा !—संसारीं शांतिचा आसरा बरा !!...हा ऽऽ बोध खरा !—संशय–पिशाच्च खट् झोटिंग महा...झोटिंग महा...झोटिंग महा...झोटिंग महा...देऊ नका त्या आसरा जरा...हा ऽ ऽ बोध खरा ! !—"

तेवढ्यांत रेकॉर्ड संपलं; साडेतीन मिनिटांचा तो पहिला निकराचा मारा संपतांच, मी रेडिओ बंद केला; दार उघडून तडख शेजाऱ्यांकडे माझा मोर्चा फिरवला नि समोरासमोर दोन हात करण्यासाठीं पुढें सरसावलों.

त्यांच्या दाराशीं क्षणभर थबकलों नि कडी वाजवली. प्रश्नोत्तरं आरडा-

ओरड कांहीं न होता, कडी काढून स्वतः सुवर्ण समोर उभे राहिले..."ओऽऽ हो !—पारखी ?...या...या कीं !—"

"तुम्हाला सांगायला आलोंय्...आज मी रेडिओ खूप मोठ्यानें लावला !" मी आंत शिरत बेफिकीर स्मित करून तिढेपणेंच म्हणालों.

माझ्या दृष्टीनें मी तीच खरी पहिली तोफ डागली होती.

पण तरी ते उलट हसून हळूच म्हणाले—"लावा कीं खुशाल !—त्यांत हो मला काय सांगायचं ?...अगदीं ऑफिसांतून परतल्याबरोबर आम्हां नवराबायकोचं बोलणंहि एकमेकांना ऐकूं येईना, म्हणून विनंती केली होती मी त्या दिवशीं !!—"

ज्याच्याशीं भांडायला जावं तोच शांतपणें एखादं तत्वज्ञान सांगून नि स्पष्टीकरण करून मिळतं घेऊं लागला, कीं...माझ्याप्रमाणेंच कोणाचाहि तेजोभंग नि विरसच होणार !

मनांत मनस्वी गोंधळ होत असूनहि वरवरच्या उसन्या अवसानानें मी म्हणालों—"रेडिओवर नुकतंच लागलेलं...गाणं ऐकलंत का संपूर्ण ?—"

"कोणतं ?...तें देवलांचं ना ?...छान होतं कीं !—कां वरं ?" तरी ते संथ हसत शांतपणें मला म्हणाले.

"अगदीं त्या बोधाप्रमाणें वागायचं ठरवलंय् मी आजपासून !—" मी त्यांच्याकडे डोळे रोखून लावीत म्हणालों—"हरकत नाही ना तुमची कांहीं ?"

अपराधी मन वरमण्याची व वचपा म्हणून माझ्यावर त्यांनीं रागा-वण्याचीच ती वेळ होती.

पण उलट बाल्कनींत दोन खुर्च्या ओढून, सुवर्ण पुन्हा सस्मित म्हणाले, "छे छे !! माझी कसली हरकत ??—"

माझा अवसानघातच होता तो !—अगदीं प्रथमग्रासे मक्षिकापातच !



तेवढ्यांत मला एका खुर्चीवर बसायची खूण करून दुसरीवर आपण शांतपणें बसत माझ्याकडे पाहून सुवर्ण म्हणाले—"कशी मदत करूं म्हणतां मी तुम्हाला, त्या बाबतींत ?"

मी पुन्हां गोंधळलों;...तरी धीर करून म्हणालों..."नाटकी दांभिक-पणा सोडून...वाटल्यास उघट उघड एकदां माझ्याशीं एक कडाक्याचं भांडण करून !...तुम्ही जो हा आव आणताय् तो मला हास्यास्पदच वाटतोय्..."

"मोठी गंमतच आहे म्हणायची ही !—" सुवर्ण थोडे चमकून म्हणाले—"कसला आव म्हणतां ?—म्हणजे तुमच्या संशय–पिशाचानें माझंच झाड केलंय्...असं तर नव्हेना या सगळ्याचा अर्थ ?..."

"होय होय ! अगदीं तोच !"—मी ठासून म्हणालों..."पण काल्पनिक पिशाच नव्हे हें—! खरी खुरी प्रसंग–परंपरा आहे ती.—"

सुवर्णांच्या चेहऱ्यांत कसला पालट पडतो की काय त्याची मी क्षणभर निरखून पारख करीत होतों;...मग शेवटीं मी त्यांना स्पष्टच सांगितलं—"थोडक्यांत सांगूं ?...तुम्ही–आम्ही पडोशी !—या क्षणीं माझ्या घरीं चहा तयार होत आहे. तुम्हाला चहाला बोलवावं, तुमचा स्नेह जोडावा, असं माझ्या बायकोचं म्हणणं आहे ! पण तसं पोटांत गरळ नि तोंडावर सरळ हें माझ्या स्वभावाला नाहीं जमत;...तुमच्याबद्दल माझ्या मनांत अनेक सकारण गैरसमज आहेत;...त्यांवर तुमच्याकडून प्रकाश पडत असला तर पाहिजेय् ! त्याऐवजीं भांडण होणार असलं तरी बेहत्तर;...पण असला मुळमुळीत स्नेहशेजार नकोय् मला !—"

गंभीर चेहऱ्यानें मजकडे टवकारून पहात सुवर्ण म्हणाले..."अस्संऽ ?"

'पुढली पायरी त्यांच्या रागाचीच !' अशीच माझी अटकळ; त्यांचं तें क्षणभर गप्प राहणं वादळापूर्वीची शांतताच वाटत होती मला !...सारंच जिथं पाणी मुरत होतं...तिथं...

तोंच सुवर्णांनी पुन्हां शांतता मोडली..."मला वाटलं होतं, मीच दुसऱ्यांशीं बेफिकीरीनें वागून त्यांना दुखवूं शकतों !...पण अशा पद्धतीनें

माझ्याशीं बोलून, मला चहाचं एक फुसकं आमंत्रण देणारे नि स्नेह जोडण्याचा विडा उचलणारे तुम्हीच एक सवाईशिष्ट भेटतांहां मला !..."

मी लावलेल्या सुरुंगाला वत्ती मिळाल्याचं समाधान त्याक्षणीं मिळत होतं मला ! आतां पुढल्या तोंडा-तोंडीची,...वेळ पडल्यास गुद्दागुद्दीचीहि,... तयारी करूं लागलों मी माझ्या मनांत.—

★

तोंच, तिथल्या शांततेंत, त्यांच्या स्वयंपाकखोलींतून आलेले कपबशांचे आवाज आदळले माझ्या कानांवर;...आणि त्याच वेळीं सुवर्ण खेवचट हसून मला म्हणाले—" बरं पण मग तसंच कां होईना—याक्षणीं तुमची तर इच्छा नाहीच,...तेव्हां तशी तुम्हाला खरी खुरी इच्छा होईपर्यंत असं करा—तुम्हाला पाहिजेच् ती खाजगी मुलाखत घेत तुम्ही आज इथंच चहा घ्या माझ्याकडे !... आमच्याकडे याक्षणींच दोन कप चहा तयार आहे;...तुमच्याकडचं आधण फुकट जाऊं नये म्हणून मी माझ्या बायकोलाच मुलीला घेऊन तुमच्याकडे पाठवून देतों; मग अनायासें आपल्याला इथंच एकांत मिळेल !...कसं ?—"

रागाऐवजीं त्यांची ती योजना ऐकून मला हसूं आलं;...मी अगदीं थंडगारच पडलों. जणूं मला गरम करण्यासाठींच त्यांच्या बायकोनें दोन चहाचे कप तेवढ्यांत आमच्यासमोर आणले; आणि तिला उद्देशून श्री. सुवर्ण हसत म्हणाले—" अग, हें पहा ! ..तूं नीलाला घेऊन आतां शेजाऱ्यांकडे जा चहाला, बरं कां ? या आपल्या शेजाऱ्यांना आपल्या घरीं माझ्याशीं एकांत हवाय् !—"

आणि तसं बोलतां बोलतां चहाचा एक कप पुढे करीत ते मला म्हणाले— " हं घ्या, चहा गरम आहे तंवर ! मग उलटतपासणीला जोर येईल—"

सुवर्णांच्या त्या एकंदर खेळाडू वृत्तीनें मी तर सर्दच झालों एकदम—;

पुन्हा त्यांच्याचकडून तसा अनपेक्षितपणें मिळालेला चहा कांही न बोलतांच चार घोटांत घशाखालीं घातला. बाजू उलट माझ्यावरच उलटल्या;



सारखं वाटत होतं मला प्रत्येक घोटाला ! सुरवात कशी व कुठं करावी तेंच मला सुचत नव्हतं...

सुवर्णांनी मात्र उलट एकेका घोटाची लज्जत चाखत चहा संपवला; दोन्ही कप नेऊन आंत ठेवले;...साग्रसंगीत पानपट्ट्या तयार केल्या—एक माझ्यापुढें करून दुसरी स्वतःच्या तोंडांत घातली. वेलदोडे—लवंगा पुन्हां पुढे केल्या नि मग हसत हसत शेवटीं ते मला म्हणाले..." हं ! कोणी नाही जवळपास;...अगदीं पूर्ण एकांत आहे ! आतां बोला."

★

आतांपर्यंत माझ्या पूर्वीच्या जोराचा पारा बराच उतरत आला होता. सुवर्णांच्या त्या एका प्रकारच्या आव्हानानंतर जरा त्रिचकत चांचरतच मी पहिला प्रश्न टाकला—" आतां सांगा, तुमचे दोस्त तेरदाळकर कुठल्या नाटक कंपनींत आहेत ?"

" नाटक कंपनींत ?—हॅट्..." प्रथम चमकून स्वतःला सांवरीत ते मला पुढे म्हणाले—" अहो तो तर केमिस्ट आहे एका कंपनीत, सव्वाशें रुपयांवर, पुण्याला !—

" म्हणजे ?" आतां माझी दचकण्याची पाळी होती.

" पण त्याला नाटकं पहाण्याचा मात्र फार नाद !—अलीकडेच एकदा त्यानें हिशेब करून सांगितलं मला,...लहान मोठे ८८८ प्रयोग आयुष्यांत पाहिले आहेत आपण आतांपर्यंत ! सासवण्याचा लंगोटियार तो माझा...अजून कायम आहे दोस्ती, एवढं लांबलांब गेलों—राहिलों तरी !"

माझ्या नाड्या आंखडूं लागल्या होत्या; तेवढ्यांत सुवर्ण म्हणाले— " जरा उच्छृंखळ,...पण मंडळीतला आहे आमचा तेरदाळ्या !...कां ?...पण त्याचं काय म्हणतां?... तुम्हाला कुठं आढळली ती थापेबाज चीज ?..."

" आणखी कुठं नाही—तुमच्याकडेच..." मी पुन्हा कलाटणी दिली... " मधल्या तुमच्या एकाकी काळांत...जेव्हां तुम्ही दाराला आतून कुलूप घालून

बसायचा…घरांत रात्ररात्र दिवे पेटायचे…रात्रीबेरात्रीं अंघोळी चालायच्या… आणि माझ्या कानांनी सांगितलं तें खरं असेल तर बाटल्या–ग्लासंहि वाजयची—

" काय ? बाटल्या ? " सुवर्णांचा गोंधळलेला प्रश्न आला.

" हो हो !—बाटल्या !…बाटल्या ! !…नि ग्लास देखील.. " त्यांच्या संभावित टाळाटाळीचा दाट संशय येऊन मी पुन्हा ठांसून म्हणालों.

क्षणभर ते विचारांत पडल्यासारखे झाले.

★

पण मग सुवर्ण एकदम मोठ्यानें खदखदां हसतच सुटले; मी चमकल्या नजरेनें त्यांच्याकडे पहात आहे, तेवढ्यांत ते हास्याचे बांध फोडीत म्हणाले— " एकूण मला अट्टल पिणारा समजलेत होय तुम्ही ?…वा: छान !…माझी हरकत नाही त्याला !—तरी पण तो एक इतिहास आहे. खाजगी आहे जरा… पण तुम्ही विचारतांच तर सांगतों !—अहो, गेल्या वर्षीं उन्हाळ्यांत की नाही— आमच्या सासवन्याच्या विहिरीचं पाणी आटलं होतं !—"

" पण त्याचा इथं संबंध ?—"

" वा:, खूपच आहे !—गांवीं रजा घेऊन गेलों होतों;… मिळेल त्या मचूळ पाण्यांत कसंबसं अंग धुण्याचा प्रसंग होता तो !…त्यांत पुन्हां मिळेल तें अधॅकचॅ बरं वाईट अन्न घशाखालीं घालण्याची पुढें मुंबईंत पाळी !—"

" अस्सं, अस्सं ऽ ? " त्यांचं स्पष्टीकरण मुद्दा सोडून बाजूला झुकूं लागलंसं वाटून मी अप्रत्यक्ष संशय व्यक्त केला.

" खरं माना…नका मानूं !…हजारांनी हजार उपाय सांगितले;… कापरेल, करंजेल…जेरीस येऊन सगळी तेलं एकदम मागवलीं; पण कोणतं अधिक गुणकारी तें ठरेना ! म्हणून…साऱ्याच बाटल्यांतून मिश्रण करून मी तें…अगदीं अक्षरश: लंगोटी लावून साऱ्या अंगाला चोपडीत असे ! मग वर कढत पाण्याची शेकत शेकत अंघोळ !—नि हें सर्व सुरळीत पार पडेपर्यंत



कोणी मध्येंच त्रास द्यायला येऊं नये, म्हणूनच कडेकोट बंदोबस्तासाठीं दाराला आंतून कुलूप—"

मी नकळत स्वत:शींच हसूं लागलों–तोंच सुवर्ण म्हणाले…" तरी तेरदाळकर येटा मध्येंच धूमकेतूप्रमाणें उपटायचा;…नि माझे कार्यक्रम सायडिंगला पडायचे !—तो आला कीं मग माझ्याच घरांत मी चोरासारखा—"

सुवर्ण पटकन् खुर्चीवरून उठले; आंतल्या फळीवर रांगेनें लावलेल्या अनेक बाटल्यांतील कांही रंगीबेरंगी बाटल्या व त्याजवळ ठेवलेला ग्लास दाखवून ते म्हणाले—" याच त्या बाटल्या !…नि हाच तुमचा तो मला दारुड्या ठरवणाराच ऐतिहासिक ग्लास ! "

आम्ही दोघेहि हळू हळूं हसत होतों.

★

सुवर्णांना विषय डावलण्याची तशी संधी मिळूं नये म्हणून मी मुद्यावर येऊन पटकन् म्हणालों—" तें असेल ! पण तेरदाळकर आल्यावर तुमच्या दाराला बाहेरून कुलूप लागे रात्रींबेरात्रीं तें ? तेंहि सासवन्याच्या विहिरीतल्या पाण्यामुळेंच ?--"

सुवर्ण पुन्हा हसून म्हणाले—" तें ना ?…त्याचं असं—दीडशें नि वॉर अलाउन्स मिळून एकशें साडेबहात्तर मिळतात मला सध्यां !—"

" हं हं ! म्हणून ती जीवाची करमणूक करायला —"

" गप्प बसाल का जरा ? कारकुनी हमाली नि सुळावरची पोळी सारखीच ! तेव्हां नाइलाजानें कामाचे भार शेवटीं उचलून घरीं आणे !–नि मग दिवे लावून बसायचों रात्ररात्रभर;…झोंप येऊं नये म्हणून चहा ! तेरदाळकर आला कधीं कीं मग मात्र जायचों आम्ही सिनेमाला, फिरायला; कधीं कधीं गाण्याची हुक्की येई एकदम त्याला ! तुम्हा शेजाऱ्यांना उपद्रव नको म्हणून मग त्याला घेऊन समुद्रावर जाण्याची जबाबदारी पडे माझ्यावर— मोठा नकल्या नि गप्पिष्ट आहे तो तेरदाळ्या म्हणजे !—नाटकंच्या नाटकं

पाठ वेश्याची !—त्याच्या संगतींत कसा वेळ जायचा समजतच नसे मुळीं—कधीं कधीं तीन तीन वाजत घरीं परतायला !...नि त्यानंतरच्या उरल्या रात्रींतहि त्या नकल्याच्या संगतींत झोंपेचं खोबरंच ! !—"

★

वकिलानें उत्तम केस तयार करून जावं...नि शेवटीं सर्व मुद्द्यांचा पायाच भुसभुसित म्हणून प्रतिपक्षानें हसत खेळत कोर्टाला पटवून द्यावं-तस्सं झालं होतं माझं !...मला सुवर्णांच्या त्या स्पष्टीकरणांत सहजासहजीं कसली बनवाबनवी दिसत नव्हती !-माझा नाइलाज झाला होता.

तरी देखील शेवटचा एक मारा करण्याचं ठरवलंच मी !—नवं अवसान आणून मी चांचरत चांचरतच म्हणालों—"रागावूं नका !—जरा एक नाजुक प्रश्न विचारायचाय् तुम्हाला—"

"ठीक..." तरी खेळकरपणा न सोडतां सुवर्ण हसून म्हणाले. "तुमच्या पाटीवरून तर तुम्ही एका इंग्लिश कंपनीचे पुस्तक विक्रेते फिरते एजंट दिसतां !...पण आतांपर्यंतच्या प्रश्नांनी तुम्ही एखाद्या कसलेल्या भालेराव–बाबुराव–गुप्त पोलिसालाहि लाजवलं आहे !—बरं–तरी हरकत नाही; तुमचं सारं कौशल्य पणाला लावा !—तयार आहे मी ! !—"

तेव्हां माझ्या हातांतील उरलेलं हुकमी पान पुढें काढलं मी !—वाटलं आतां तरी कुठं जाईल बेटा ? —मी क्षणभर नाटकीपणें थांबून सुवर्णांवर एकदम भडिमार केला—"तर मग असं पहा—पंधरवड्यापूर्वीचीच गोष्ट;...संध्याकाळची वेळ;...एक टिपटॉप तरुणी तुमच्याबरोबर तुमच्यामागून इथं आली त्या दिवशीं तुमच्याकडे ती वस्तीला होती;...तिनें एक गाणं म्हटल्यावर दुसऱ्यासाठीं तुम्ही तिला आग्रह केला;...दुसऱ्याहि दिवशीं रहायची—ऑफिस चुकवून तिच्याबरोबर सिनेमाला जायची कल्पना काढलीत तुम्ही;—यांत कोणाला यशवंती–किर्लोस्करी..."

"बस्स् !—शट् अप् ! !—" सुवर्ण एकदम चिडून माझ्यावर खेंकसले.



मला जरा समाधानच वाटलं...'एकूण शेवटीं तरी मासा गळाला लागलाच कीं नाही ?'

★

पण क्षणभरांतच भानावर येऊन सुवर्ण हसत म्हणाले—"हो, खरं आहे हें सारं !—काय म्हणणं आहे तुमचं त्यावर ?"

मी पुन्हां चमकलों; पण सावधगिरीनें म्हणालों—"माझं नाही कांही म्हणणं ! असलंच तर असायचं तुमचं म्हणणं ! ! नि ऐकतां आलं तर फक्त ऐकायचंय् मला !—"

मधल्या तंग वातावरणांत सुवर्णांचा चेहरा हळूं हळूं पालटत होता;...शेवटीं तें शांतता मोडून मला संथपणें म्हणाले—"माझ्याऐवजीं दुसरा कोणताहि एखादा मनुष्य, असल्या तुमचा अचरट प्रश्नानें साफ बिथरला असता, चिडला असता ! आपल्या घरांतून निदान प्रथम हांकलून तरी दिलं असतं त्यानें तुम्हाला !—पण मी तर तुम्हाला सुरवातीलाच सारी मुभा देऊन ठेवलीय्;...तेव्हां सांगितलंच पाहिजे सारं आतां तुम्हाला—"

त्या उद्गारांत त्यांची टाळाटाळी कांगावाच दिसून मी म्हणालों,...
"काही फारच खाजगी असलं तर नका सांगूं—"

"तें कां ? सगळं सांगतों कीं !" सुवर्ण जरा कठोरपणें म्हणाले—"कोणत्याहि गोष्टीकडे बांकडं पहायचं हा तर समाजाचा जुनाट रोगच आहे ! तुम्हाला तरी अपवाद का धरूं मी ? पण तुम्ही जी आतां नखरेल तरुणी म्हणालांत ती—"

"कोणी तुमची लांबची बहीण असणार ?—" मी मध्येंच टोमण्यानें म्हणालों—

"नाही...ती माझी सर्वांत मोठी मुलगी !—" सुवर्ण संथपणें म्हणाले—

"काय ?—" मी दचकून ओरडलों.

"हो, या लढाईच्या नि पळापळीच्या भानगडींत तिचं वर्ष नको फुकट

जायला; म्हणून अलिगगच्या हायस्कुलांत तिला तिच्या मावशीकडे ठेवलीय्-मी गेल्या फेब्रुआरींत; तिच्या पाठीवरचे माझे मधले दोन मुलगेहि तिथंच असतात तिच्याबरोबर; जरा उफाड्याच्या वाढीची आहे ती..."

केवढ्यानें दचकलों मी ?...कोणी हतोडा डोकींत घालावा तसे काजवेच चमकले माझ्या डोळ्यासमोर...

★

"काय ?...म्हणतां काय ?—" मी क्षणभरानें स्वतःला सांवरून भानावर येत चांचरत म्हणालों—"प...पण म्ह...म्हणजे तुमचं वय किती ??—"

"हें एकेचाळीसावं चालूं आहे !" सुवर्ण खुसूंखुसूं हसून म्हणाले—नि आमच्या हिचं छत्तिसावं !—"

माझी दांतखिळीच बसली. तोंच सुवर्ण म्हणाले—"त्या मानानें लहानच दिसतों आम्ही दोघे ! असंच ना ? पण त्याला आमचा काय इलाज ? अहो, वयावर संसार अवलंबून-थांबून राहतो थोडाच ?–दुसरं असं, राव, माझ्या वडिलांचा मी एकुलता एक मुलगा—त्यांनी हौसेनें अगदीं एकोणिसाव्या वर्षी आझं लग्न करून दिलं !...तरी बाविसाव्या वर्षापर्यंत मी बावा झालों नाहीं !...आणि तरीहि गुन्हेगारच ठरवणार कांहो मला तुम्ही ?—"

खाजगी गोष्टी...नि त्यांचीहि अशी खेळकर दिलखुलास छाननी !—सुवर्णांच्या त्या वागणूकीनें मला अगदीं मेल्याहून मेल्यासारखं झालं.

तोंच पडोशी सुवर्ण म्हणाले..."इतरांचीं मुलं त्यांना बाबा, अण्णा, नाना अशा हांका मारतात. पण माझीं सारीं मुलं मला मात्र अगदीं धाकट्या भावाचा आव आणून 'बाबुराव ! बाबुराव' म्हणतात !...बोला आतां !—तुम्हीच सांगा काय तें ?—"

मी काय सांगणार त्यांना ?–मी निरूत्तरच झालों होतों.

★



झाल्याप्रकारानंतर नि शेवटच्या त्या अनपेक्षित कलाटणीनंतर थोडावेळ कोणीच कांहीं बोललं नाही—

शेवटीं सुवर्णांनीच शांतता मोडली—"झाले तुमचे सारे प्रश्न माझा एकांत-मुलाखतीतले ? लागला एकदां निकाल तुमचा कुतूहलाचा-नि संशयाचा ? —"

मी जरा लाजून खालीं पहात म्हणालों—"हो !—नि पर्यायानें माझ्या स्वतःचाच निकाल लागलाय् !...माफ करा, बाबूराव !...आतां तुम्ही सांगाल त्या पद्धतीनें तुमची सपशेल क्षमा मागायला नि चालतं व्हायला तयार आहे मी !—"

"पण जरुरी नाही त्याची कांही एक !" सुवर्ण उठून माझ्या खांद्यावर थाप मारीत म्हणाले—"तुम्ही काय मला आंधळा समजलेत कां हो ?—याच मधल्या काळांत मीहि तुम्हाला पहात आलोंय्-थोडं फार !...मि. पारखी, तुम्ही नुसत्या शेजारालाच नव्हे, तर मैत्रीलाहि लायख आहां !—तसं म्हणाल तर—फार आवडला मला तुमचा आजचा हा रोखठोकपणा !—असल्या प्रसंगावरूनच माणसाची खरी किंमत कळते !—"

"तुम्हाला एक अव्वल दर्जाचा व्यसनी नाटकी, लफंगा ठरवून, तुमच्याच घरांत तुमची अशी अपमानकारक उलटतपासणी करणारा—" मी अपराधी मनानें तुटक बोलत होतों—:

"छे छे !—" सुवर्ण हसले —"मीच तर सुरवातीला तसली परवानगी दिली तुम्हाला !—खरं म्हणजे—सकाळचं तें रेकॉर्ड ऐकल्यावर मलाहि वाटत होतं, तुम्हाला भेटावं,...एकदां ओळख नि दिलजमपाई करावी;...म्हणून !...नाही तर कोणाची तरी माय व्याली असती कां, तुम्ही विचारलेत त्या व तसल्या प्रश्नांचा माझ्यासमोर नुसता उच्चार करायची ?"

मला हायसं वाटलं नि आनंदहि झाला.

★

कांहीं न बोलतांच मी सुवर्णांच्या स्वयंपाकघरांतून अगदीं परिचिताप्रमाणें आपुलकीनें आम्हा दोघांना जोडणाऱ्या त्या पार्टिशनच्या पश्चिम आघाडीजवळ गेलों. धडधडत्या छातीनें त्या सरहद्दीच्या अलीकडे वावरतानांहि आजपर्यंत दचकणारा मी!...आज सुवर्णांच्या अभयाच्या छत्रीनें पलीकडेहि येऊन स्वैर वावर करीत होतों! --लढाई आतां खरी खुरी संपली होती;...फक्त अधिकार-वाणीनें शांततेची घोषणा तेवढीच व्हायची होती—

आधीं कल्पनाहि नसतां, 'राज-महाल'च्या मालकानें केलेल्या, मधल्या दोघांना जोडणाऱ्या पार्टिशनचा-विशेषतः त्या दरवाजाचा-एक न्यारा उपयोग करण्याचं माझ्या मनांत आलं—

सुवर्णांच्या बाजूची गंजलेली कडी खटकन् एकदम काढून, मी तो प्लायवुडचा दरवाजा ढोलाप्रमाणें वाजवला;—नि सुवर्णांकडे पाहून हसत हसत खड्या स्वरांत माझ्या बायकोला म्हणालों—"अग ए ऽ!—ए ऽ मिसेस पारखी! हें दार उघड पाहूं आधीं तिकडून!...सुवर्णांची पुरी पारख झाली!!... आम्ही सुवर्ण-पारखी दोघेहि चहाला येतों आहोंत पारख्यांकडे!—"

श्री. सुवर्ण समोर दिसणाऱ्या सौ. सुवर्णकडे पाहून हसत म्हणाले— "हृदयिं धरा हा बोध खरा!"

आणि मधल्या त्या आम्हां दोघांना जोडणाऱ्या पार्टिशनचा दरवाजा माझ्या सौ. नें त्या दिवशीं प्रथमच एकदां उघडल्यावर, पुढें तसा कायमचा उघडाच राहिला!!—

...नि दोघांच्या संसारांत खोल खोल शिरणारीं हजारों स्नेहजालं त्यांतूनच मग पुढें एकमेकांत गुंतत गेलीं...

१-६।२।४३.

---

# —पण,...तो बसला नाही! ✶ ✶ रघुवीर सामंत

आजच्या चर्चेत सारीं अगदीं रंगून जाणं साहजिकच होतं. 'नाट्य-छटाकार दिवाकरां'च्या त्या दिनकरपंत कारकुनाच्या दुःखी वैराण आयुष्यानें आमच्या सर्वांच्याच हृदयांचा तसा पगडा घेतला होता...

तेवढ्यांत घंटा झाली, म्हणून मी उठलों; पुस्तक बंद केलं; पण वर्गांतून बाहेर पडतां पडतां, समोर बसलेल्या त्या मॅट्रिकच्या मुलांना शहाणपणा शिकवणारं, शेवटचं एक धावतं वाक्य उच्चारलंच—"एकंदरींत काय...कीं,...या नाटिकेंतल्या घटना आपल्याला जरा भडक वाटल्या,...तरी त्यांना वास्तवाच्या पायाचा अगदीं भरपूर आधार आहे!...न्यूनगंडानें पछाडलेल्या कारकुनी मनाचं,...त्याच्या सर्व टप्प्यांचं अगदीं उत्तम चित्रण आहे हें!—पण मग,... हेंही लक्षांत येतं आपल्या, कीं, समाज नि परिस्थितीच, शेवटीं माणसाचं बरं-वाईट मन तयार करतात!—"

त्या चाळीस मिनिटांच्या बडबडीनें माझा घसा तर चांगलाच कोरडला होता; पण पुढला तास मोकळा असल्याची जाणीव होऊन जिना उतरतां उतरतां मला जरा हायसं वाटलं

...नि म्हणूनच, थोड्या निश्चिंत नि अनिर्बंध मनानें संथ पावलं टाकत, मी आमच्या खोलीकडे वळलों...

★

दारांतून मी आंत शिरणार, तोंच, बऱ्याच दिवसांनी तो मला मध्येंच घुटमळत उभा असलेला दिसला!...

त्याच्या पोषाखांत फारसा फरक दिसत नव्हता; मळका लेंगा जाऊन काचा मारलेलं शुभ्र धोतर; काळवंडलेलीं पत्र्याचीं बटनं जाऊन, रुप्याचीं बटनं लावलेला उभ्या रेघांचा शर्ट; पूर्वी इथं असतांना दिसत नसे, तरी

आतां नवा पण साधाच मद्रास टस्सरचा कोट अंगावर ! एवढा थोडासाच एकूण पालट होता काय तो !—

प्रकृतींत मात्र चांगली सुधारणा झाली होती.

पांच वर्षांत वयाचीही वाढ होऊन, आतां अठ्ठाविशीकडे झुकणारा काळासांवळा पण चांगला ठाकठीक जवान झाला होता तो !...

अर्डीचआणे-प्लेट ऐवजीं, हल्लीं तो चांगलं भरपूर नि अधिक सकस खात असावा, असें त्याचे आतां थेडि वर आलेले ( पण पूर्वीचे चपटे ) गाल, मला स्पष्टपणें सांगत होते. पूर्वींचा त्याच्या डोळ्यांतला ओढलेपणा जाऊन, ते अधिक खेळकर नि समाधानी झाले होते, हें नक्कीच.

★

इतक्यांत, मला पहातांच त्यानें आपले स्वच्छ दांतही मला, दाखवले; नि पुढें येत तो हसून प्रेमानेंच म्हणाला—" काय स ऽ ऽ र ? संपला ऽ वर्ग ?"

" या ऽ गणपतराव !...आज इकडे कुठं वाट चुकलांत तुम्ही ? . " मी पण हसून त्याच्या पाठीवर हळूंच थाप मारून म्हटलं.

तो एखाद्या तरुण मुलीसारखा एकदम लाजला; नि माझ्यावरोबर चालतां चालतां म्हणाला—" अशी चेष्टा नका ना करूं सर, माझी !...तुम्हालाच भेटायला आलोंय्; तुमचीच वाटत पहात होतों...इतका वेळ !..."

" अरे, मग इतकें दिवस या शाळेंत घालवलेस !...तुला काय मॅट्रिकचा 'ए' वर्ग ठाऊक नव्हता ?— तिथं यायचं होतंस !..." मी हसून पुस्तक आंत ठेवण्यासाठीं खण उघडला.

" कशाला ?—तशी घाई नव्हती कांहीं मला ! नि...पूर्वीच्या संवयीप्रमाणें टाइम-टेबलांत जाऊन पाहिलं मी, तुम्हाला हा पुढला ऑफ असल्याचं !—" त्यानें पुन्हां स्मित करून म्हटलं...

" मग वेड्या, बसायचं तरी होतंस, शांतपणें !—" खण बंद करून मी त्याच्याकडे वळलों.



त्याचा चेहरा खर्कन् थोडा पालटलेला दिसला मला;...मी किंचित् गोंधळलोंही त्यामुळें !—

✶

पण मग भोंवतीं पाहिलं;...तीन चार सहाध्यापक होते खोलींत;...एक वर्तमानपत्र वाचत होते; एक वह्या तपासत होते; दोघे हळूं हळूं गप्पा मारीत होते.

मी जरा कौतुकी स्वरांत अभावित अभिमानानें त्यांना म्हणालों—" अहो; गणपत आलाय् आपला, आज !—"

" हो, पाहिला ना !—भेटला मघां आम्हाला ... " दोघातिघांचे निर-निराळे आवाज आले —नि मग प्रत्येक जण आपापल्या कामांत पुन्हां गढला !

तो माझ्याकडे पहात होता; मी त्याच्याकडे चोरट्या नजरेनें ओझरतं एकदां पाहिलं; नि पटकन् त्याची दृष्टी चुकवायला मान बाजूला वळवली !

मग मी मधल्या टेबलाजवळच्या एका मोकळ्या बांकावर जाऊन बसलों. पाय टेबलावर टाकले नि मागें रेललों.

" आणखी काय, सर ?...दसऱ्याला सोनं द्यायला तुमच्या घरीं आलों; त्यानंतर वेळच मिळाला नाही बघां भेटायला !"—त्यानेंच विषय पालटून पुन्हा बोलायला सुरवात केली.

त्याच्या त्या प्रत्येक शब्दांत,...हालचालींत,...त्याच्या मनांतला उत्साह-आनंदच तरंगत होता; माझ्या बद्दलची अहेतुक स्नेहाळ वृत्ती प्रतिबिंबित होत होती !—

★

" तूं काय बाबा, आतां फार कामाचा माणूस झालास गणपत !" क्षणभरानें सिगारेटची पेटी खिशांतून काढत मी हसून म्हणालों...

" खरंच तें ! —फारच काम पडतं हल्लीं, सर ! मग येणार तरी केव्हा

सांगा ? मागें एकदां भाषांतराला पेपरांत घातली होतीत ना कविता ?—तस्सं ऽ च !...नो टाइम टु स्टँड अँड स्टेअर !—रविवारीं सुद्धां ओव्हर-टाईमला बोलावतात आमचे हेडक्लार्क !"—तो मोकळ्या मनानें म्हणाला.

"अस्सं ऽ ऽ ?—पण मग ओव्हर-टाइमचेहि आणखी जादा पैसे मिळवत असशील ! बँकेतबिँकेत ठेवतोस कीं नाही ?...मला तरी व्याजीं दे थोडे !" मी जरा थट्टेनेंच त्याला म्हणालों.

"हो हो !—जमलं कीं देईन कीं !—पण सर, बँकेंत ठेवण्याइतका जास्त नाही झालेला पैसा माझ्याकडे अजून !—" तो पुन्हां किंचित् लाजला; नि तोंडभर हसला..."बाकी एरवी ठीक चाललंय् ! सध्या नव्वद नि महागाई तीस मिळते !—"

★

तेवढ्यांत मी एक सिग्रेट काढून तोंडांत धरली नि पेटी त्याच्यापुढें केली.

"हें काय ? चेष्टा काय करताय् सर, माझी आज एकसारखी !..." तो पुन्हा खूप लाजून नकारार्थक मान हलवीत म्हणाला.

"झालं !—तुला ऑफर केली तर चेष्टा झाली !...नि सिग्रेट ओढायलाही अजून शिकला नाहींस का ?...मग रे तुला कसला खर्च आलाय् ?...करतोस तरी काय पैशाचं ? अं ऽ ?" मी धूर सोडून हसत म्हणालों.

पण माझ्या पटकन् लक्षांत आलं;...अजून गणपत माझ्यासमोर वांकाला ओढगून उभाच आहे. हाताचीं कोपरं टेबलावर टेकून, वाकल्या वांकल्याच, माझ्याशीं तो इतका वेळ हळूहळूं बोलत होता.

तेव्हां मी जरा बाजूला सरलों. नि पटकन् किंचित् अपराधी मनानें त्याला म्हणालों..."अरे ? तूं उभा रे कां, गणपत ?...बस ना इथं असा !—"

त्याचा चेहरा पुन्हा पालटला. लाजत लाजत सभोंवार पाहून पण निश्चयानेंच तो म्हणाला—"छे ! कांहीं नको !...हें असं उभ्यानेंच बरं बोलायला तुमच्याशीं, सर !"



तो बसायला लाजत होता; माझ्या पटकन् लक्षांत आलं तें ! आणि त्याच वेळीं, आज त्याला तसं माझ्यासमोर उभं राहून कुजबुजत बोलतांना पाहून, पांच वर्षांपूर्वींचा तो प्रसंग पटकन् माझ्या डोळ्यापुढून चमकला...

★

त्यावेळींहि तो असाच माझ्यासमोर हात दुमडून टेबलाजवळ वांकून उभा राहिला होता. नि अगदीं कुजबुजत रुद्ध कंठानें मला म्हणाला होता—"सर, जमणार नसलं तुम्हाला, तर आपलं लगलीच विसरून जा !—पण विनन्ति आहे तुमच्याकडे एक माझी !"

"कसली रे ?" मी चमकून विचारलं...

"मला फॉर्म भरायला पंधरा रुपये देतां आज ? उद्यांची शेवटची तारीख आहे !— जमेल तितक्या लौकर परत करीन !"

माझ्या खिशाचा मी किंचित् अंदाज घेतला होता; नि मग मी त्याला ते लगलीच त्याच बैठकींत काढूनहि दिले होते.

पुढें तें सारं विसरलों होतों मी ! पण त्यानें मात्र आठवण ठेऊन, अगदीं रिझल्टपूर्वीच, मला मुद्दाम घरीं येऊन ते आणून दिले होते !—

मग त्याचा रिझल्ट लागला होता. तो पास झाला होता. ती त्याच्या-आयुष्यांतली क्रांति होती. त्यामुळेंच तो आमच्या या वातावरणांतून पंख फुटलेल्या पांखरासारखा दूर उडून गेला होता.

★

त्यानंतर मध्यें कधीं नाही तरी दर सक्रांतीला तिळगुळ नि दर दसऱ्याला सोनं द्यायला, हटकून, अगदीं न विसरतां. तो माझ्याकडे येत आला होता घरीं;...अगदी मोकळ्या मनानें हसत-बसून तासभर माझ्याकडे घालवायचा त्यावेळीं ! कां कोण जाणें, माझं गरिबाऊ घर त्याला आपल्या घरच्यासारखं वाटे !—

ब्राह्मणेतराच्या शिक्क्यामुळें अगदीं सुरवातीलाच तो साठ रुपये मिळवूं लागला होता. मग आणखी लढाई सुरूं झाली. तिनें तर त्याच्या आयुष्यांत

अधिकच चमत्कार घडवून आणले. सुरवातीला ए. आर. पी., मग रेशनिंग नि आतां तर तो पोर्टट्रस्टमध्यें उडी मारून तिथं कायम झाला होता. अगदीं जवळ जवळ आमच्याइतकंच मिळवूं लागला होता—

माझ्या गैरहिशेबी संसारामध्यें,…कुठे तरी पडले असते किंवा कसे तरी उडाले असते असले माझे केवळ पंधरा रुपडे, फक्त दोन महिन्यापुरतेच वापरूनही, तो प्रत्येक भेटींत आपल्या बढतीची बातमी आनंदानें मला सांगून झाल्यावर म्हणे—"सर, मॅट्रिकची नि ही पुढली सगळी किंमत,…तुमच्यामुळेंच आली मला !…नाही तर पंधरा रुपये गोळा होईपर्यंत, ते गोळा करत करतच,…मी म्हातारा झालों असतो !"

मिनिटभरांतच हे सारे प्रसंग माझ्या डोळ्या पुढून भरारून गेले.

★

भानावर आलों, तेव्हां गणपत माझ्याकडे व खालीं आलटून पालटून पहात तसाच मुग्ध उभा आहे नि भोंवतीं अगदीं शांतता आहे, याची एकदम जाणीव झाली मला !—

मी त्याच्याकडे पाहून मुकाट्यानें हसलों. तोहि हसला.

ती शांतता खूप बोलकी होती. तेवढ्या मिनिटांतच त्याच्याही मनांत पुष्कळ येऊन गेलं असेल.

मग मीच पुन्हा सुरवात केली…"हं…तेव्हां असं आहे म्हणतोस !—ठीक ! वर पण, आज कां आला होतास ?…सहजच ना ?…"

"तसं म्हटलं तर सहज;…नाही तर मोऽठ्या कामानिमित्त…" तो थोडं हसून-लाजून म्हणाला.

"म्हणजे ?—ऑफिस नाही तुला आज ?" मी आश्चर्य व्यक्त केलं. "…नि रहातोस कुठं ?—आहे काय भानगड ??"

"भानगड नाही कसली !…" तो मोठ्यानें हसला. "आजपासूनच आठ दिवस रजा घेतलीय् !…जागेची हल्लीं पंचाईत ना ..रहातो पारल्याला; मिळालिय् साधारणशी जागा !—"



"असं ऽ…नि जेवायला ?…" मी चौकसलं…

"माझ्या आईला आणलीय् ना कोकणांतून !" तो अभिमानानें म्हणाला—

"अरे, खरंच !…हं, आईला आणलीस तें ठीक झालं ! पण…" मी मिस्कीलपणें हसून म्हणालों…"आतां बायकोला केव्हां आणणार आहेस ?…कोकणांतून आण,…नाही तर कुठूनही आण ?…पण आतां आण !—"

"तेंच ना, सर !…" तो पुन्हां खूपच लाजला—"तेंच तर सांगायला आलोंय्;…लग्नासाठींच रजा घेतलीय् ही ! परवां संध्याकाळीं, गुरवारीं आहे;…कित्ते भंडारी हॉलमध्यें !…जरूर या हं !—गडबडींत घरीं यायला जमायचं नाही मला; म्हणून इथं आलों मुद्दाम,…शाळेंत !—"

"ओ ऽ हो ऽ ! अभिनंदन…अभिनंदन !—" मी त्याचा हात हातांत धरून हलवला; तेव्हांहि तो खूप लाजला.

मग अगदीं कुजबुजतच मी विचारलं…"कुठली रे मुलगी ?.. "

"कसली सर, आमची गरिबांचीं हीं लग्नं ?…आमच्यासारखेच ते लोक !"…तो सस्मित म्हणाला…"पण समाधान इतकंच, कीं, ती दिसायला नीटस आहे ! नि कोकणांत राहूनही पांच यत्ता शिकलीय् मराठी !—"

"वाः वाः !…छान !—मग तूं शिकवशील कीं तिला, तुझ्या नाइट-स्कुलांत,…पुढें !"…मी केवळ गंमत म्हणून तसला सामान्य शब्दछल केला. "नाही तरी तूं स्वतः नाइटस्कुलांत शिकूनच मॅट्रिक झालास ना ?"

तो मोठ्यानें हसला; त्याच्याबरोबरच मीहि पुन्हां हसलों.

★

पण हसतां हसतां एकदम गंभीर होऊन तो माझ्याकडे पहात म्हणाला—"खरंच, सर !—वर्गांची झाडलोट करत नि दिवसभर नोटिसा फिरवीत वर-खालीं फिरत, मी या आपल्या शाळेंतली शिपाईगिरी करत होतों,…तेव्हां पांच वर्षांपूर्वी, मला इतके बरे दिवस येतील असं स्वप्नही नव्हतं पडलं ! मला नाईटस्कूलनें नि तुमच्यासारख्यांच्या आशीर्वादांनीच तारलं !—गोखल्याचे रस्ते

नाहीं, तरी शिपायाचा निदान कारकून तरी झालों! तेवढंच आपलं कर्ज फिटलं;...नि आतां हा संसार होतोय् !—पुढें काय होईल तें पहायचं..."

" अरे, पुढें काय होणार, वेड्या ? सगळं चांगलंच ! डरना मत ! !..." मी हसून त्याला उत्तेजिलं.

" बरं,...आतां बस इथं !...चहा देतोस की घेतोस ? बोल ? बस ना !—" क्षणभरानें मी आपुलकीनें म्हणालों.

तो पुन्हा एकदम चमकला भोंवतीं पाहून—

" नको सर !—" संकोची स्वरांत हळूंच...

" कां रे ?..." मी जरा गोंधळलों.

" तुमच्या घरचं निराळं !..." तो घुटमळत अस्पष्ट म्हणाला,..." पण या शाळेंत तरी तुमच्या नि साऱ्यांच्या जवळ बसणं जिवावर येतंय् !...तुम्ही नाही...पण दुसरे काय म्हणतील ?—चार वर्षं पंधरारुपड्यांचा शिपाई होतों ना, सर, इथला मी !—"

इतक्यांत, घंटेचा टोला पडला; तो म्हणत होतां तें सत्य होतं ! ..

★

अगदीं सोडवणूक झाल्याच्या चेहऱ्यानें गणपत हसून म्हणाला... "पाहिलंत, सर !—घंटाहि झाली. तुम्हाला वर्ग आतां आहे...मीपण जातों !—उशीर झाला !—चला !—"

तो लगबगीनें जायला दाराकडे वळला; पण मग किंचित् थबकून मागें वळत म्हणाला—" लग्नाला या हं, सर, परवां !...जरूर ! !—"

" हो !—" मी प्रेमानें-कौतुकानें हसून म्हणालों. " त्यावेळीं हा राहिलेला चहा दे मात्र !"

तो हसत हसत निघून गेला; तरी त्याचा तो चेहरा माझ्यापुढें दिसत होता सारखा, किती तरी वेळ !—

आणि पुन्हां वर्गावर जातां जातां, मला एकच विचार भेडावीत होता... "सगळं खरं ! पण तो बसला नाही !—हं, काय माणसाचं मन असतं पहा !—"

१०-६-४४

# 'मार डाला !'— ★ ★ रघुवीर सामंत

## याने ( अमेरिका खंडांतले धंदे ! )

'नालायक माणसाचा पोटाचा उरला सुरला धोपट-धंदा' म्हणून कोणी खंवचटपणें हेटाळणी केली, तरी एकदां शिक्षक झाल्यावर, माणसाला कमीत कमी लायक शिक्षक तर खासच होतां येतं !

एलूएल्. बी.च्या टर्म्स भरतांना, सोयीचं व फायदेशीर होईल म्हणून सहज सुरूं केलेली मास्तरकी ! पण मग ती कायमची अंगवळणीं पडत जाऊनहि, आपल्याला पहिलीं दोन चार वर्षं ती आपलीशी वाटत नाहीं !—

त्या काळांत, माणसाचं शरीर शाळेंत नि मन साऱ्या जगभर भटकतं...

पण पहिल्या कांहीं वर्ग-प्रवेशांवेळचा 'नर्व्हस'पणा पुढें तितक्याच प्रमाणांत टिकून रहात नाहीं !—'मी ती दुसरी नोकरी पत्करली असती, तर—' असली काल्पनिक कोष्टकं मनाशीं पुटपुटण्याचं, तो आपल्या आयुष्याच्या उत्तर काळासाठीं राखून ठेवतो. अफू खाणाऱ्याला हळूंहळू अफू पचते; अफू हेंच आपलं अन्न असं वाटतं !—तसं 'शिक्षकाचं पवित्र कार्य करण्यासाठींच आपण जन्माला आलों आहों,' असं त्याला वाटतं. चालू गरजांतून मोठ्या अहमहकेनें तो वाट काढूं लागतो !—नि हळूहळू त्या चिमुकल्या जगाच्या देव्हाऱ्यांत, खूप आरास केलेल्या गणपतीप्रमाणें त्याची स्थापना होते !

अर्थात् मग धंद्याचं सारं गुपितहि त्याला करतलामलकवत् होतं ! !—

★

जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव, स्वतःच्याच आयुष्यांत एकदां असा येऊन चुकल्यावर, जिवंत वाङ्मयाचा एकमेव आधार जी भाषा,...तिच्या व्याकरणाच्या शुद्ध पायांचं महत्व त्याला पटतं. पृथःकरण तर, वाक्य तयार

होण्यापूर्वीच, तो करूं लागतो !...पुरुषालाहि शोभायमान करणारे ‘ अलंकार ’ असतात, हें तो आपल्या बोलण्यानें दाखवतो !—तेवढ्यासाठीं–मॅक्मॉर्डी, नेस्फिल्ड, स्पाईट,...यांच्याशीं जानीदोस्तीच्या दिलखुलास गप्पागोष्टी होणाऱ्या बैठकी होतात त्याच्या रोज !—आणि मग त्याचं बोलणं, वागणं...फार काय... त्याची पावलंहि,...त्या खटक्यांत,...त्या तालावर पडतात !—

इकडं वर्गांत शांतता रहावी, म्हणून तो क्वचित् डोळे वटारतो; पण नेहमीं मात्र ‘ विनोदी ’ होतो !—समयसूचकता, प्रसंगावधान, चौफेर निरीक्षण स्वतः विचार करण्याची शक्ति, इत्यादि आवश्यक गोष्टींची मुलांमध्यें जोपासना व्हावी, या सद्हेतूनें तो स्वतः ‘ ज्योक बुक, ’ ‘ ऑम्निबस टिट्बिट व्हॉल्युम, ’ ‘ गोस्ट स्टोरीज, ’ ‘ बुक ऑफ नॉलेज ’ इत्यादींचं पुनः पुन्हा पारायण करतो. आणि त्या पारायणांतहि, प्रत्येक वेळीं, अगदीं नव्या पुस्तकाप्रमाणें तो रंगून जातो ! मुलांच्या वह्या तपासतां तपासतां आपलं इंग्रजी बिघडूं नये, म्हणून, ( प्रत्यक्षच काय, पण—) स्वप्नांत अडलेला शब्दहि, दचकून जागा होऊन, तो व्युत्पत्तिसह,...उशाला घेतलेल्या वेब्स्टरच्या कोशांत पहातो !—बोलून–चालून परकी भाषा, तिचं अद्यतन ज्ञान असावं, असलेलं गंजूं नये, असेल त्यांत भर पडावी, म्हणून, सगळा,...‘ टाइम्स, ’...सुरवातीपासून शेवटपर्यंत, अगदीं जाहिरातीसकट, तो नित्य नेमानें वाचतो !

आणि मग, हा सारा कार्यक्रम,...महिन्यामागून महिने,...वर्षांमागून वर्षं, अव्याहत चालूं राहिल्यावरहि तो एक लायक शिक्षक झाला नाहीं, तर मग त्यानें बिचाऱ्यानें दुसरं व्हावं तरी काय ?—

★

सातवीच्या ‘ अ ’ वर्गाला इंग्रजी शिकवण्याचं, एके काळचं दूरचं गोड सुखस्वप्न, हां हां म्हणतां, त्याच्या आयुष्यांतली एक प्रत्यक्ष गोष्ट होऊन बसते ! आणि तो पहिल्या चार यत्तांच्या शिक्षकांकडे व आपल्यामागून नवीन भरती झालेल्या साऱ्या ‘ कच्च्या मडक्यां ’कडे, ( जणूं काय, जरा खालींच वांकून ) बाळगोपाळांच्या कौतुकानें पाहूं लागतो ! आपल्या शाळेच्या चार भिंतींच्या—



निरुंद तटांतून विनाकारण तुंबून वहात असलेल्या आपल्या ज्ञानगंगेच्या प्रवाहाला, सर्वांपर्यंत दशदिशांना पोहोंचवण्याच्या सदिच्छेनें, ‘ गाइड ’ रूपानें लहान लहान तोंडं फोडल्यावांचून, त्याच्यानें राहवत नाहीं !—शिष्यांच्या चांचपणीच्या कामीं, वाऱ्याच्या फुंकरींत सुद्धां धरणीकंपाच्या जोरानें गदगदा हलणारा, त्याचा तांबडा तराजू, शेवटीं, अगदीं सुप्रसिद्ध होतो, व त्यावर विश्वविद्यालयाच्या मान्यतेचाहि शिक्कामोर्तब बसतो !—आणि मॅट्रिकच्या लॉटरींत यशस्वी नंबर उचलण्याच, ( पूर्वकाळचं निष्पाप बालमनाचं, पण चालू यांत्रिक युगाला अनुसरून यांत्रिक झालेलं ) निःपक्षपाती काम, एकदाचं त्या तत्पर माणसाच्या हातीं येतं !—

त्याच्या आयुष्याचं असं अगदीं ‘ चीज ’ होतं, म्हणा ना !—

★

आमच्या मधुकर–सरचंहि सारं कांहीं अगदीं अस्सेच झालं होतं !

ते गेलीं सातआठ वर्षं तर सातवीच्या अ–वर्गाचे वर्गशिक्षकच होते !—नाहीं म्हटलं, तरी निरनिराळे विषय मिळून त्यांच्या नांवावर दीड दोन डझनांहून अधिक ‘ ॲट ए ग्लान्स ’, ‘ इन् ए नट् शेल ’ वगैरे मार्गदर्शक प्रसिद्ध झाले होते. परीक्षकीच्या दोन विषयांच्या चार चार पाळ्या होऊन गेल्या होत्या त्यांच्या !—शाळेच्या छोट्या जगांत लाभण्यासारखा बहुतेक सारा मान तर त्यांच्या पदरांत केव्हांच पडला होता; आणि त्यांच्या हाताखालून शिकून गेलेल्या कित्येक शिष्यवरानीं आपल्या हजारपट श्रेष्ठ हुद्यानें, संपत्तीनें, सुखी संसारानें, ‘ शिष्यादिच्छेत् ’ कोटींतला मोठा ‘ पराजय–गौरव ’ केला होता त्यांचा !

आणि तेही या आपल्या गौरवाची मोकळ्या मनानें परतफेड करीत !—

कधीं रस्त्यांत भेट झाल्यावर, थबकून, एखाद्या जुन्या विद्यार्थ्यानें त्यांना नमस्कार केला, तर त्याच्याशीं आस्थेनें बोलतांना, तो शाळेंत असल्याचं साल, याचा त्या वेळचा पोषाख, त्याच्या खोड्या अगर हुशारी यांचे प्रसंग, यांचं

आपले मास्तर सूक्ष्म वर्णन करत असलेले पाहून, तो तर अगदीं गारच पडे !—

पण मधुकरसरनां आपल्या असल्या अस्खलित स्मरणशक्तीचा तसाच मोठा अभिमान वाटे !...

★

प्रिलीम झालेली-वह्या तपासायच्या नसल्यामुळें, पुन्हां पुन्हां तांबडी पेन्सिल तासायची तात्पुरती तरी बंद झालेली;...कँडिडेट क्लास नाहीं, म्हणजे ओघानेंच 'ऑफ' पीरिअड वाढलेले;...आणि त्यांतून तेहि आज शेवटचे दोन आलेले ! बरं, पुन्हां, न आलेल्या मास्तरांच्या वाट्याचे तास घेण्याची म्हारकी वाटणारं ( हेडमास्तरी ) 'बुलटिन'हि वरून आलं नव्हतं आज...

मोठ्या आनंदानें, हेडमास्तरांना सांगून मास्तर शाळेबाहेर पडले—.

इतर सगळे मास्तर शाळेंत, शाळा चांगली बरी सुरळीत चालूं, आपण त्या दिवशीं हजर असल्याच्या पुराव्याची आपली अगदीं स्वाक्षरीहि हजेरी-पटावर !...

आणि तरीहि, आपण असे एकटेच, ( अगदीं चकचकित उन्हानें भरलेल्या रस्त्यानें ) घराकडे परतत आहों ! या जाणीवेनें, आतां हळूहळू म्हातान्या होऊं लागलेल्या त्यांच्या मनांतूनहि एक गोड शिरशिरी निघून गेली.

अगदीं अभावितपणें आपल्याशींच ओझरतं हसले ते !—कांहीं कारण नसतां त्यांच्या हातांची हालचाल झाली;...थोड्या जाड भिगांचा आपला चष्मा त्यांनीं हातांत काढून घेतश व धोतराच्या सोग्यानें तो पुसतपुसत ते आपल्या अधू दृष्टीनें चौफेर उगीचच पाहूं लागले.

आणि तसं चौफेर पहातां पहातां, त्यांनीं आपल्या श्मश्रू केलेल्या ओठांचा चंबू केला; नि हळूंच जरा रंगेल वृत्तीनें शीळ घातली—" श श श श, श्या ऽ शी शाऽश् ?"

★



पुन्हा चष्मा डोळ्याला लावून, ते त्याच आनंदी समाधानी वृत्तीनें, उजवं वळण घेणार, तोंच-त्यांना काटकोन करून समोर पसरलेल्या मोठ्या रस्त्यानें, एक अगदीं सुंदरशी छोटी मोटार पुढें उजव्या बाजूस गेली—

आणि त्याच वेळीं त्यांना एक अनपेक्षित धांवती हाक ऐकूं आली—" मधुकर स ऽ र !—मधुक ऽ र सर !—"

'कोणी आपल्याला बोलावीत तर नाहीं आहे ना ?' अशा संशयी कावऱ्या बावऱ्या नजरेनें मास्तर इकडे तिकडे पहात आहेत, तोंच ती कोरी मोटर, ब्रेकचा अगदीं सूक्ष्म आवाज करीत, पंधरा वीस पावलांवर थांबली.

जमिनीला जवळ जवळ लागणारा तिचा एका बाजूचा सलग दरवाजा उघडला गेला व सुमारें पस्तीशी आंतबाहेरचा एक अपटुडेट प्रौढ मनुष्य, रस्त्यावर पाय टाकून उभा रहात म्हणाला, " कुठं चाललांत मधुकरसर ? या, बसा ना आंत !—"

क्षणभरच मास्तर चपापले. पण मग मोटारीजवळ पोंचतांच ते हंसून म्हणाले, " हल्लो ऽ ! इफ् आय् मिस्टेक् नॉट्—व्ही. जी. वाघमारे !—अं ऽ ??"

" कमाल, सर, तुमची !—अगदीं एनीशल्ससकट बरोबर !!—". तोहि हसून त्यांचा हात हलवीत म्हणाला, " बरं, चला सर !—फार दिवसांनीं भेटलांत-माझ्या मोटारींतून घरीं सोडतों तुमच्या—"

त्यामुळें तर मास्तरांचं हृदय बघतां बघतां एकदम भरून आलं.

★

दाराचा खाडकन् आवाज होऊन मोटर सुरू झाल्यावर, त्यांनीं आंत चौफेर नजर फिरविली...

वाघमाऱ्याच्या शेजारीं, दोन अडीच वर्षांची एक झबल्यांतली मुलगी, मास्तरांच्या अगदीं शेजारीं नऊ दहा वर्षांची चुणचुणीत फ्रॉकवाली पोरगी—

तेवढ्यांत, मोटारचा वेग किंचित् कमी करीत, वाघमारे मागें वळून म्हणाला,—" स ऽ र—फारा वर्षांनीं भेटतांहां !—त्यामुळें मिसेस वाघमारे

पहाण्यापूर्वीच सारं वाघमारे-कुटुंब दिसतंय् तुम्हाला !—मधली स्टेप टाकून तुम्ही फळ्यावर आल्जेब्राचा फॅक्टर सोडवायचेय् !...तें आम्हाला—निदान मला तरी-समजत नसे !—पण तुम्हाला म्हणा संवय आहे त्याची; तेव्हां –"

"सो धिस् शाय् लास् इज मिस वाघमारे ! अँ ऽ ? ?" मास्तर आपल्या जवळच्या मुलीला लाडानें आपल्या अधिक जवळ घेत-हसून हेल काढीत पुढें म्हणाले, "वाऽ गऽ वाघमारे !—"

मास्तर हंसले व त्यांच्याच बरोबर वाघमारेहि चमकून हसूं लागला; मग हसतां हसतां तो म्हणाला, "या वामन गणेश वाघमारेला शाळेंत नेहमीं हांक मारत होतां, 'वा ऽ ग ऽ वाघमारे' म्हणून, हेल काढून, तुम्ही !—पण तें, अगदीं वीस वर्षांनंतर, त्याच्या मुलीलाहि तसंच हेल काढून, हांक मारीपर्यंत विसरलां नाहींत, सर !—अगदीं कमाल तुमची !—"

मास्तरांना मूठभर मांस चढल्यासारखं वाटलं !—

★

पण हा वाघमारे तर त्यांच्या वर्गांतला अल्य व यथातथाच मुलगा !—हुशार मुलांच्या पुढील आयुष्याची व मागील इतिहासाची मास्तरांकडे अगदीं सनावळीसह वित्तंबातमी मिळाली असती कोणालाहि, पाहिजे तर !—

मग त्यानंतर मधल्या कालखंडांतील त्यांच्या बऱ्याच गप्पा गोष्टी झाल्या.

मॅट्रिकनंतर, वाघमारे आफ्रिका वगैरे ठिकाणीं फिरून, आतां एका मोठ्या अमेरिकन कंपनीचा चांगला पगारदार फिरता एजंट झाला होता; कंपनीच्या मोटारींतून,...कंपनीच्याच पेट्रोलवर,... साऱ्या हिंदुस्थानभर फिरत होता, संध्याकाळीं आपली बायको पुन्हां कल्याणला वाट पाहील, म्हणूनही सांगत होता शेवटीं !—मास्तरांना त्याच्या त्या घाईघाईच्या साऱ्या बडबडीनें अगदीं गुदमरल्यासारखं वाटत होतं.

त्यांच्याकडून पूर्वी महिन्यांमागून महिने, 'पुअर' असा शेरा घेणाऱ्या वाघमारेचं, चालूं घडीचं तें वैभव पाहून, मास्तरांना मनांत वाटलं, "त्याच्या-बद्दलचं आपलं भविष्य सारंच्या सारंच चुकलं कीं !"



आणि याच प्रसंगाच्या ठिणगीनें त्यांच्या आयुष्यांत आज एक भयंकर ललललता वणवा पेटला ! !—

★

वाघमारेच्या श्रीमंतीबद्दलच्या पहिल्या कौतुकाच्या भावना, ते आपल्या घरीं इझीचेअरवर ऐसपैस पडल्यावर, हळूहळूं विरल होऊं लागल्या.

आणि मग नकळच, मधां शाळेंतून बाहेर पडल्यावर, शिळेंत बेफिकीर रंगेलपणें 'कशाला उद्याची बात ?' म्हणणाऱ्या मास्तरांचं मन, प्रथम तुलनात्मकपणें, त्यानंतर किंचित् मत्सरबुद्धीनें व शेवटीं तर स्वत:बद्दच्या भयंकर हेटाळणीनें, आपल्या साऱ्या गतायुष्याकडे पाहूं लागलं.

"निपाणीकर, गुळगुळे, वाघमारे;...म्हणजे वाघमारेची ही चौथी बॅच आपली !...काय ?...कमालच आहे ! आपल्या मास्तरकीच्या आयुष्याची जवळ जवळ पंचवीस वर्षं संपत आलीं कीं !...म्हणजे ?—हो, आपली सिल्व्हर ज्युबिलीच कीं ही !..'

शब्दांची चिरफाड करणारं व शब्दांत गुणगारं मास्तरांचं मन, सिल्व्हर ज्युबिलींतील 'सिल्व्हर' वर थबकलं !—तें खिन्नपणें एकदां हंसले !—

आणि मग—वाघमाऱ्याच्या मोटारींतच अजूनहि मनानें बसलेल्या मास्तरांना आठवलं—"सुरवातीला आपल्या जीविताची मोटर पन्नासाच्या फर्स्ट गिअरमध्यें धूर सोडीत घुटमळत होती ! ती एस्टीसीचा क्लच लावल्यावर शंभरापर्यंत वर गेली. मग इतरांच्या आग्रहानेंच आपलं स्थान अढळ करण्या-साठीं, आपण जवळ जवळ दीड हजार रुपये कर्ज काढलं होतं. कर्ज, तीन वर्षं नि निवर झालेली आकलन शक्ती-सारं कांहीं पणाला लावून, (वास्तविक आठ महिन्यांची) बी. टी. पदरांत पाडून घेतली होती; तेव्हां कुठं आपली मोटर-पुन्हां क्लच सुटून—११५–१५० च्या टॉपगिअरमध्यें,...कसला सुद्धां आवाज न करतां,...चालूं झाली !"

पण मध्यें पडलेला तो खड्डा भरून काढण्यास, वाढल्या संसारामुळें,

शाळेबाहेर चार शिकवण्या करूनहि त्यांना चार वर्षे कमीच पडलीं होतीं. आणि पुढें त्या शिकवण्या आंगवळणीं पडल्या होत्या !—त्यांत मग परीक्षक म्हणून वार्षिक प्राप्ति, गाइडांची चिरीमिरी,...इ., इ., इ...

"पण हें सारंच्या सारं आमच्या बाघमान्याच्या मोटारींतल्या पेट्रोललाहि चटणीसारखं पुरेल !—काय ?—आपल्या आयुष्याची एकंदरींत फलश्रुति काय, मधुकर ?—"

मधां शाळेंतून बाहेर पडल्यावेळचं त्यांचं निरागस समाधान, आतां पूर्ण मावळलं; नि मास्तर आज एकाएकीं आपल्या आयुष्याचं सिंहावलोकन करूं लागले !...कठोर मनानें त्याचा आढावा घेऊं लागले !

★

"काय हो ? आपण असं मिळवलंत काय, आयुष्यांत आपल्या ?—हो, या आपल्या 'सिल्व्हर ज्युबिली'च्या प्रसंगीं, आपल्या तिजोरींत सिल्व्हर बार किती आहेत ? तें आधीं सांगा तुम्ही, मधुकरसर ?" मास्तरांनीं आपल्या मनाला चिडखोरपणें रोखठोकच सवाल केला, शेवटीं !—

पण पुन्हा किंचित् दुबळं झालेलं त्यांचं मन त्यांचा कड घेऊन म्हणूं लागलं—"छे: ! या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं !—शिक्षकाचा पेशाच मुळीं स्वार्थत्यागी ! पुन्हां-असं;...उत्पन्नाबरोबर खर्च वाढत गेला;...संसार वाढला;...मुलं वाढलीं !—नि हिंदी शिक्षक म्हणजे काय ?—मृदुंग !—सर्वांनीं दोन्ही बाजूंनीं थापा माराव्यात विचाऱ्याला !..."

मास्तरांच्या डोळ्यापुढें काजवे चमकल्यासारखं होत होतं—त्यांच्या मनांत येत होतं -- "आमच्या मास्तर लोकांइतका खर्च जगांत कोणाला नसेल ! कां ? अहो, तो मरेपर्यंत,...जन्मभर,...जिवंत असावा लागतो ना !—म्हणजे असं, मुलांकडून चेष्टा होऊं नये, म्हणून पोषाखांतली टापटीप;...शिक्षणाचं महत्व जास्तींत जास्त त्याला समजायचं,...तेव्हां स्वतःच्या मुलांमुलींचं तीं निदान पदवीधर होईपर्यंत तरी शिक्षण हवं !...ही झालीं आपलीं मुलं !—आणि



दुसरीं ? तींहि आपलींच ना ?—कारण, गरीब विद्यार्थ्यांना तर सहाय्य केलंच पाहिजे ?—बरं, शाळेतले शिपाई !...कोणाचं लग्न...कोणाची गरज... दिवाळी–शिमगा पोस्त...! मुलांचीं संमेलनं,–शाळेच्या ट्रिपा...इतर संस्थांची वर्गणी ! प्रॉव्हिडंट फंड ! हो, आणखी आयुष्यांत भरलेले धोके ओलांडण्यासाठीं, ठरवलेले निदान चार हजार विम्याचे वार्षिक हत्ते भरायचे ! !—झालं ?—मग आतां पैसा रहाणार कुठून ?...शिल्लक शिल्लक म्हणजे काय ?...पैशाचीं झाडं असतात कीं काय जगांत ? ?—"

त्याच कांहींशा वैतागांत त्यांनीं आपल्या टेबलाच्या ड्रॉवरमधून हिशेबाचीं टिपणं येण्यादेण्यांच्या नोंदी, सारं बाहेर काढलं !...गाइड-पुस्तकांच्या उरल्या स्टॉकची ५० टक्के आगाऊ किंमत नि अगदीं या महिनाअखेर यायचे शिकवण्यांचे पैसेहि जमेस धरले;...देण्यांचाहि तपशील फार काटेकोर शोधला—

जवळ जवळ तासभर ते आंकडे मोड करीत होते !—शेवटीं...

सर्व रकमा वसूल झाल्या, तर कर्ज फिटून शिल्लक उरत असल्याचं दिसत होतं ! "कोणाचं देणं नाही आपल्याला ?" या विचारानें सुटकेचा निश्वास टाकून व खुर्चीवर मागें क्षणभर रेलून त्यांनी दोन बाजूंच्या बेरजांची बजाबाकी केली,...शेवटीं; आणि...

अरेच्चा ! विश्वासच बसेना आपल्या डोळ्यावर त्यांचा...

'हाचा धरण्या-सोडण्यांत तर चूक झाली असेल ना आपली ?'...त्यांनीं पुन्हां सव्यापसव्य केलं !

पण तरी तेंच...पुन्हां पुन्हां तोच आंकडा..."शिल्लक; २ रु.—१२ आ ६ पै."

किती ?—२-१२-६ !...काय ?...२-१२-६ !!...हो, नक्की !...

२-१२-६ !!

★

आतां या शिलकेवरच त्यांना उर्वरित आयुष्याची गुजराण करायची होती असं नव्हे !—. विम्याचं एक वेळ सोडा ! ) प्रॉव्हिडंट फंड तर होता थोडा !—पण तो बायकोचा, ही त्यांची प्रामाणिक कल्पना ! मुलं शिकलीं होतीं. एकाला चांगली नोकरी लागली होती नुकतीच;—दुसरेहि हळूं हळूं मिळवूं लागतील, अशी आशा होती त्यांच्या मनाला !—

“ त्यांना आपण वाढवलं-शिकवलं; म्हणजेच एकप्रकारें पैसा रुजत घातला आपण, तरुणपणीं !—तीं कृतज्ञ आहेत...आपल्या संसाराबरोबर आपल्याहि म्हाताऱ्या संसाराचा भार आतां उचलतील !!—हें आहे सारं खरं;... तरी पण,...म्हणजे शेवटीं, आपण दुसऱ्यांवरच अवलंबून रहाणार कीं, आपल्या आयुष्या शेवटीं...”

आणि म्हणूनच, तसा विचार करतां, करतां, ‘ घटका गेली, पळें गेलीं ’ असा एक न्यारा चमत्कारिक ध्यास त्यांच्या मनाला लागला !...नोकरीचीं व कांहीं तरी उरलं सुरलं कर्तृत्व करण्याचीं त्या पुढलीं अवघीं पांच वर्षं, त्यांच्यापुढें, ( दोस्त राष्ट्रांच्या युद्धप्रचारांतील जाहिरातीप्रमाणें ) एकापुढें एक मोठीं मोठीं होत उभीं राहिलीं !—

★

ती रात्र व पुढला सारा दिवस त्यांच्या इवल्याशा डोक्यांत एक भयंकर विचार-चक्र घडघडत होतं !—वर्गांत शिकवण्याकडे त्यांचं किंचितहि लक्ष नव्हतं;...मुलांना कांहीं तरी लिहायला देऊन, ते आपल्याच मनांत पुन्हां पुन्हां डोकावत होते...

सारखा विचार-विचार-विचार...

त्यांच्या साऱ्या आयुष्यांत पैशाबद्दलची ओढ, त्यांच्या मनांत इतक्या जोरानें कधींच थैमान घालून गेली नव्हती—

बायमारेची मोटर...हॉटेलमध्यें त्यानें काढलेल्या आपल्या लठ्ठ पाकीटांतील नोटा,... आपल्या बायकोसाठीं त्यानें आस्थेनें घेतलेले कांहीं खऱ्या



मोत्याचे दागिने...नव्या स्टाइलचीं वाइलचीं पातळं,...साऱ्या गोष्टी तुटक तुटकपणें, त्यांच्या कल्पनेंतील मोटारीच्या ( फाटक्या टायरवाल्या ) चाकांभोंवतीं लडबडत— फिरत असल्याचा, त्यांना सारखा भास होत होता !...

‘ अजूनहि आपल्याला नव्यानें आयुष्य जगतां येईल का ?—पैसा मिळवतां येईल ? ?—हो ! कां येऊं नये ?’...त्यांना वाटलं—‘ पहा म्हणजे दिसेल; शोधा म्हणजे सांपडेल;...ठोठावा म्हणजे उघडेल !!’—

खरं म्हणजे, तशी पैशाची त्यांना आयुष्यांत कधींच किंमत वाटली नव्हती विशेष ! पैशापेक्षांहि जास्त महत्त्वाच्या मूल्यवान वस्तू जगांत आहेत, असतात हें त्यांना पूर्णपणें पटलं होतं !—

पण तरी—आजचे मधुकर-सर निराळे होते;...आज त्यांना उरल्या पांच वर्षांची कांहीं भरीव आर्थिक योजना आंखायची होती !—त्यांना खरेखुरे पैसे मिळवण्याची व पुन्हां ते झटपट कसे मिळतील हें जाणण्याचीच मुख्यतः तीव्र इच्छा झाली होती !—

त्यामुळेंच आज विचार करून करून त्यांना अगदीं वेडे होण्याची पाळी आली होती—

“ बाबमारेनें वाघाची शिकार केली,...आपल्या आयुष्यांत !—तें सोडून द्या;...पण मग आपल्या हातीं, प्रयत्न केल्यास, उरल्या, हातून निसटल्या काळांत, कोल्हा तरी लागायला काय हरकत आहे ?—” त्यांना आपल्या त्रस्त मनाला तें कांहीं केल्या पटवून देतां येत नव्हतं !—

खोलींतल्या खोलींत विड्या फुंकत त्यांच्या सारख्या येरझारा चालल्या होत्या !—

★

याच कायम ठाणं देऊन बसलेल्या भयंकर त्रस्त मनःस्थितींत, दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं, सारे मास्तर निघून गेल्यावर, ते शाळेंतून बाहेर पडले.

आजहि ते त्याच रस्त्यानें एकटेच जात होते,...पण आजचे मधुकर मास्तर कालच्या मधुकर मास्तरांहून जमीन अस्मानाइतके दूर होते !—

काल ज्या ठिकाणीं त्यांनीं 'कशाला उद्याची बात ?' म्हणून रंगात येऊन शीळ घातली होती, तिथेंच, त्यांनी आज खालीं पायाखालीं पहात, एक दीर्घ निश्वास टाकला...

आणि काल आपण बावमारेच्या मोटारींत बसलों, ती जागाहि आपल्य दृष्टीस पडूं नये, म्हणून ते मुद्दाम डाव्या बाजूस वळले.

सुन्न मन जरा ताळ्यावर आणण्यासाठीं त्यांनीं खिशांतून 'पिवळा धागा' काढून शिलगावली ! अंगांत नवा उत्साह यावा, विचारांना नवी कलाटणी मिळावी, म्हणून, इच्छा नसताना, झपझप पावलं टाकायलाहि सुरवात केली त्यांनी...

पण कित्येक पुस्तकं वाचलेल्या त्या सदा आसुसलेल्या जीवाला, तेवढ्यांतच, समोर थबकण्याइतकं जोरदार कारण झालं एक—

—समोर एका बुकडेपोची कांचेरी बुककेस होती. तींत रंगीबेरंगी कव्हरांचीं...जाड नि पातळ पुस्तकं आडवीं उभीं अगदीं आकर्षकपणं मांडलेलीं दिसत होतीं—

बिडीचा शेवटचा मोठा झुरका मारून व शोकेसपुढें उभे राहून, ते आपल्या चाळशींतून समोर पाहूं लागले.

त्यांतलीं कित्येक पुस्तकं त्यांनी पूर्वीं चाळलीं होतीं;...कित्येक, एकदांच नव्हे तर, दोनदां वाचलीं होतीं;...आणि कित्येक—

अरे, पण हें काय ? त्याचा आपल्या डोळ्यावर मुळीं विश्वासच बसेना !—त्यांनी फिरून एकदां पाहिलं;...पण तेंच !—पुन्हां एकदां डोळे चोळून वाचलं त्यांनीं ! तरी अगदीं तेंच ! ! तींच मोठीं अक्षरं !—हो ! पिवळ्या पुठ्ठ्यावर तींच तांबडीं मोठीं अक्षरं होती—"थिंक् ॲन्ड ग्रो रिच" —काय ?—'**थिंक् ॲन्ड् ग्रो रिच ! !**'

★

केवढा गोड धक्का बसला त्यांच्या आतांपर्यंतच्या त्रस्त मनाला !

ते स्मित करून स्वतःला म्हणाले—"मधुकर, जस्ट **थिंक् ॲन्ड् ग्रो रिच !**"



एखाद्याला भेटण्याचा अटोकाट प्रयत्न करावा;...तसा अनेकदां प्रयत्न करून, शेवटीं निराश होऊन आपण घरीं परतावं; ..आणि कोटटोपी काढून कोपऱ्याकडे वळून पहावं, तर तोच प्राणी खुर्चीवर हसतमुख बसलेला !— किती हर्ष होईल आपल्या मनाला ?—

अगदीं तस्संच मधुकर-मास्तरनां वाटलं !...जणूं...ईश्वरानेंच आपल्या-साठीं हा दूत पाठवला, असा विचार त्यांच्या मनांत पटकन् तरळून गेला !—

क्षणभरहि विचार न करतां, ते बुकडेपोंत शिरले.

त्यांनीं तें पुस्तक मागवून प्रथम हातीं घेतलं; नि जवळ जवळ अडखळतच पटकन् विचारलं, "किंमत हो काय त्याची ?—"

—"फार नाही ! अडीच रुपये !"

तेव्हां पुढें एक शब्दहि न विचारतां, त्यांनी खिशांतून अडीच रुपये काढून काऊंटरवर ठेवले व पुस्तक घेऊन ते झपझप पायऱ्या उतरून पुन्ह रस्त्यावर आले !

'थिंक् ... ॲन्ड् ग्रो रिच !' ते पुन्हा स्वतःशींच मोठ्यानें पुटपुटले.

'इलेक्ट्रॉन पिल्स' घेतल्याप्रमाणें त्यांना त्यावेळीं वाटत होतं !—

त्या नव्या पंखांवर जवळ जवळ उडतच मास्तर बुकडेपोतून बाहेर आले !...

दोन दिवस पडलेल्या श्रीमंतीच्या कोड्याचं उत्तर एकाएकीं हातीं पडल्यासारखं वाटत होतं त्यांना त्यावेळीं.

★

वडिलांच्या तिजोरीतील चोरकप्प्याची इतके दिवस हाताला न लागणारी कळ, सहज साफसूफ करतांना एकदम दाबली जावी; तो पटकन् उघडलेला समोर दिसावा; नि त्यांतलीं नोटांचीं भेंडोळीं पुढ्यांत उघडीं पडावीत !... किती आनंद वाटेल माणसाला ?...

तस्संच झालं मधुकरसरांच्या मनाचं, त्या क्षणीं ...

पुढारलेल्या अमेरिका खंडाबद्दल त्यांना नेहमींच आदर वाटे !..." तें जगांतलं श्रीमंतांत श्रीमंत राष्ट्र !...लोकशाही तिथं पाणी भरते !...त्यांचे हजारों धंदे !...' थिंक्,...अँड ग्रो रिच् !...' घ्या !—पाहिला ? आपले गुरु होण्याची लायकीच आहे वेस्यांचीं !...केवढे चाणाक्ष नि उदार,...बेटे !...आपल्या मनाला त्या कल्पनेचा स्पर्श देखील होण्यापूर्वी त्या विषयावर यांचं स्वस्त किंमतीचं एक पुस्तकही छापून तयार !...आहेत कीं नाहीं 'धंदेवाईक' मंडळी !...कशातूनहि धंदा नि शास्त्र तयार करतात !!—"

वास्तविक, तसे अडीच रुपये एकदम खर्चणं मास्तरांच्या नेहमीच्या हिशेबी वृत्तीला मुळींच धरून नव्हतं !...पण आजचे हे अडीच रुपये म्हणजे एक किफायतशीर 'इन्व्हेस्टमेन्ट'च वाटली त्यांना !—

आणि अंगांत नव्यानें शिरलेल्या त्याच थोड्या धाडशी धंदेवाईक वृत्तीनें, मास्तर शेजारच्या इराण्याच्या पायऱ्या चढले; नि हिशेबानें निघणाऱ्या शिलकेंतले उरलेले साडेचार आणेहि काऊंटरवर टाकून, ते जवळ जवळ ओरडलेच...'' कॅप्स्टन् पॅकेट देव, बस्स, एकदम !—"

'वेडा बिडा तर नाही ना हा प्राणी ?' अशा नजरेनें त्यांच्याकडे पहात त्या इराण्यानें पाकीट पुढें केलं; पण जग जिंकत आलेल्या शिकंदराच्या दृष्टीनें–ऐटीनें ( अगदीं 'किस् चिडिये' प्रमाणें ) इराण्याकडे उलटून पहात, मास्तर पाकिटांतील सिगारेट काढून तोंडांत धरीत पायऱ्या उतरले व घराकडे चालूंहि लागले.

सिग्रेटचा धूर मनमुराद सोडीत रस्त्यांतून चालतांना, खाकेंतील त्या बंद पुस्तकाची सोनेरी–रुपेरी ऊब, त्या जवळपासच्या मास्तरांच्या हृदयाला अगदीं भरपूर मिळत होती !...

कारण, नाहीतर पिवळ्या धाग्याच्या विड्याहि नेहमी मोजून ओढणाऱ्या मास्तरांच्या हातून, घर गांठेपर्यंत त्या तंद्रीत दोन सिगारेटस् कधींच फस्त झाल्या नसत्या !

★



जवळ जवळ ठेंचकळतच मास्तर आपल्या घरांत शिरले !—

लावलेल्या डर्बी लॉटरीचा निकाल तारेनें यावा; ती अगदीं हातांत पडलेली असावी—पण मग ती उघडून वाचण्याचीच तेवढी गोड अळंटळं करणाऱ्या माणसाप्रमाणें मास्तरांच्या मनाचा गोंधळ झाला होता.

मास्तर ईझीचेअरवर ऐसपैस बसले होते; गुदगुल्या होणाऱ्या हृदयाला दडपून एकीकडे त्या बंद पुस्तकाकडे आशाळभूतपणें पहात, दुसरीकडे त्यांचं जोरजोरानें धूम्र-पान चाललं होतं !—

सिग्रेटच्या सांखळीतल्या चौथ्या दुव्याला नवा पांचवा जोडून त्यांनी तो तोंडांत धरला; तोंडावर आलेल्या धुराच्या लोळाचा भपकारा, किलकिले डोळे करून हातानें बाजूस सारल्यासारखा करून, शेवटीं, त्यांनीं तें पुस्तक थरथरत्या हातानें धरून, अगदीं धडधडत्या हृदयानें उघडलं—

पुस्तक व डोळे दोन्ही नीट उघडल्यावर...धुरापलिकडल्या पहिल्या-पानांवरचीं सुरवातीचीं वाक्यं त्यांच्या डोक्यांत एकदम शिरलीं...

"आजच्या अर्थ-युगांत प्रत्येक जण पैशामागें लागतो. पैशानें आपण श्रीमंत व्हावें असं म्हणतो—इच्छितो. योग्यच आहे !—

तरी पण विचार करण्यासारखी पहिली आणि अत्यंत महत्वाची गोष्ट आहे जगांत !...कितो थोडी माणसं जाणतात ती...

कारण, गंमत अशी आहे.—पैशानें श्रीमंत असणं म्हणजेच श्रीमंत असणं नव्हे !...एखादा मनुष्य पैशानें पुरा दरिद्री गरीब असेल;...पण विद्येनें, गुणानें, स्वभावानें..."

मास्तरांचा गिरसप्पा हजारों फुटावरून खालीं कोसळला; त्यांच्यानें पुढें एक अक्षरही वाचवेना...

★

पुस्तक फट्कन् बंद करून, मास्तरांनीं तोंडांत जळणाऱ्या थोटकाचे एकामागून एक तीन चार मोठे झुरके घेतले...

कोणी तरी नाकावर जोराचा ठुक्का मारावा, त्याप्रमाणें मधुकर-सर पुरे भानावर आले;...त्यावेळीं त्यांचा उजवा हात त्यांच्या कपाळावर असल्याचं त्यांना आढळलं.

अगदीं विषण्णपणें निश्वास टाकून ते स्वतःशीचे मोठ्यानें पुटपुटले—"हं...विचार करण्यासारखी पहिली नि महत्वाची गोष्ट दुसरीच आहे जगांत, मधुकर मास्तर!...आणि ती म्हणजे तुझ्या आयुष्यांतलीं गेलीं पंचवीस वर्षं अगदींच पाण्यांत पडलीं!!...हं...इतकीं वर्षं, दिवसानुदिवस, पोरांना अलंकार–वाक्प्रचार–म्हणी नि दगडधोंडे शिकवत आलास तूं!...पण 'श्रीमंत होण्या'लाहि एक लाक्षणिक अर्थ असतो, हें कांहीं लक्षात आलं नाहीं तुझ्या, मधां! त्यामुळें तुझ्या उरल्यासुरल्या तुटपुंज्या भांडवलांतील उरलीसुरली हिशेबी शिल्लक देखील हातोहात गमावून बसलास तूं!..."

★

या विचारानें मास्तर त्या मनःस्थितींतही आपल्याशीच खिन्नपणें हसले.

फक्त एका सिगरेटच्या या टोकापासून त्या टोकापर्यंतच्या अंतरांत, ते अस्मानांतून पुन्हा जमिनीवर आले होते. आतां तोंड भाजायला पुढें सरसावलेल्या सिग्रेटच्या त्या थोटकाला त्यांनीं हाताच्या चिमटींत विंचवाप्रमाणें धरली; हिशेबी वृत्तीनें तिची शेवटचीं आसुरलेलीं चार दोन चुंबनं घेतलीं; नि तिला मिश्र भावनांनीच खिडकीवाटे आपल्या घराबाहेर भिरकावून दिलं.

तरी पण, त्याच वेळीं पुन्हा मधुकरसरमधला पंचवीस वर्षं पक्का मुरलेला 'मॅकमोर्डी मास्तर' खाडकन् जागृत होऊन, ते स्वतःशींच विषण्णपणें म्हणाले—"हं!...थिंक अँड ग्रो रिच्!—बहावारे अमेरिका खंडांतले धंदे!—बहावा रे पुस्तक!..मनाची श्रीमंती आम्हाला शिकवतायत् बेटे!—हं...अगदींच मार डाला!—थिंक अँड् ग्रो रिच्!...ओ ऑथेर...दाउ हास्ट् दन् मी इन्‌ट् आय्!!—"

३. १९४३

---

# ब्रह्मदेवाची 'ए-भो' ★ ★ ★ रघुवीर सामंत

जगाच्या व्यवहारांत योगायोग पुष्कळ सांपडतील; पण अद्भुततामय नि चांगले योगायोग फारच क्वचित्!—

आपल्या स्वाभिमानाला डिवचून गेलेला आपल्या आयुष्यांतील प्रसंग आपल्या स्मरणांत फार काळ टिकतो; त्यांत पुन्हां असा एखादा अपूर्व योगायोग घडून आला नि त्यानेंच परिस्थितीला अनुकूल कलाटणी मिळाली, तर तसल्या प्रसंगाच्या स्मृतीच्या वेळींहि आपल्या अंगावर संमिश्र आनंदाचे रोमांच उभे राहतात.

म्हणूनच तर मला तो प्रसंग...नि तो योगायोग अनेकदां आठवल्यावांचून रहात नाही.

★

हौसेनें सुरुं केलेला धंदा नुकताच बुडालेला असावा; नोकरी मिळालेली नसावी किंवा करायचीच नसावी; पिताजी थोडेफार सधन असले तरी—'चांगली ओळख पटूं दे लेकाला, जगाची!' या सदिच्छेनें—आपल्या बाबतींत बेफिकीर असावेत; आपल्या अपयशानंतर, आपणहून त्यांच्याकडे पैशासाठीं तोंड वेंगाडण्याइतकी, आपल्यातील स्वाभिमानाचीहि साफ हकालपट्टी झालेली नसावी.

अशा तंग परिस्थितींत...आणखी—एकादशीच्या घरीं शिवरात्र म्हणतात ना? तसंच—आपल्या 'ब्रम्हचारी खोली'चा पार्टनर (आपल्या भिडस्त स्वभावाचा फायदा घेऊन) कित्येक महिने आपल्यालाच सारं भाडं भरायला लावीत आलेला असावा; तेवढ्यांतच, आपल्या अंगांत मलेरिया नि औषधांनींच पदरांत इन्जक्शनांचा आगंतुक खर्च येऊन पडावा; तरी पण जीव गेला तरी आपल्या कोणत्याहि आप्त–स्वकीयाला पैशासाठीं

कधीं चांचपायचं नाहीं, असा आपल्या मनाचा निर्धार ठाम ठरलेला असावा...

भर गिरगांव-नाक्यावर पाय घसरून पडलेला सूटबूटवाला, 'कांहींच झालं नाही' अशा तोऱ्यांत उठण्याचा आव आणतो ना?...तेव्हां तो जें एक प्रकारचं चमत्कारिक नि हिरमुसलं हास्य हसण्याचा प्रयत्न करतो, तसल्याच हास्यरेषा आपल्या चेहऱ्यावर उमटतात, अशा परिस्थितींत!—

★

या कळांतला आपला पावला उद्योग म्हणजे आपल्या देण्या-घेण्यांचे (निरर्थक) हिशेब करीत बसणं!—तथापि देण्यांची आणे-पैंची चिंचोळी पण लांब यादी, शेवटीं श्रीमंती थाटांत शेकड्यांच्या घरांत फिरते; उलट, येण्यांची (मोठ्या नोटांची पण छोटी) यादी शेवटीं हजार सबबी-वायदे सांगून, विचारी मान खालीं घालते नि अखेर शून्यांत विलीन होते!—

मग शेवटीं एक दिवस असा उगवतो, कीं जो मावळण्यापूर्वी आपल्या खिशांत फक्त पैसे (नि आणे) खुळखुळूं लागतात. रोज दिवाळी करणाऱ्या मुंबईच्या गजबजल्या रस्त्यांतून जातांना...'आपल्या खिशांत लोक डोकावून तर पहात नाहीं आहेत ना?' अशा मनोमय संशयानें, भोंवतीं कांवरीबावरी नजर फिरवीत, त्यावेळीं, आपण (अगदीं अकारणच) आपलीं पावलं चोरासारखीं झपझप टाकूं लागतों.

पण मग आपल्याला एकदम एक विरोधी बेडरपणाचा झटकाही येतो!..."कांहीं नसण्याच्या इतकं जवळपास अनायासें पोहोचलेलों आहोंतच आपण, तर आतां हें उरलं सुरलं 'असलेलं' लौकर तरी पुरं नाहीसं व्हावं!—', असल्या खर्चिक वृत्तीच्या भुताला आपल्या मनांत स्वैरसंसार करायला आपण चुरशीनें उठवतो.

मग काय?—हां हां म्हणतां त्या कल्पनेला सत्रा तोंडं फुटतात.

...एका तोंडांत दोन पैशाचे चणे...



...दुसऱ्या तोंडांत...नको असला तरी एक आण्याचा चहा,... नि एक आण्याची भजी,...

...तिसऱ्या तोंडांत,...दोन पैशांची गोल्डफ्लेक...नि एक पैशाची सुकाकात-मसाला,...

शेवटीं,...उरलेली दिडकीही श्रीमंती थाटांत समोरच्या भिकाऱ्याला देऊन, आपण स्वतः एकदां भिकारी झालों नि आपला खिसा पुरा रिकामा झाला,...कीं इतका वेळ रस्सीखेंचींत सांपडलेल्या आपल्या मनाला उलट जरा हायसंच वाटतं!—

★

माझ्या खिशातले 'पैसे' खुळखुळवत, आमच्या चाळीच्या जिन्याच्या पायऱ्या उतरतांना,...त्या दिवशीं मी तसाच खिन्नपणें हसलों होतों.

नि रस्त्याच्या गर्दींत शिरतांना कुत्सितपणें स्वतःला म्हणालों होतों—"हं! परताल तेव्हां तुमचा खिसा खालीं होणार, महाशय!...देणं सारंच्या सारं डोळ्यापुढें दिसत आहे. पण येणं कुठलंच नाहीं दिसत समोर! आतां एक ठिकाण आहे फक्त!...खास तुमच्यासाठीं अगदीं ब्रह्मदेवाचीच ए-मो आली तर, स्वर्गांतून!...त्या सर्वसाक्षी प्राण्याला तार पाठवायचीहि गरज नाहीं!... याक्षणीं आपली तेवढा खर्च करायची ताकद नाहीं, हेंहि तो जाणतोय्!"

★

आणि तासभर भिरभिरून, रिकाम्या खिशानें नि भरल्या हृदयानें मी त्याच जिन्याच्या पायऱ्या पुन्हां चढूं लागलों...

तोंच मला वरून आवाज ऐकूं आला..."मघां एकदां येऊन गेलों, साहेब! तुमची खोली बंद होती!—"

'ब्रह्मदेवच बोलतोय् कीं काय हें?' अशा थाटांत मी चमकून वर पाहिलं.

आमचा पोस्टमनच पायऱ्या उतरतां उतरतां, जिन्यावर मध्येंच थांबून, कागद पुढें करत म्हणत होता—'ए-मो आहे, साहेब, तुमची!'...

मी अधिकच सर्द होऊन, चमकून तो फॉर्म हातांत घेतला; नि भांबावल्या विस्मयी स्वरांत प्रश्न केला—' माझी ए-मो ?'—

पण संशयच नव्हता कसला—नांव-पत्ता सर्व माझंच होतं...

तरी पण पैसे माझेच आहेत का नक्की ? . कीं कांहीं चूक होतेय ही ?... एकदम हसूं येऊन मी मनांत हळूंच म्हणालों..." वरं हा पाठवणारा कोण पण ?...ब्रह्मदेव ??..."

पुरी खात्री झाल्यावर पैसे घेतले पैसे घेताना मात्र मनाला वाटलं—' पडत्या काळांत सुद्धां माणसानें वैतागानें धीर सोडून बेपत्ता होऊं नये !... ब्रह्मदेवाला सर्वांची काळजी असते ! मात्र आपला पत्ता तेवढा ठाऊक असला पाहिजे त्याला !'

★

पोस्टमननें दिलेल्या पंचवीस रुपयाच्या नोटा खुषांत खिशांत कोंबल्या; वरचे बारा आणे तो नको म्हणत असतांहि त्याला दिले; नि त्यानें दिलेलं खालचं मजकुराचं दोन-बोटी चिटोरं पाहूं लागलों...

चार वर्षांपूर्वी संबंध येऊन गेलेल्या इंदूरच्या एका न्यूजपेपर एजंट-बुकसेलरला माझी अकस्मात आठवण झाली होती.

नि म्हणूनच ( धूळ खात पडलेल्या, माझ्या खातेवहींत, जगाच्या अतांपर्यंत शिरोभागीं ' बुडित ' शेरा घेऊन पडूं इच्छिणारं ) त्याचं खातं हें असं अचानक माझ्या मुंबईच्या खोलींत खुळखुळलं होतं.

त्यानें बारीक अक्षरांत लिहिलं होतं..." परिस्थिती खालावल्यानंतर मुकाट्यानें मान खालीं घालून बसल्यावाचून इलाज नसतो, माणसाचा ! घरांत आजार, मी आजारी, धंदा बसलेला;...गेली तीन वर्षं कांहींच करूं शकलों नाहीं. आतां देवदयेनें सारं ठीक आहे. आपल्याकडून क्रेडिटवर मिळालेले शेवटच्या चार महिन्यांचे मासिकाचे अंक नि पुस्तकाच्या पंचवीस प्रती त्याच वेळीं खपल्या होत्या. जमाखर्च पाहून माझ्या हिशेबानें निघणारं आपलं



उरलं देणं सोबत पाठवीत आहे. आतां चूकभूल असल्यास विसरावी नि माझं खातं पुरं करून टाकावं. विलंबाबद्दल मात्र मला माफी असावी !"—

वास्तविक, त्याचं खातं मी केव्हांच काढून टाकलं होतं; ती माझी व्यवहारी दृष्टि होती; पण आतां त्याच्या नव्या दैवी दृष्टीनें, तेंच असं पुन्हां बंद करतांना, मला ' त्रिभुवनव्यापी ब्रह्मदेवा'ची आठवण होऊन, त्रिभुवनव्यापी आनंद होत होता !—पैशाचं एक व्यवहारी खातं त्याच्या इच्छेप्रमाणें बंद करतांना, त्याच्या माणुसकीचं नवं खातं उघडण्याची मला तीव्र इच्छा झाली होती. कारण, इतक्या विलंबानें मला मिळत असलेले त्याचे ते पंचवीस रुपये ( नि आणेहि ) त्याक्षणीं, मला पंचवीसशें रुपयांहून भारी नि अधिक वाटत होते !

—मघा जिना उतरतानाची कल्पनेतली ' ब्रह्मदेवी ए-मो ' नि आतां जिना चढतांना प्रत्यक्ष मिळलेली या मानवी ब्रह्मदेवाची खरीखुरी ' ए-मो, ' यांत स्वर्ग नि पृथ्वी इतकं अमाप अंतर होतं !—

माझ्या परिस्थिति-मनःस्थितींतहि त्या ब्रह्मदेवानें जमीन-अस्मानी फरक घडवून आणला होता !—

त्याच नव्या दमानें पुन्हा जिन्याच्या पायऱ्या उतरून मी ताठ मानेनें रस्त्यावरच्या गजबजपुरींत शिरलों; माझ्या मनांतील स्वाभिमान, सहानुभूती, नि कृतज्ञता मला ओरडून-बजावून सांगत होती—" धन्य तो इंदूरचा ब्रह्मदेव ! नि धन्य धन्य मी !!"

१८-२-४५

# मृदुंगी जीवन !— ★ ★ रघुवीर सामंत

एक पत्र्याची हँडबॅग, व दोन छोट्या पिशव्या एवढंच सामान; तरी माझ्या वहिणीला गाडींत बसवून कसं न्यायचं ही मोठी चिंताच वाटत होती मला. कारण मदतीला दोघे स्नेही येणार होते; ते कोठेंच दिसत नव्हते. बी. बी. दादरचा नं. ३ प्लॅटफॉर्म तर मुंग्यांसारखा फुलला होता. मी थोडं भांबावून स्वतःशींच पण वहिणीकडे नि बरोबरच्या भाचीकडे पाहून म्हणालों—"आतां जागा कशी मिळायची बुवा ?—"

"मी देतों कीं साहेब, जागा मिळवून ! " या अनपेक्षित शब्दांनीं चमकून मी बाजूला पाहण्यापूर्वींच त्या धिप्पाड प्राण्यानें माझ्या हातांतील बॅग ओढून घेतली होती; नि त्या दोघींच्या हातांतल्या दोन्ही पिशव्याहि तो ओढूं लागला होता.

"हं...हं...त्या पिशव्या नको घेऊंस." माझ्या गोंधळलेल्या मध्यम वर्गीय मनाला त्याच्या जागेबद्दलच्या आश्वासनानें थोडं हायसं वाटत होतं; तरी पिशव्यांचा हलकेपणा नि व्यवहार मी विसरलों नव्हतों; संशयीपणें मी पुढें म्हणालों..."बरं पण घेणार काय तूं ?—मागून वांधा नको !—हमालाकडे देण्यासारखं हें सामान नाही कांहीं !—"

पिशव्या नि बॅग एका हातांत धरून, दुसरा हात माझ्यासमोर नाचवीत तो आदबीच्या स्वरांत म्हणाला—"ठरवायचं काय त्यांत, शेठ ? तुम्ही काय वावगं द्याल गरिबाला ?—"

★

पण एवढं जेमतेम होतंय् इतक्यांत घंटा झाली; इंजन स्टेशनांत शिरलं,... आणि तेवढ्यांतच आमचे येणारे दोघे स्नेहीहि जिना उतरून धावत आमच्याकडे येत म्हणाले..."चला चला...गाडी आली !...मिळेल जागा तिथें प्रत्येकानें घुसायचं !...आपलंच ना हें सामान ?..."



त्यांच्या येण्यानें आमच्या जिवांत आणखी जीव येतोय्, तेवढ्यांत त्या दोघांनी हमालाकडून दोन्ही पिशव्या ओढून घेतल्या नि एका 'DDR' लेबलवाल्या डब्यावरोबर धांवायलाहि सुरवात केली.

"थांबा हं !..." असं वहिणी-भाचींना म्हणून, मीहि जवळपास जागा पाहूं लागलों. गाडी थांबली; तोबा-गर्दी झाली. पण एक मनुष्य जाणार नि तिथे खटपट करणार, म्हटल्यावर यश नक्की ठरलेंच होतं...

त्यांनी लांबून हात केल्यावर आम्ही तिकडे गेलों. वहिणीला अगदीं खिडकी जवळची जागा मिळाली. बॅगसकट हमाल लांब होता. त्याला शेवटीं हुडकून आमच्या एका स्नेह्यानेंच बॅग डब्यांत ठेवली.

पैसे द्यायला मी हमालाकडे वळणार, तोंच तो जवळच्याच एका हमालाला वरचंसं सामान चढवण्यात मदत करण्यांत गुंतलेला मला दिसला; "मिळवेना बिचारा चार पैसे ! हमाली द्यायची घाई कशाला करा ?" या विचारानें आम्ही थोडा वेळ गप्पा मारीत होतों.

तोंच शिटी होऊन गाडी सुटली; गर्दी ओसरली; नि त्याच वेळीं आलेल्या लोकलमध्यें ठणकन् उडी मारून, आमचे दोघे स्नेहीहि चर्नीरोडच्या मार्गाला लागले.

आतां माझी भाची आणि मी दोघेंच घराकडे वळणार—इतक्यांत, तो हमाल कांहीं पैसे कनवटीला लावीत हसत हसत पुढें आला...

"अरे हो...तुझं राहिलंच !...हे घे !..." म्हणून मी हमालापुढें तीन आणे केले.

★

इथूनच त्या 'दलित-नाटकां'तल्या ट्रान्सफर-सीनला सुरवात झाली. त्यांचा मघांचा आदबशीर चेहरा पालटला होता; जरा तिरमिरल्या चेहऱ्यानें व किंचित् मग्रुरीचा वास येणाऱ्या स्वरांत तो म्हणाला -"काय साहेब ?...काय, देताय् काय मला हें ?"

मी चमकलों; पुराव्याचा मुद्देमाल गाडींतून निघून गेला होता; तो बिल्लेवालाहि नव्हता; तरी मी संथपणें म्हणालों—" कपड्याच्या बॅगेच्या एका हलक्या डागासाठीं तीन डागांची हमाली !—तूं पुन्हां दुसऱ्यांचं सामान चढवून आळास तरी !..."

"गाडी गेल्यावर आतां हलके डाग काय ?...ठेवा ते तुम्हालाच खर्चायला, शेठजी !" शेवटीं, त्यानेंच असं वर्ग-युद्धाला प्रथम तोंड फोडलं.

जवळून एक चेकर जात होता; मी म्हणालों—" विचारूं रे यांना ?"

पण चेकर चार पावलं पुढें होतांच, कायदा एकदम आपल्याच हातीं घेऊन तो हमाल म्हणाला—" मी कोणाला ओळखत नाहीं !...बऱ्या बोलान् अधेली देऊन टाका माझी ! —नाही तर द्या ते फेकून..."

" अस्सं ऽ ? मग तुला देण्यापेक्षां फेकूनच देतों तर !—" त्याच्या दादागिरीनें मी चमकलों होतों; पण तरीहि मिळतं घेण्यासाठीं मी म्हणालो... " घे बघूं हे,...नि चालायला लाग !—"

तरी पुन्हा पुढें केलेले तीन आणे न घेतां तो ओरडला—" काय, धर्म करताय् काय ?...घामाचे आहेत माझे पैसे !—"

★

त्याच्या तोंडाला न लागतां मी सरळ चालूं लागलों !—पण मोठा धूर्त होता बेटा !—थोड्या अंतरावरुन तोहि आमच्यामागून येऊं लागला—

तिरक्या मानेनें तें पाहून, माझी भाची मला कुजबुजली—" अजून मागून येतोय् बरं का तो आपल्या बरोबर-बरोबर !—देऊन टाका ना त्याला चारसहा आणे, मामा !...जाऊं दे एकदांची पिडा निघून !..."

त्या तिच्या दुबळ्या भूमिकेबद्दल मला तिचाहि थोडा राग आला; पण तरी मी गपचूप लोखंडी जिना चढूं लागलों...

" आवो, रावसाब !..." तोंच मागून तो ओरडला..." पैसं हाइत कीं खिशांत ?...किती हाइत ??..."



मी थबकलों; पुन्हा तीन आणे पुढे केले नि म्हणालों ? " घे ! तुझ्या-साठीं इतकेच !—माझ्याकडल्या आणखी पैशाची तुला का पंचाईत ?—तुला चोरी तर नाहीं ना करायचीय् ?"

" हं हं !...तोंड संभाळून बोला !—" लोक जिना चढत-उतरत आहेतसं पाहून, दवंडी पिटणाऱ्या पोलिसाप्रमाणें जरा आवाज चढवून तो म्हणाला—" चोर कोनाला म्हनतां ? हमालीच्या घामाचे ठरलेले आट आने मागतांय् मी ! चला पाव्...देऊन टाका ! आन् मंग खुशाल शिरा आपल्या हवेलींत !—"

लोक आम्हा दोघांकडे टवकारून पाहात होते; मला जरा गळल्यासारखंच झालं !...कारण, दलितोद्धाराच्या पोपटपंचीचे हे दिवस ! पण तेवढ्यानेंच मोठे होणार-ठरणारे होवोत बापडे...! अनुभव मात्र असा आहे, कीं, मानवी मन एकाच पद्धतीनें चालतं; पैसा-सत्ता हातीं येतांच...किंबहुना हातीं येण्याचीं नुसतीं अंधुक चिन्हंहि दिसूं लागतांच,...मानवी मनांत एकच युद्ध उरतं— "मी वि. इतर सारे !—"

दांभिक चोरांचीच लढाई अव्याहत सुरूं असलेलं हें जग !—त्यांतले सारे सामान्य लोक सारखेच दलित...पददलित असतात !—पण त्यांत वरच्या नि खालच्या थरांमध्यें सांपडून चपटलेल्या पांढरपेशा पददलिताइतका उपेक्षित दलित दुसरा कोणी नसेल !...

कारण, त्याच्याठायीं निर्बळ, निष्कांचन, निरुपद्रवी बुद्धिमत्ता असते;... नसलेल्या अब्रूची नि असलेल्या उणीवांची एकाच वेळीं अहोरात्र चिंता करतां करतांच त्याची चिता उभारली जाते !...विशेष असं कांहीच करतां न आल्यामुळें त्याला कसला डाग लागत नाहीं !

म्हणूनच तर त्याला पांढरपेशा म्हणतात !—आणि त्यांत संतुष्ट रहाण्यांतच त्याचं एकमेव समाधान-इतिकर्तव्य असतं !—

★

त्याक्षणीं तर मला तें जास्तींत जास्त पटलं...

बेसुमार उन्हाळ्याचे दिवस होते म्हणून म्हणा,...किंवा कॅांग्रेसच्या मोठेपणाचे दिवस होते म्हणून म्हणा,...माझ्या अंगांत त्या दिवशीं खादीचा नेहरु शर्ट होता; माझा पांढरपेशा माझ्या अंगांगावर चितारलेला होता.

उलट तो...चांगला धडधाकट, उंच, काळाकभिन्न, दाढी वाढलेला, मळक्या शर्टांत नि गुडघी काळ्या मळकट धोतरांत गुरफटलेला,...कावडकष्टांत घाम ढाळणाऱ्या हमालांचा प्रतिनिधी होता...

दिवस रविवारच्या सुटीचा; वेळ सकाळची; स्थळ अत्यंत गजबजलेलं ...दक्षिणी पांढरपेशांचा जिब्राल्टर...टिळकपूल !...

...त्यांत आणखी माझ्याबरोबर माझी नीटनेटक्या चेहऱ्या-पोषाखांतली तरुण भाची—

म्हणूनच तर त्याला तसं वर्गयुद्ध स्फुरलं...त्यानेंच तोंड फोडलं !

प्रश्न वास्तविक सारा पांच आण्यांचा; दे. म. सारखा दिसणारा पांढरपेशा (विशेषतः ठाकठीक तरुण पोरीसह) पाहून जमलेल्या जनता-जनार्दनाच्या उभ्या बेंचासमोर त्या कज्जाचा फैसला तत्काळ व्हायचा !—मी मात्र मध्यम वर्गीयाचा नैसर्गीक दुबळेपणा दाखवायला हवा होता.

पण उलट माझ्याच पांढरपेशा अंगांत, माझी कल्पना नसतांहि तोंपर्यंतच्या साऱ्या पददलितांचे आत्मे एकदम संचारले; नि त्यामुळेंच मला तो क्षुल्लक प्रश्न पृथ्वीमोलाचा वाटूं लागला !...

नेहमीं सुखान्त तडजोडीचं श्रेय चटकन् पदरांत पाडून घेणाऱ्या जमावाप्रमाणेंच, (त्यांच्या मध्यभागीं राहून, त्या हमालाशी भररस्त्यांत पांच आण्यांसारख्या क्षुल्लक बाबीसाठीं आरवापाख्या खेळणाऱ्या आपल्या मामा-शेजारीं उभ्या असलेल्या) माझ्या भाचीचीहि, अत्यंत करुण स्थिती झाली होती !—बिचारी तरणी पोर ! खालीं मान घालून, अंग चोरून ती जमावाच्या गराड्यांत उभी होती !—



पण माझ्या त्यावेळच्या चढलेल्या डोक्याला मात्र त्या गोष्टीचीहि आतां मुळींच कदर वाटत नव्हती; मी तर ठरवूनच टाकलं होतं—"हा प्रश्न तत्वाचा आहे;...व्यवहारी तपशीलाचा नव्हे !"—माझं मन जागृत होऊन मला सांगत होतं..."दलितोद्धारका !...दलितांचा...अखिल दलितांचा उद्धार कर !...तूंहि एक दलितच"

★

तेव्हां, जसं कांही झालंच नाहीं अशा चेहऱ्यानें मी अर्धा जिना चढून वर गेलों. तो आमच्या जवळून-जवळून पायऱ्या चढत होता; लोक कुतूहलानें मागें वळून वळून पहात होते.

शेवटीं टिळकपुलावर चढायला एक पायरी उरतांच तुरुतुरु चढून तो माझ्यासमोर उभा राहिला; नि दरडावणीच्या आवाजांत म्हणाला— "देतां कीं नाही माझे गरिबाचे आठ आणे, साहेब ?—"

लोक टवकारून आमच्याकडे पाहू लागले. मला क्षणकाळ चुकल्या-चुकल्यासारखं वाटलं,...लाजल्यासारखं वाटलं...

तरीहि मी थांबून धीरानें संथपणें म्हणालों—"आठ आणे ठरले नव्हते !—आठ आणे मी देतहि नाही;...हवे तर मी देतोय ते तीन आणे घे नि चालूं लाग !"

"मग घरच्या पोरांना चणे कुरमुरेच द्या कीं घेऊन त्याचे !"

"बरं...तसं करीन —"

"तुमच्यासारखं खूप साहेब पाहिलेयूत मी !—"

"पण तुझ्यासारखा हमाल मात्र पहिलाच पहातोंय् !"

फुटपाथवर थवे जमले; जिन्यावरचे लोक खालीं उतरेनात; खालीं उतरलेलेहि परतूं लागले—पांढरपेशाच्या चढेल आयुष्याचे, एक दलित तसे धिंधवडे काढीत असल्याचा तो सिनेमा फुकट पाहण्याचा मोका मिळाला होता त्यांना—

"माजे आट आणे ठेऊन शिरमंत नाही होणार तुमी!—" तो रांगडा नायक आवाज चढवून म्हणाला—नि माझ्यासमोर उभा राहिला वाटेतच.

"हं...वाजू हो...पाहिजे तर तीन आणे देतों!"

"बघतों कसे पुढें जातां ते, अधेली दिल्यावगर"—

"अंगावर हात टाकायचा असेल तुला तर खुशाल सुरवात कर..."

बघतां बघतां आमचा फुटपाथवरचा आट्यापाट्याचा खेळ रंगत होता. बघे तमासगीर—जनताजनार्दनाचे ते न्यायाधीश—हां हां म्हणत आमच्याभोंवतीं लोटले होते.

★

आपली मात्रा लागूं पडत असलेली पाहून फिर्यादीला जोर चढत होता; जनताजनार्दनाकडे चौफेर पाहून तो अपीलांवर अपील करीत होता.

"येवडे शिकलेत कशाला?...गरिबाचे आट आणे लुबाडयला?—या बरोबरच्या मायभयनीची तरी लाज धरा!!"

तिथें आतां तत्व उरलं नव्हतं; जमाव-नीति नि जमाव-सहानुभूती तिथं खेळत होती. आपल्या या प्रतिस्पर्ध्याच्या भाईबंदांची बोलकी बेजबाबदार सहानुभूती जागी होईल नि तीच आपल्या मदतीला धावेल, हें तो धूर्त प्राणी जाणत होता. तो मला आडवा उभा होता.

तरी मी कांहीं न बोलतांच कोंडी फोडण्याचं माझं कौशल्य वापरून पहात होतों.

"गांधीचा लेंगा-सद्रा घालतां नि माझे गरिबाचे घामाचे पैसे पळवता?" त्यानें तो सुरुंग भरताच शेवटीं जनताजनार्दनाला वाचा फुटली.

एक चष्मेवाले तरुण नि दोघे म्हातारे त्याच्या दुःखानें नि त्याच्यावरील 'अन्यायी गहजबा'नें विद्ध होऊन मला म्हणाले—"देऊन टाका हो त्याचे आट आणे!—असं काय?"



"आठ आणे त्याचे कि माझे ते तुम्हाला हो काय ठाऊक?"...मी चवताळलों—"मी तीन आणे देतोंय्!...तुम्ही हवे तर पांच आणे वर्गणी काढून द्या त्याला आठ आणे जमवून—!"

तोंच एक बनिया भाई धोतराचा सोगा संभाळीत सिग्रेटचा धूर सोडीत म्हणाला—"जवा देनी, भाई!...ए गरिबाला श्यामाटे सतावतें?"

माझं डोकं अधिकच चवताळून भणाणून मी त्या वालाभाईवर ओरडलों—"खबरदार मध्येंच नाक खुपसाल तुम्ही आणखी तर!—याची दादागिरी पत्करली; पण तुम्ही एका शब्दाचाहि उपदेश केलात आणखी...तर हात टाकायलाहि कमी करणार नाही मी!—"

त्या माझ्या शब्दांनी मात्र घेलाभाई ताडकन् एक हात मागें उडले; भोंवतालच्या इतरांचींहि तोंडं बंद पडलीं!—

★

तोंच त्या धोरणी हमालानें एक नवा जमालगोटा माझ्यावर सोडला; "आठ आणे नव्हते ठरले?...तोंडं आहे कां बोलायला?—"

"हो आहे!...ठरलं कांहीच नव्हतं!...पण हवे तर हे तीन आणे घे!"

मी पुढे केलेले पैसे चटकन् माझ्या हातून हिसकून घेतले; ते त्यानें सर्वांच्या मध्यें टाकले नि तो ओरडला—"अरे बारे शेट?—खिशांत पैसे नसले तर कपडे गहाण टाका!...लिलांव करा इथं"—

"चूप...दूर हो...जाऊं दे मला—"

"हं जातां कुठं?..." तो पुन्हा मला आडवून हुकमी आवाजांत म्हणाला—"घाम काढून तुमची ओझीं रेटून-पेलून बी म्यां गरिबाचे पैसे बुडवणार, तर देवाला साक्ष ठेऊन तरी बुडवा!—घ्या!—उचला ते पैसे नि सांगा या साऱ्यांना—काय ठरलं व्हतं तें...हा सूर्यनारायन साक्षी हाय्!"

मायाप इंग्रजांच्या विसाव्या शतकांत पेशवाई अवतरली होती.

मी भोंवतीं पाहिलें. त्यानें मजवर लादलेलं तें दिव्य मी करतों कीं नाही, तें पहाण्यासाठीं सान्या बघ्यांचे उत्सुकतेनें टवकारलेले डोळे माझ्याकडे लागले होते.

★

त्याला आतां खऱ्या खोट्याची कदर उरली नव्हती!—कोठूनही स्वतःला बचावणं नि माझ्या पोषाखीपणाला लोळवणं, एवढेंच त्यांचं आत्मविश्वासी धोरण होतं!

पण मला त्या स्थितींतही त्याचं हसूं आलं. माझ्या लक्षांत आलं कीं त्याची खोटी फिर्याद जनताजनार्दनाच्या कोर्टात आंता शेवटच्या तंगड्या झाडीत आहे.

मी त्याच्याकडे एकदां तुच्छतेनें पाहिलं नि ते पैसे उचलत म्हणालों ..."मी तुझा देवबीव कोणी ओळखत नाही. तरी पण तूं म्हणत असशील, तर हे पैसे आपल्या सूर्यनारायणाला दाखवतों!"

"हां हां!—दाखवा...नि सांगा नाय् ठरले आठ आने म्हणून!" तरीहि चौकेर नाटकी पहात तो म्हणाला..."मग खिशांत घालून खुशाल घरीं चालायला लागा!..."

सारा जमाव कुजबुजत असतांना मी त्यानें सांगितल्याप्रमाणें म्हटलं. पैसे मी खिशांत घातले नि काही न बोलतांच भाचीला खूण करून चालूं लागलों.

अनपेक्षितपणें तमाशा तसा एकदम खलास झालेला पाहून विरस झाल्यामुळें सान्यांची पांगापांग झाली. त्यांतल्या प्रत्येक न्यायाधीशानें गोळा केलेला पुरावा नि त्यावरून ठरवलेला निवाडा निरनिराळा होता!

साराच डाव हुकलासं पाहून, तो माझा दलित-फिर्यादी जिना उतरून जात कडाडला—"थूं...त्या पैशावर...थूं असल्या सायबांवर..."

पुन्हा जनताजनार्दन थबकून माझ्याकडे अपेक्षेनें पाहूं लागला; नवी झुंपणार ही आशा त्या डोळ्यांत तरंगत होती.



पण मी तिकडे वळूनहि न पाहतां चालूं लागलों—

तेवढ्यांत माझ्या जवळून जाणारा कोणी एक दलित वर्गाचा भावी तरुण पुढारी म्हणाला—"ते तीन आणे तरी देऊन टाकायचे होतेत हो, त्याचे!..."

"कां? त्याच्या देवानें नि त्यानेंच ना मला तुमच्या देखत ते खिशांत घालायला सांगितले? तरी पुन्हा त्याचीच कींव येतेय् ना सर्वांना, अजून?"

★

थोडं लांब गेल्यावर मी घाम पुसला; डोकं थंड झालं होतं;...पण हृदय मात्र पेटलं होतं; अनुकूल परिस्थिति पाहून पोषाखी पांढरपेशांच्या माझ्या-सारख्या एका चष्मेवाल्या प्रतिनिधीवर त्या हमालानें राजरोस दरोडा घातला होता. पैसा नि अब्रू अकारण धोक्यांत पाडली होती माझी!—

माझी बाजू खरी असूनहि, त्या प्रसंगीं व त्यानंतरहि, जमाव-नीतीच्या पाठिंब्यानें, तो मला सारख्याच प्रकारें हिणवूं-हेटाळूं शकला! सामान्यांची बोलकी सहानुभूती अखेरपर्यंत त्याच्याकडेंच झुकली!

पांढरपेशाच्या अनपेक्षित धाडसानें, आपल्या खोट्या कर्मानें नि अपराधी मनानें शेवटीं तो वरमला खरा; तरी पण, आक्रमण करणारा तो दलित खालीं पडल्यावरहि, (आजच्या घटकेच्या त्याच्या 'दलित' या लेबलामुळेंच केवळ) त्याचं नाक वर राहिलं!

आणि या बोलक्या संक्रमणकाळांत, आजपर्यंत चढत राहिलेल्या चढेल पांढरपेशांचाच मी एक प्रतिनिधि म्हणून ठरलों.

किती निष्ठुर कठोर घटना ही!...आम्ही निष्क्रीय दुबळे पांढरपेशे! दोन्हीकडून थपडा खाणारे मृदुंग,...मृदुंग आम्ही!

ना आयतं वैभव,...ना खऱ्या नेकीची अब्रू,...ना घाम काढून श्रम करण्याची ताकद!—मृदुंग-जीवन आमचं!!...हो, मृदुंगी-जीवन!!—

२५-२-४५.

# त्या पेढ्यांची लज्जत— ✶ ✶ ✶ रघुवीर सामंत

नोटीस मुलांपुढें वाचली, सही केली नि पुन्हा शिकवायला वळलों—

पण जाण्याऐवजीं चुळबुळ करीत तो किंचित् लाजून म्हणाला—" सर–सर !—जरा बाहेर येतां ? ?"

जरा गोंधळूनच मी त्याच्या मागून वर्गाबाहेर गेलों. चौफेर शांत होतं; प्रत्येकाच्या वर्गावर शिकवण्याचा आवाज तेवढा येत होता. नोटिशीची वही खांकेत मारून आपल्या अल्पाकच्या काळ्या कोटांत त्यानें हात घातला. नि आंतल्या खिशांतून एक गुलाबी पुडी काढून माझ्या हातीं दिली.

त्या पुडीप्रमाणेंच गुलाबी झालेल्या त्याच्या हसतमुख चेहऱ्याकडे मी विस्मितपणें पाहूं लागलों.

" काय रे हें ?" अशा चेहऱ्यानें मी ती पुडी सोडूं लागलों—तेवढ्यांत तो घाईघाईनें म्हणाला..." हं हं...इथं नको...घरीं सोडा, सर !"

" कसलं बुवा गुपित ?—आहे काय आंत ?—"

" पेढे !...मला मुलगा झाला, सर ! !" तो लाजून खालीं पहात हळूंच म्हणाला.

" वा !—सुंदर बातमी !...पण एवढी मोठी पुडी ? काय, तुला काय वेड लागलंय् , यादव ? —आजची ही महागाई कोण ?...सर्वांना जर अशा—"

" सर्वांना कुठं ?...तुम्हाला, धोंडे, नि पिटकर सरना ! बस्स्... बाराबाराच्या पुड्या बांधल्या; कालच बारसं झालं ! चंद्रहास ठेवलं नांव "

" छान ! पण मग सर्वांनाच एक एक–पेढा..."

" कशाला ?...प्रश्न खर्चाचा नव्हता हा !...सर्वांना सुद्धां दिले असते. अगदीं बाराबारा !—पण कोणी म्हणायचे मुलगा झाला म्हणून या शिपुरड्याला



कशाला हवेत एवढे पेढ्याचे श्रीमंती चोचले ! " आपणच आपली पायरी ओळखली पाहिजे !"

★

त्यावर मी कांहीं बोलण्यापूर्वीच, तो पटकन् नोटीस घेऊन दुसऱ्या वर्गावर निघूनहि गेला—

नि पुडी खिशांत कोंबून मीहि पुस्तक उघडत वर्गांत शिरलों.

पण त्या प्रसंगानंतर, घंटा होईपर्यंत मी काय शिकवलं, तें माझं मलाच नीट समजत नव्हतं !—

मला त्याच्या तऱ्हेवाईक निर्णायक विचार-सरणीची गंमत वाटत होती. आणि त्याबरोबरच त्याच्या मागील आयुष्यांतील कांहीं स्थित्यंतरंहि आठवत होतीं...

★

गोरागोमटा, देखणा, दिसायला चांगला रुबाबदार; राहणीहि टापटिपीची नि स्वच्छ; मराठा होता तरी पांढरपेशा ब्राह्मणीपणा त्याच्या चेहऱ्यावर निसर्गानेंच चितारला होता.

पोषाखहि जिथच्या तिथें; शेव सोडलेलं शुभ्र पायघोळ धोतर, पांढरा स्वच्छ सेक्पीअर कॉलरचा शर्ट; कोट दोनच; ते आलटून पालटून वर घालणार; एक निळा सर्जचा नि दुसरा काळा अल्पाकचा. पण सारं शोभून दिसे त्याला. त्यांत आणखी ओठ पानानें ओझरते रंगलेले नि कपाळावर बिंदुमात्र गंधाची तांबडी टिकली असली, कीं, किंचित दाभणकाठी मिसरुड असलेला त्याचा हसतमुख चेहरा मोठा आकर्षक दिसे.

तो बोलणार अगदीं जरूर तेव्हांच नि फार थोडं !—कोणाशींहीं बोलतां-वागतांना अत्यंत आदबशीर; आपल्या नेमल्या कामांत कधीं चुकणार नाही; पण कोणी जादा काम सांगितलं तरी तें पटकन् आस्थेनें करायलाहि ह्याची तयारी ! त्याबद्दल कधीं पोटांत कमली अपेक्षाहि नाही. उलट कोणा

त्याची आण्यपैशांत मागून किंमत केली तरच त्याचा चेहरा पालटे. स्वीकार करत नसे. नि त्याची त्या व्यक्तीबरोबरची पुढली सारी वागणूक नि दृष्टी पालटे. लव्हाळ्याच्या रोपटांतहि एक विशिष्ट ताठरपणा असतोच कीं !

पण मग तो साडेतेवीस रुपये अधिक महागाईवाला शिपाई होता हें कोणी—तो स्वतः देखील—विसरत नसे कधीं.

★

तीन वर्षांपूर्वी आपला सर्जचा नवा कोट तो प्रथम शाळेंत घालून आला; त्याच्या दुसऱ्याच दिवशीं नुसत्या सद्यानें वावरताना पाहून त्याला मी आश्चर्यानें विचारलं—" आज कोट रे कुठे तुझा यादव ?"

तो थोडा लाजला. मग त्याचा चेहरा एकदम गोरामोरा झाला नि तो हळूंच म्हणाला..." काढून ठेवलाय् ?—शिपायाला सर्जचा कोट काय कामाचा ?"

" म्हणजे ? म्हटलं का कोणी तसं ?" दाट संशय येऊन मी म्हटलं; तो चपापला; तेवढ्यांत मी पुढें पटकन् म्हणालों..." तूं कोणाचं कर्ज कां काढलंयूस् ?—"

" कर्ज ? कां म्हणून काढीन ?" जरा अपमान झाल्यासारख्या स्वरांत त्यानें प्रतिप्रश्न केला; तेव्हां त्याचे स्वाभिमानी डोळे एकदम चमकलेले दिसले मला !—

" बस्स् तर ! मग रे कां घाबरतोस ?—" मी म्हणालों—" आपल्याच पैशानें शौक करायला कोणाच्या काकाची भीती ?...हं ! आगे बढो !"

त्याचा चेहरा किंती खुलला, त्या वेळीं ! ..त्या दिवशीं दुपारपासूनच त्याच्या अंगांत तो कोट पुन्हां आला; नि त्यानें मुकाट्यानेंच पण सहास्य मुद्रेनें माझ्याकडे पाहिलं.

★



गेल्यावर्षी, नाताळच्या सुटीपूर्वीच तो रजेवर जात असल्याचं कळलं; मोठ्या खटपटीनें त्यानें ती रजा मिळवली होती. त्याचं लग्न आहे म्हणूनहि त्याबरोबरच बातमी कळली; वास्तविक, दिवाळी–शिमगा पोस्तासाठींहि नोटिशी फिरवणाऱ्या शिपायांच्याच जातीचा तो एक ! पण जाण्याच्या आदल्या दिवसा-पर्यंतहि कोणाला तें गुपित कळलं नव्हतं !—

मला समजल्यावर, मीच शेवटीं त्याला बाजूला बोलवलं; दोन रुपयाची नोट काढून त्यांच्या हातीं दिली नि म्हटलं " अरे लग्न करतोयूस्, तर जरा जाहीर तरी कर तें; बाकीचेहि कोणी अहेर करतील...तेवढीच खर्चांत मदत !—"

पण माझी नोट खिशांत घालीत तो संकोची हसून म्हणाला—" पण यांत जी गंमत आहे ती त्यांत नाही, सर ! कशाला नसत्या भानगडी नि उपकार कोणाचे ?—कोणी म्हणायचं आपल्या लग्नाचं यानें लिलांव लावलंय म्हणून !—आपली परिस्थिती ती आपली—कोण कोणासाठीं हसत नाही नि रडत नाहीं !...लग्न होतं एकदांच, माणसाचं !—नि खर्च हा व्हायचाच ! जाईल !...हीहि आपली नड निघून जाईल !—"

★

नि आज वर्षानें, आतां त्यानें आपल्या पहिल्या मुलाच्या बारशाचे पेढे वाटले होते, ते हे असे !

तेव्हां मला वाटलं...आपल्या कायम परिस्थितींतील साऱ्या बारकाव्यांची केवढी चाणाक्ष पकड घेतां येते, एकेकाला !—आपल्या आयुष्याची झांकली मूठ सव्वा लाखाची करून त्यांतलं सुख चवीनें चाखायची एक कलाच असते म्हणायची !—'शिपाई झालोंच आहोंत आपण तर उत्तम शिपाई तरी होऊं !'. हें रसरशित मानव्याचं तत्व होतं यादवचं !—

नि मग दुसरंहि एक वाटलं मला—" आपल्या हातून अभावितपणें देखील घडणारं चांगलं,...दाखविली जाणारी निरपेक्ष स्नेहाळ सहानुभूति... यांचीं अमृत बीजं कुठं तरी अकल्पितपणें रुजत जात असतात ! तें त्यावेळीं

समजत नाही आपल्याला !—पण त्या रोपटांचीच झाडं होतात, फुलतात; फळतात; नि त्यांचं अमृत पुन्हा अकल्पितपणेंच उलट आपल्यापर्यंत येऊन पोहोंचतं; तें आपल्याला चाखायला मिळतं !..."

★

आणि म्हणूनच, यादवच्या सांगण्याप्रमाणें, त्यानें मला आस्थेनें दिलेली ती पेढ्याची गुपित–पुडी, गाजावाजा न करतां, न सोडतांच मी दिवस भर खिशांत बाळगली; तिची ऊब अनुभवली !...संध्याकाळीं घरीं गेल्यावरच ती सोडली. आनंदानें माझं अंग त्यावेळीं रोमांचित झालं !

मग त्यातले तीन पेढे माझ्या गड्याला,...तीन माझ्या मुलाला, नि तीन माझ्या बायकोला दिले !

उरलेली तीन मी स्वत: खाऊं लागलों—तेव्हां मला ते होते त्याहून शतपटीनें अधिक गोड वाटत होते. गरीबी, जाणीव, माणुसकी, स्वाभिमान, यांची संमिश्र लज्जत होती त्या पेढ्यांमध्यें !!—

२२–२–४५.

# 'तांड्या'–मागूनचं तट्टू !—

तसं पाहिलं, तर मराठींतलं लघुकथा–युग मागें पडलं आहे. कादंबरी–युग चालू आहे. अशावेळीं, **'उपकारी माणसां'**नंतर **'काहूर'**, **'आम्हाला जगायचं आहे !'**, **'चिमण्या जगाचे नेते !'** या हातीं घेतलेल्या कादंबऱ्या तशाच अर्ध्या अधिक लिहिलेल्या सोडून, मध्येंच आपल्या लघुकथांचा हा 'तांडा' मी वाचकांवर सोडणें व्यवहार दृष्टीनेंहि जरा 'अव्यापारेषु व्यापार'च !—पण 'वाळूंतील पावलां'च्या प्रथमावृत्ती (१९३४) पासून 'तांडा' नाममात्र जाहीर होत राहिला होता. नि बाडांत १५।२० अप्रसिद्ध कथा सांचून पडल्या होत्या. तेव्हां, त्यांतल्याच कांहीं कथा निवडून 'तांड्या'च्या त्या पूर्ववचनाला आज असं मूर्त स्वरूप द्यावयाचं ठरविलं, एवढंच. वाचकांच्या अगर माझ्या उत्सुकतेपेक्षां या प्रकाशनाला तात्कालिक मुख्य कारण इतकंच.

'तांडा' हें नांव जेव्हां कल्पिलं तेव्हां त्यांत या कथांचा समावेश होईल अशी कल्पना नव्हती. पण आजच्या या माझ्या नऊ कथांच्या 'तांड्यां'त विविध भावना–प्रसंग–हेतूंचा जो एक तांडा आढळत आहे तो मला अनेक अर्थानें सुखदच वाटत आहे.

कलेकरितां कला, जीवनाकरितां कला, सत्यकथा, वर्ग-युद्ध, इ. पैकीं कशाचाच पुकार न करतां, माझ्या पद्धतीनें मी लिहिलेल्या केवळ मानवी जीवनानुभवांतल्या ( कृत्रिम मुलाना नसलेल्या ) साध्यासुध्या कथा आहेत या—प्रथम कल्पना नसता अभावितपणें प्रत्येकीच्या शिरोभागीं फक्त 'रघुवीर सामंत' एवढं, एकच एक लेबल लागून त्या प्रसिद्ध होत असल्याबद्दलहि मला एकप्रकारें समाधानच वाटत आहे. कारण त्या लेबलानुसार माझ्या वाङ्मयाच्या सर्व विशिष्ट दोषांचा ( नि गुणांचाहि ) त्यांत घसघशित, आविष्कार झाला आहे.

कोणतीहि 'सत्यकथा' केवळ सत्यावर कधींच आधारली जात नाही;

पुणे न ग्रं०
४३७ ५ नारी...
दा. नों.



तें कांही यांत्रिक छायाचित्र नव्हे; उलट, कोणतीहि सोज्वल हृद्य कथा केवळ काल्पिनिक कधींच असूं शकत नाही. आणि तसं पाहिलं, तर कोणतंहि चांगलं वाङ्मय हें—लेखकाच्या आयुष्यांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष डोकावून गेलेल्या (सामान्याहून वरच्या थरातल्या) कोणत्या ना कोणत्या जोरकस अनुभवावर आधारलेली सत्यकथाच असतं. शिवाय, त्या मागें, नाही म्हटलं तरी, कोणत्या ना कोणत्या प्रकारचा स्पष्टास्पष्ट उज्वल हेतु असण्यावरच त्या वाङ्मयाची ओजस्विता अवलंबून असते.

या चष्म्यानें या माझ्या नऊ कथांच्या 'तांड्या'कडे पाहतांना, माझ्या-प्रमाणेंच माझ्या वाचकांनाहि परकं-परकं वाटणार नाही. नि मनोरंजना-बरोबरच विविध सोज्वल भावना प्रतीत झाल्यावाचून रहाणार नाहीत अशी मला बरीच खात्री वाटते. तेवढं काम केल्यावर, मराठींतल्या इतर अनेक विस्मृत कथांत त्याहि समाविष्ट झाल्या तरी त्याबद्दल मला ना खेद ना खंत !—

आतां यानंतर, आधीं '**रक्त नि शाई**' (आजचीं गाणी—२) '**काहूर**' (कादंबरी) नि 'स्वल्प-विराम' (शद्बचित्र-चित्रबंध-संग्रह) अशीं तीन पुस्तकं लौकरच वाचकांवर लादण्याचं माझं मानस आहे.

बळि प्रतिपदा—
१८६९
२६—१०—४६

रसिकांचा नम्र

रघुवीर सामंत